साप्ताहिक

# माणूस

२२ सप्टेंबर ८४/२ रुपये

## कोणार्क..

मंदिरांच्या आणि रथचक्राच्या देशात!



## परकेपणातून एकलेपणा...पोरकेपणा.

आज प्रत्येक परदेशी भारतीयाच्या मनात
एक स्टीफन झ्वाइग आहे.

अमेरिका
नावाचे
प्रकरण

साप्ताहिक

# माणूस

¤

वर्ष : चोविसावे

अंक : सतरावा

¤

२२ सप्टेंबर १९८४

किंमत : दोन रुपये

¤

संपादक

श्री. ग. माजगावकर

¤

साहाय्यक

दिलीप माजगावकर

सौ. निर्मला पुरंदरे

मेधा राजहंस

¤

वार्षिक वर्गणी

साठ रुपये

¤



प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.



¤

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यानी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

¤

: पत्ता :

साप्ताहिक माणूस

१०२५ सदाशिव, पुणे ४११ ०३०

दूरध्वनी · ४४३४५९

¤

मुखपृष्ठ

सुरेश नावडकर


## पुणे वार्ता

# गौरवशाली इतिहास होता की नव्हता ?

देशाचे गतवैभव पुन्हा येईल का ? या विषयावर चर्चेसाठी नानासाहेब गोरे, अरविंद लेले, अतुर सगतानी यानी एकत्रितपणे बोलावे हा एक मजेशीर योगायोगच वाटला.

'खडकी–औध सारस जेसीस 'ने १४ सप्टेंबरला ह्या विषयावर टिळक स्मारक मदिरमध्ये सभा आयोजित केली होती. देशाच्या गतवैभवावर बोलत असताना ह्या वक्त्याना मध्येच सागावेसे वाटत होते की, देशाचे वैभव परत मिळवण काही अशी त्याच्याच हातात आहे. फक्त या सभांप्रमाणे राजकीयदृष्ट्या हे एकत्र आले आणि अगदी गुण्यागोविंदाने नाही तरी विळ्याभोपळ्याएवढे सख्य न ठेवता राहू शकले तरी किमान देशाची जगात झालेली मलिन प्रतिमा उजळण्यात तरी ते निश्चित यशस्वी होतील. स्वतःचे वैभव वाढविणारी मंडळी वर्षानुवर्षे एकत्रितपणे सत्तेला चिकटून राहू शकतात तर देशाचे वैभव वाढविण्याची ईर्षा असलेले (निदान असा दावा करणारे) दोन वर्षेही धडपणे सत्तेवर राहू शकत नाहीत, हेच तर खरे दुर्दैव आहे.

अर्थात देशाचे वैभव वाढविण्याची आकाक्षा सारखीच असली, तरी या भारताला इतिहासामध्ये वैभव प्राप्त झाले होते का ? या विषयावर मात्र तीव्र मतभेद आहेत आणि म्हणूनच सयोजकानी बहुधा यावर विचारमंथन ठेवले होते. प्रमोद महाजन येऊ न शकल्यामुळे त्याचे वक्तृत्व ऐकायला मिळाले नाही, तरीही त्यांची उणीव फारशी भासली नाही. आमदार अरविंद लेले आणि अतुर संगतानींना प्राचीन इतिहास गौरवशाली वाटतो तर नानासाहेब गोऱ्यांच्या दृष्टीने २० व्या शतकापासूनच भारताच्या इतिहासाला सुरुवात झाली आहे या दृष्टिकोनाना तीनही वक्त्यानी चागला न्याय दिला आणि खऱ्या अर्थाने 'खडन–मंडन' ऐकायला मिळाले.

सुरुवातीला आमदार अतुर सगतानी यानी थोडक्यात आपले विचार माडले. ते म्हणाले, 'स्वातंत्र्य मिळविण्यासाठी केलेला त्याग आणि जोपासलेली मूल्ये हेच खरे देशाचे वैभव आहे; पण स्वातंत्र्योत्तर काळात स्वार्थाने या मूल्याची जागा घेतली. 'लोक सरकार बदलू शकतात' हे आपल्याला लोकशाहीने दिलेले तत्त्व आहे, त्यासाठी लोक जागरूक हवेत आज मात्र लोकशाहीची चेष्टा सुरू आहे. गटबाजी हा सध्याच्या राजकारणातील स्थायीभाव झाला आहे·' असे सागतानाच 'राजकारणापासून अलिप्त राहणे हे त्यावरचे उत्तर नव्हे' असेही त्यांनी सारस जेसीससारख्या क्लब्जना उद्देशून सागितले देशप्रेम प्रत्येकाच्या मनात निर्माण होणे ही आजची गरज आहे असे सगतानीना वाटते. (मध्यावधी निवडणुका होणार एवढेच काय, सासदीय लोकशाही रहाणार हे गृहीत धरून पुण्याची जागा संगतानी लढवणार अशी कुजबूज सभागृहात ऐकू येत होती )

त्यानंतर अरविंद लेले यानी ठामपणे 'भारतामध्ये पूर्वजानी एक गौरवशाली इतिहास निर्माण केलेला होता' असे प्रतिपादन केले. अगदी प्राचीन इतिहासापासून १९८४ पर्यंतचा आढावा घेत आत्मविस्मृती आपल्याला घातक ठरेल असा निष्कर्ष त्यानी माडला. पूर्वी भारत निश्चित वैभवसंपन्न होता हे त्यानी स्पष्ट केले. ते म्हणाले, 'आदर्श असा समाज या देशात होता हे इतिहाससिद्ध आहे· मानवतेचा धडा कोणाला घ्यायचा असेल तर त्याने भारतात यावे आणि इथून गेल्यावर आपल्या देशाचा उद्धार करावा अशी स्थिती भारताने एके काळी निर्माण केली होती. एक मोठी सर्व बाजूनी रसरसलेली सस्कृती इथे होती. सर्व जगात इथले लोक गेले; पण हातात शस्त्र घेऊन विध्वंस करण्यासाठी नव्हे तर तत्त्वज्ञान-विचार घेऊन गेले. भाषाशास्त्र, व्यापार, गणित, भूगोलशास्त्र, नौकानयन, राज्यशास्त्र या प्रत्येक क्षेत्रात भारत आघाडीवर होता असे असताना आपला समाज आदर्श नव्हता असे म्हणले तर मग आदर्शत्व कशाला म्हणायचे ? आणि या सगळ्या परपरेचा चागला भाग उपयोगात आणते तेच खरे नेतृत्व उज्ज्वल भूतकाळ ज्यांना समजतो

तेच उज्ज्वल भविष्यकाळ निर्माण करू शकतात. शेवटी ' वैभवा 'ची भारतीय व्याख्याच शोधली पाहिजे '

आजच्या स्थितीबद्दल बोलताना ते म्हणाले, ' पूर्वीची धर्मसत्ता किंवा नीतिसत्ता आज विकलाग झालेली आहे तर राजसत्ता उन्मत्त, अर्थसत्ता केंद्रित आणि लोकसत्ता विस्कळित झालेली आहे ही नीतिसत्ता प्रभावी करणे हाच आज एकमेव उपाय आहे आज समाजातल्या अत्युच्च वर्गाकडे ५० टक्के सपत्ती आहे तर शेवटच्या, तळागाळातल्या १० टक्के लोकाकडे १% टक्के सपत्तीही नाही देशातले ७० कोटी लोक हे वैयक्तिक जीवन जगतात हे याचे कारण आहे राष्ट्रजीवन बळकट कसे होईल हे पहावे लागेल, तरच देशाचे गेलेले वैभव परत मिळवता येईल इस्रायलकडे असलेला राष्ट्रजाणिवेचा घटक त्याना ताठ मानेने उभा करू शकतो, हा ' human factor ' आपण निर्माण करू या '

शेवटी अध्यक्षपदावरून नानासाहेब गोरे बोलले अरविंद लेल्याच्या मतावर तीव्र आक्षेप घेऊन गतकाळात वैभव होते असे आपल्याला वाटत नसल्याचे त्यानी सागितले. ते म्हणाले, ' असा कोणता गौरवशाली कालखड आपल्या डोळ्यासमोर आहे ? पूर्वी आपण फार मोठे होतो अस उगीचच समाधान आपल्याला वाटत असत. प्रगती करण्यासाठी गौरवशाली इतिहास असावा लागतो ही चुकीची समजूत आहे. २५० वर्षांची अमेरिका आघाडीवर आहे, तिला कुठे आहे परपरा आणि इतिहास ? ज्यूनीसुद्धा १९४८ मध्ये राष्ट्र मिळवले त्याना तरी कुठे आहे इतिहास ?

' राम–पाडव–हर्षवधन–शिवाजी याच्या काळाकडे आदर्श म्हणून बघण हास्यास्पद आहे यत्रयुग आणि विज्ञानयुगाने परिस्थिती बदलली आहे लोकसत्ताक राज्य ही नवीन कल्पना आहे इग्रजाशी सघर्ष करून हक्क मिळवायला आपण जेव्हा सुरुवात केली तेव्हा आपला खरा इतिहास सुरू झाला म्हणूनच आदर्शाच्या कल्पना करायच्या असतील तर त्या अमेरिका किंवा जपानसारख्या राष्ट्राकडे बघून करा. वास्तविक वैभव गेलेले वगैरे नसून आपल्याला ते निर्माण करायचे आहे

' पण परपराचे जोखड फेकून द्यायला आपण अजून तयार नाही. औद्योगीकरण आले तरी औद्योगिक सस्कृती इथे रुजलेली नाही. यत्रयुग आले; पण त्याच जाती, तेच चातुर्वर्ण्य, तेच कर्मकाड, तोच गणपति-उत्सव यातून बाहेर पडण्याची आपली इच्छा नाही.

राजकारण्यापासून सामान्य माणसापर्यंत भ्रष्टाचार हा या मातीचा गुण झालेला आहे. कायद्याचा आदर न करणारे ' भारतीय मन ' आहे मग पतप्रधानानी घटना बासनात गुडाळून न ठेवली तरच नवल !

' We the people......ही आपली भावना नाहीच जनतेने आपले स्वत्व परत मिळवले पाहिजे आणि विज्ञानाच्या आधारावर नवी समाजरचना उभी राहिली पाहिजे.'

अशा रीतीने नानासाहेबानी स्पष्ट शब्दात आपली भूमिका माडली अर्थात काही काही वेळा ते इतके स्पष्ट बोलतात की, ते खरे ' राजकारणी ' वाटतच नाहीत. त्यामुळेच अनेक कटु सत्ये निर्भीडपणे ते सागतात, मग त्याच्या शरसधानातून धारियासारखा त्याच्याच पक्षातला माणूसही सुटत नाही. परवाच्या भाषणातील त्याची ही वाक्ये– ' भारतीय राजकारणात लाचारीचा प्रादुर्भाव भयकर झालेला आहे. मग ते यशवतराव चव्हाण असोत, वसतदादा असोत किंवा अगदी मोहन धारिया असोत...' ' गणेशोत्सवाचा धिंगाणा काय चालवलाय आणि धारिया–गाडगीळ तिथे फुगडी काय खेळतायत ! अरे रहा ना उभे आणि सागा हे सगळे बद करायला पाहिजे म्हणून !'

शेवटी विरोधकाच्या ऐक्याचा मुद्दाही त्यानी उपस्थित केला. ' सगळी ध्येये एकच– शेतकऱ्याला योग्य भाव पाहिजे, कामगाराना न्याय, राज्याना स्वायत्तता, आर्थिक–सामाजिक समता, मग एकत्र का येत नाही ? ' जनता ' नेतृत्वाच्या शोधात आहे ह्याची जाणीव विरोधकाना व्हायला हवी एका कार्यक्रमाच्या आधारावर सत्ता हस्तगत करणे अवघड नाही ' अशा शब्दात त्यानी विरोधकाच्या ऐक्याची आवश्यकता स्पष्ट केली

म्हणजे वैभवशाली इतिहासवाद्याबरोबर रहायची नानासाहेबाची तरी ना दिसत नाही !

**–निरंजन**

## दिवाळी अंकासंबंधी वर्गणीदारांना सूचना

वर्गणीदाराना दिवाळी अक वर्गणीतच दिला जातो. ज्याना दिवाळी अक रजिस्टर्ड पोस्टाने पाहिजे असेल त्यानी दि. १३–१०–८४ पर्यंत चार रुपये म. ऑ. नें पाठवावेत

अक व्यवस्थित मोजून पोस्टाच्या ताब्यात दिले जातात. तरीही अक न मिळाल्यास प्रथम स्थानिक पोस्टाकडे चौकशी करावी. तेथे लेखी तक्रार द्यावी व तक्रारीची एक प्रत आमच्याकडे पाठवावी.


अंक शिल्लक असल्यासच व **रजिस्टरसाठी चार रुपये पाठविल्यासच अंक पुन्हा पाठवू**

ज्याची वर्गणी ३० सप्टेंबर । ऑक्टोबर अखेर ( १९८४ ) किंवा त्या सुमारास सपली असेल व ज्याची पुढील वर्षाची वर्गणी जमा नसेल त्याना दिवाळी अक पाठविला जाणार नाही.

जे वर्गणीदार सा. माणूस कार्यालयातून दिवाळी अक समक्ष नेणार असतील त्यानी समक्ष वा पत्राने दि १३–१०–८४ पर्यंत लेखी कळवावे

वर्गणीदारानी आपला वर्गणीदार क्रमाक व सपूर्ण पत्ता मनीऑर्डर कूपनमध्ये किंवा पत्रामध्ये स्पष्ट लिहावा.

**– व्यवस्थापक**



# मुंबापुरी

## □ पासष्ट पैशात सत्य !

इंडियन फेडरेशन ऑफ वर्किंग जर्नॅलिस्ट ( IFWJ )चे दि वर्किंग जर्नॅलिस्ट हे मुखपत्र कालच आमच्या घरी येऊन पडले त्यात प्राग आणि पॅरिस येथे झालेल्या पत्रकारपरिषदेत वृत्तपत्रव्यवसायातील नीतिमूल्याचा जो आढावा घेण्यात आला त्यावर एक लेख दिलेला आहे. ही नीतितत्त्वे वाचून आमची झोप उडालेली आहे कारण ही आचरणप्रणाली प्रत्यक्षात अमलात आली तर ह्या व्यवसायातील सारा चार्म निघून जाईल. आम्ही स्वत ह्या व्यवसाय निवडला याचे महत्त्वाचे कारण म्हणजे वैद्यकीय, वकिली आणि शिक्षकी पेशाप्रमाणे यात सतत ज्ञानार्जनाची गरज भासत नाही. दुपारी दोन ते सात आझाद मैदानावरील प्रेसक्लब आणि मुंबई मराठी पत्रकारसघात बसलो तर अखिल विश्वातील घडामोडीचे आकलन होऊ शकते. शिवाय इतर वृत्तपत्रात चाललेल्या भानगडीचे ज्ञानही होते. आणखी आनदाची गोष्ट म्हणजे इतर व्यवसायाप्रमाणे या पेशात 'कॉमन कोड ऑफ कॉंडक्ट' ही भानगड नाही; परतु आता ही नवीन नीतिमूल्ये आचरणात आणायची म्हटले तर हा व्यवसाय अतिशय कष्टप्रद होईल !

या लेखात असे म्हटले आहे की, म्हणे लोकाना खरी माहिती मिळविण्याचा हक्क आहे आणि पत्रकारानी ही माहिती पुरविताना वस्तुनिष्ठ सत्यच वाचकापुढे ठेवायला हवे. वस्तुनिष्ठ सत्य सागण्याची जबाबदारी जर पत्रकारावर टाकली तर मत्रालयातील वार्ताहराची मोठी पचाईत होईल.पोलिटिकल रिपोर्टिंगमधील पूर्वपपरंरागत चालत आलेली आणि काळजीपूर्वक जोपासलेली 'काइट फ्लाइंग' ही जुनी कला पार लोप पावेल अशी आम्हाला धास्ती वाटते. मंत्रालय प्रेसरूममधील खुर्चीवर पाय टाकून आज महाराष्ट्राच्या राजकारणाला कोणते वळण लावायचे ह्या विचारात कोचावर पहुडलेले एक ज्येष्ठ पत्रकार आम्हाला म्हणाले की, पोलिटिकल रिपोर्टिंग हे मत्र्याशी तुमचे असलेले वैयक्तिक सबध, संपादकाची कल्पनाशक्ती, जाहिरातीची शक्यता आणि मॅनेजमेंटचा इटरेस्ट ह्या महत्त्वाच्या घटकावर अवलबून असते. यात वस्तुनिष्ठ सत्याचा भाग येतोच कोठे ? शिवाय पासष्ट–सत्तर पैशात सत्य विकत घेण्याची वाचकाची खोड वाईटच ! असे त्याचे स्पष्ट मत होते.

दुसरे एक महत्त्वाचे कलम म्हणजे आपल्या व्यावसायिक नीतिमूल्याची जपणूक करण्यासाठी पत्रकारानी कोणत्याही स्वरूपाच्या भेटी स्वीकारू नयेत. असले काही नियम अमलात आले तर दुपारच्या प्रेसकॉन्फरन्सना ( सध्याकाळच्या पत्रकार परिषदाना कॉकटेल प्रेस कॉन्फरन्स असे म्हणतात. ह्याची कॉपी नेहमी एक दिवस उशीरा दिली जाते. ) येण्याचे बद होण्याची दाट शक्यता आहे. अर्थात अशा भेटी घेऊनही देणारावर खरपूस टीका करणारे निधडचा छातीचे पत्रकार मुबापुरीत काय कमी नाहीत ! असो. मुबई महापालिका बरखास्त झाल्यापासून नागरिकापेक्षाही खरे नुकसान आम्हा पत्रकाराचे झाले आहे ! आता नगरसेवक नसल्याने दरवर्षी दिवाळीत मिळणारी 'गिफ्ट कुपन्स' आता दिसणार नाहीत. त्यामुळे आता रिलायन्स टेक्सस्टाइल आणि सहकार भाडार याची प्रेसकॉन्फरन्स आणि महाराष्ट्र सरकारचे बजेट सेशन याकडे आमचे डोळे लागले आहेत.

उत्तम लेखक आणि उत्तम पत्रकार यामधे कुणी गल्लत करता कामा नये. वाङमयचौर्य हा पत्रकारितेचा आत्मा आहे असे आमचे ठाम मत आहे. Behind every story there is a handout असे थोर चिनी पत्रकार चिंग फू ली यानी म्हटले आहे ( माणूसच्या वाचकाना चिनी भाषा येत नाही याचा आम्ही फायदा घेत आहोत असे कुणी मानू नये ! ) ह्या नव्या नीतितत्त्वानुसार पत्रकाराना जर वाङमयचौर्यास बदी घातली तर टाइम, न्यूजविक आणि इतर परदेशी वृत्तपत्रे वाचण्यात काही अर्थच उरायचा नाही. इग्रजी वृत्तपत्रे मराठी वृत्तपत्रातून बातम्या उचलतात, मराठी पत्रकार इंग्रजी वृत्तपत्रे, मासिके ह्यातून भाषातर करून आपल्या नावावर लेख लिहितात, ह्या दोन्ही भाषातील पत्रकार यु. एन. आय आणि पी टी. आयचे टेक्स आपल्या नावावर खपवितात ह्या असल्या सोयीमुळेच पत्रकाराचे हात सतत लिहिते राहतात.

ह्या लेखाच्या शेवटाशी पत्रकाराच्या कर्तव्याविषयी जे भाष्य केले आहे ते इतके दुर्बोध आहे की त्याचा आमच्या जडबुद्धीला काही अर्थबोध झाला नाही. मुबई मराठी पत्रकार सघ आणि प्रेसक्लबमधील आमच्या पत्रकारबधूनी वेळात वेळ काढून त्याचा अर्थ आम्हाला समजावून द्यावा. त्या ओळी अशा-
The journalist participates actively in the social transformation towards democratic betterment of society and contributes through dialogue to a climate of confidence in international relations conducive to peace and justice everywhere, to detente, disarmament and national development

## □ सिर सलामत !

'साधुसत येती घरा, तोचि दिवाळीदसरा' अस म्हणतात ते काही उगीच नव्हे.

परवा–सप्टेंबर बारा–तेराला इदिराजी आणि राजीव गाधी नागपुरी अवतरले तेव्हा महाराष्ट्राचं आख्ख मत्रिमडळ लगडचा बाळकृष्णासारख नाचत–बागडत नाही का नागपूरला गेलं ? 'जेथे जाल तेथे, आम्ही आपुल्या मागेमागे' अस म्हटलं तर वावग ठरणार नाही.

मुख्यमत्री वसतदादा पाटलापासून ते थेट गेला बाजार बाबूराव भापशापर्यंत सगळे नेते, मत्री अन् आमदारमडळी शिंगं मोडून गुरुनाथ कामताच्या सोगडचाबरोबर फुगडचा खेळताहेत. सगळे तारुण्याने अगदी कसे मुसमुसतायेत !

त्यामुळे आमचे चिरतरुण, गुलजार चद्रकांत त्रिपाठी अन् गुरुवर्य रामराव आदिक मात्र कोमेजून गेलेत. दोघेही मुबईतच राहून गेले. त्रिपाठी खर तर भावी पिढीचे अन् युवकांचे आशास्थान; पण त्याना नागपूरची सत्री आवट वाटली असावीत ! असो.

आदिकांची दिल्ली–वारी वाया गेलीस दिसतेय. इदिराजीनी भर पत्रकार–परिषदेत रामरावाच्या बाजूने समर्थन–पत्रक काढणाऱ्या चौदा मत्र्याना आपण झापल्याच सागून टाकल म्हणूनच आदिक नागपूरला गेले नसावेत.

पण म्हणून काही बिघडलं नाही. त्यांची आणि चंद्रकात त्रिपाठीची अनुपस्थिती जाणवणार नाही अशी तजवीज एनएसयूआयच्या कार्यकर्त्यांनी आधीच करून ठेवली होतीस दिसतंय रामराव–चद्रकात द्वयीनी घालून दिलेल्या आदर्शाबरहुकुम हे कार्यकर्ते वागले! दादांना काढणार नाही अशी जाहीर कमिटमेंट भले इदिराजीनी केली असेल; पण इथे दादा मात्र जाम नर्व्हस झालेत. बाई बोलतात एक अन् करतात दुसरंच अशी त्याची ख्याती आहे. तेव्हा दादाना आपल्या भविष्याची काळजी लागून राहणं साहजिकच आहे.

राज्यात सर्वत्र दुष्काळ असताना महाराष्ट्रातले सगळे मत्री नागपूरला उत्सव करताहेत, अशी काहीनी ओरड केली. ते सगळे चड्डीवाले असतील, नक्षलवादी असतील किंवा परकीय शक्तीचे हस्तक तरी असतील! अशा नतद्रष्ट आगलाव्याकडे नेतेमडळीनी लक्ष देऊ नये.

महाराष्ट्रात काय कधी दुष्काळ पडत नाही ? नेहमीचीच दुष्काळी परिस्थिती असते. रोज मरे त्याला कोण रडे ? दुष्काळी भागातल्या लोकाना जर भाकरतुकडा मिळवून द्यायचा असेल तर पहिल्यादा आपली रोजी रोटी नको का बरोबर असायला ? आपलच मत्रीपद गेलं तर कसली आली तळागाळातल्या लोकाची सेवा ? म्हटलय ना– ' सिर सलामत तो पगडी हजार ! '

### ☐ निदान पावपट !

मुबई मराठी पत्रकारसघाची गेल्या रविवारी निवडणूक होऊन नवाकाळचे यशवत ( अवर वेरी ओन नाना ) पिंपरीकर अध्यक्ष म्हणून निवडून आले.

या निवडणुकीच्या गदारोळात पत्रकारसघातले जुने मतभेद उफाळून आले. निवडणुकीनतर हे मतभेद आस्ते–आस्ते दूर होतील असे होप्स ठेवावेत का ?

पत्रकारसघाचे आम्ही साधे मेंबरही नाही. तेव्हा या मतभेदाविषयी आम्हाला सविस्तर काहीच ठाऊक नाही.


# आम्ही परत आलो !

१७ वर्षांच्या विदेशवास्तव्यानंतर ओगले १९७७ मध्ये इकडे भारतात–पुण्यात येऊन स्थायिक झाले.

तसं पाहिलं तर इकडे येण्यापूर्वी ओगले कॅनडातल्या उच्चमध्यमवर्गीयांमध्ये समाविष्ट झालेले होते. टोरंटोतलं सुस्थितीतलं मनाजोगतं घर, स्थैर्य, सुबत्ता, आवडीचं काम. . . जे हवं ते सगळं तिकडे होतं. तरी भारतातच स्थायिक होण्याचा निर्णय त्यांनी का घेतला ? कसा घेतला ? आणि आता त्यांना काय वाटतं ?

☐

परदेशातले भारतीय

आपले कोणाकोणाचे काका, मामा, मावशी, मुली, मुलं, जावई, सुना परदेशांत रहात असतात.

त्यांनी इथं यावं ही आपली इच्छा.

इथं परत यावं अशी त्यांचीही इच्छा.

या दोन इच्छांमधे जे, किंवा, पण, परंतु, अथवा, तथापी, आणि, व उभे आहेत त्यांना ओलांडून अखेरीस स्वेच्छेनं परत आलेल्या काहींचं हे मनोगत लिहिताहेत–

**मंगला गोडबोले**

परदेशातल्या आणि देशातल्या भारतीय मनांचं प्रतिबिंब दाखवणारं !

## ' माणूस ' दिवाळी अंकात

संघाच्या एकूण कार्यपद्धतीविषयी मतभेद असणं साहजिक आहे; पण अग्रलेख लिहून हे मतभेद चव्हाट्यावर मांडण्याइतपत मामला 'सीरियस' होता का ?

पत्रकारसंघ पैशाच्या दृष्टीनं सबळ नसताना जिलब्यांची जेवणं झोडणं योग्य नाही असा काहींचा मुद्दा आहे. मुद्दा आम्हाला मान्य आहे. दुसरा असाही एक मुद्दा आहे की, संघाकडून पत्रकारमंडळी कर्ज घेऊन परतफेड करत नाहीत. हाही मुद्दा, टू स्मार्ट विथ अ फेअर अजमशन्, योग्य आहे; पण हे दोन्ही मुद्दे किमान नैतिक आचारसंहितेचे आहेत अन् म्हणूनच खूप फसवे वाटतात.

पत्रकारसंघाचे पदाधिकारी किमान नैतिक मूल्यं पाळत नाहीत अशी तक्रार एका बुजुर्ग विश्वस्तानं आमच्याकडे केली; पण हा शोध त्यांना आताच लागला काय ?

नैतिक मूल्यं-बिल्यं तर दूर राहोत. इथे किमान व्यावसायिक संकेतसुद्धा पाळणं कठीण होत चाललं आहे. निदान आम्ही तरी किमान संकेत पाळत असल्याचा छातीठोक दावा करत नाही. जमेल तितकं इमानेइतबारे करतो. नाही तर गंगार्पणमस्तु !

दुसऱ्यासाठी नीतिमूल्यांचे संकेत प्रिस्क्राइब करणं सोपं आहे, स्वतः आचरणात आणणं कठीण आहे. जितक्या त्वेषानं आपण दुसऱ्यावर तुटून पडतो, त्याच्या निदान पावपट जरी आपण आपलीच खबरबात काढली तर बरं होईल.

पत्रकारमंडळी किमान आचारमूल्यं पाळतात किंवा नाही यावर देखरेख ठेवणारी 'वॉचडॉगबॉडी' म्हणून कोणत्याही पत्रकार संघटनेकडे आम्ही पाहात नाही. संकेत आपणच आपल्याला घालून घ्यायचे असतात. त्यांचं काटेकोर पालन आपण करतो आहोत किंवा नाही हे आपणच पाहायचं असतं, तेवढी प्रांजलता हवीच.

शेवटी पत्रकाराला आपल्या सगळ्या लढाया आपणच एकट्याने लढायच्या असतात. कुठून जर एखादा पाठिंब्याचा ठराव आलाच तर तेवढंच जिवाला बरं वाटतं.

तरीही मुंबई मराठी पत्रकारसंघ आणि बॉम्बे युनियन ऑफ जर्नलिस्टसारख्या पत्रकार-संस्था कार्यरत असाव्यात असं वाटतं. एकत्र आल्याशिवाय मतभेद कसे होणार ? हो की नाही नाना ? थ्री चिअर्स टू नाना पिंपळीकर अँड हिज टीम !

—विष्णू जयदेव

## राजधानी दिल्ली

# गणपतीतले दिवस

दिल्लीतल्या समस्त मराठी मंडळींचा आवडता उत्सव म्हणजे गणेशोत्सव. ठिकठिकाणच्या महाराष्ट्रीय मंडळांची ही वर्षभरातली सर्वांत महत्त्वाची पर्वणी असते या निमित्ताने त्या त्या भागातली मराठी मंडळी (कधी नव्हे ती) एकत्र येतात, गणरायाच्या उत्सवात धडाक्याने सहभागी होतात (तेवढीच शेकडो मैल दूर राहिलेल्या सांस्कृतिक वातावरणाची उजळणी–काहीसा नोस्टाल्जिया– 'मुलांना आपल्या संस्कृतीची ओळख पाहिजेच' वगैरे उगाचच केलेली समर्थनभाष्ये) काही क्रीडा–कलाविषयक कार्यक्रम साजरे करतात; हौसेने मराठी चित्रपट एकत्र पाहतात, नाटके बसवतात, दहा दिवस नुसती दंगल अनुभवतात एरवी उत्तरभारतीयांच्या गदारोळात अंग चोरून वावरणारी आणि त्यांच्या सामाजिक उत्सवात बळेबळेच सामील होणारी मराठी माणसे हे गणपतीचे दहा दिवस मात्र अस्मितेची नशा अनुभवतात. 'हम भी कुछ है' असे वाटून घेतात. महाराष्ट्रीय स्नेहसंवर्धक समाजाची श्रद्धानंद बाजारात स्वतःची पुरातन वास्तू आहे. त्यामध्ये त्यांचा गणपती बसतो. मराठा मित्रमंडळाचा गणपती, मंडळानेच चालविलेल्या चौगुले शिशुविहार विद्यालयाच्या भव्य प्रांगणात बसतो. उत्तरदिल्ली महाराष्ट्रीय समाजाला कधी बिर्ला मिलचे सभागृह, तर कधी गुजराती धर्मशाळा गणेशोत्सवासाठी भाड्याने घ्यावी लागते. रामकृष्णपुरम् आणि जनकपुरी येथेही गणेशोत्सव थाटाने साजरा होतो. यमुनेपलीकडे दिल्लीच्या पूर्वभागामध्ये झालेल्या नव्या वसाहतीमध्येही महाराष्ट्रीय मंडळाने या वर्षी थाटाने गणेशोत्सव साजरा केला.

ऑगस्ट लागला की गणेशोत्सवाचे वारे वाहू लागतात. मंडळाच्या कार्यकारिणीच्या सभा होतात. कामाचे वाटप होते. कार्यक्रम आखले जाऊ लागतात. वेगवेगळ्या 'अँगल्स' मधून वेगवेगळ्या गटाचे 'इंटरेस्ट' असतात. कोणाला समारंभात मिरवायला मिळणार असते, कोणाला स्टेजवर काही करून दाखवण्याची हौस असते, काही जण केवळ एकत्र मराठी समुदायाच्या संगतीचा लाभ घेण्यासाठी आसुसलेले असतात बहुतेकांच्या घरी गणपती बसविला जात नाही. कारण तो गावाकडे– 'मोठ्या घरी'– बसवला जात असतो. तेव्हा गणपतीच्या पूजेचे वातावरण आपण अनुभवावे, मुलांना दाखवावे हा हेतू असतोच.

महाराष्ट्रीय स्नेहसंवर्धक समाजाने यंदा खूप आधी गणेशोत्सवाचा पहिला भाग– म्हणजे क्रीडास्पर्धा–सुरू केला. टेबलटेनिस, कॅरम आणि बुद्धिबळ यांच्या स्पर्धा समाजाच्या वास्तूमध्ये आयोजित केल्या. महाराष्ट्रीय स्नेहसंवर्धक समाज जुन्या दिल्लीत श्रद्धानंदबाजारात आहे (त्याच्या वास्तूला लोकमान्य टिळकांचे पाय लागले होते) पण क्रीडास्पर्धांना नव्या दिल्लीतूनही प्रतिसाद मिळाला. अगदी खेळीमेळीच्या वातावरणात, अटीतटीने या स्पर्धा पार पडल्या.

मराठा मित्रमंडळाने पहिल्या दिवशी 'पत्रकार–स्पर्धा' आणि दुसऱ्या दिवशी भजनाचा कार्यक्रम आयोजित केला होता. या दोन्ही कार्यक्रमांना फारच तुरळक श्रोतृवर्ग उपस्थित होता. तिसऱ्या दिवशी चौगुले शिशुविहारविद्यालयाच्या विद्यार्थ्यांचा विविध कलादर्शनाचा कार्यक्रम झाला या कार्यक्रमाला केन्द्रीय मंत्री श्री. शंकरराव चव्हाण सहकुटुंब उपस्थित होते. विद्यार्थी–विद्यार्थिनींनी राष्ट्रीय एकात्मतेवर आधारित गीत-नृत्यांचे काही कार्यक्रम फार सुरेख सादर केले अत्यंत सुंदर रंगीबेरंगी वेषभूषेमध्ये आकर्षक संरचना करून बसविलेली ही नृत्ये वेधक होती. एक सरदारजी मुलगा सर्व नृत्यात अतिशय समरसतेने भाग घेत होता. गणेशवंदनाचे मराठी गीत म्हणत होता, हे दृश्य तर फारच छान वाटले. नंतर मुलांचे एक नाटुकले होते; पण त्या वेळी ध्वनिक्षेपक असा काही खराब झाला की, एक अक्षरही कुणाला जाम ऐकू येत नव्हते. बिचारी मुले अगदी इमानेइतबारे अभिनयाच्या हालचाली करीत होती; पण स्टेजवर काय चालले होते ते कुणालाच कळत नव्हते.

रविवारी सुटी असल्याने सर्वत्र महाप्रसा-

पृष्ठ ३१ वर




# भारतीयत्व जपणारे परदेशी भारतीय

## (८)

प्रा. स. शि. भावे

**डॉ.** मांगलिकांचं वाक्य माझ्या कानात घुमत होतं: 'आमच्या मुलांना हिंदु असण्यात अपराधी वाटतं.' का वाटतं ?

माझ्या मनात प्रश्न येत होता. कोण-कोणत्या गोष्टींचं यांना अपराधीपण जाणवतं ? हिंदु आहेत म्हणून ? भारतीय आहेत म्हणून ? गरीब, मागासलेल्या देशातले आहोत असं सांगावं लागतं म्हणून ? असं अपराधी, असं अवघडलेलं का वाटावं ?

मनात असे प्रश्न येत असतानाच गेली दहा-बारा वर्षे एका जिवलग मित्राशी प्रत्येक वेळी होणारा संवाद आठवत होता.

गेली वीस वर्षे हा माझा मित्र इंग्लंडमध्ये स्थायिक आहे. सुरुवातीस दर तीन वर्षांनी तो भारतात येत असे. सध्या दरवर्षी येतो. जेव्हा येई तेव्हा त्याची एकच भुणभूण असे : 'तुम्ही किती भाग्यवान ! तुम्हाला पर्वती, फर्गसनहिल, विद्यापीठाचं आवार, बंडगार्डन हे सारं नेहमी पाहायला, अनुभवायला मिळतं. नाही तर आम्ही ! तिकडे लंडनच्या गर्दीत हरवलेले असतो.'

त्याच्या बोलण्याला आम्ही हसत असू. आम्हा बिचाऱ्या भारतात राहणाऱ्यांना तू उगीच हिणवतो आहेस असे आम्ही त्याला म्हणत असू; पण एक खरे. त्याची हळहळ खोटी नव्हती. म्हणून मग आम्ही त्याला गंभीरपणाने म्हणत असू—'अरे, मग ये इकडे. आपण बघू काही तरी सोय तुझ्या नोकरीची आणि घराची पण.' यावर त्याला जरा उल्हास चढे. तो बेत सांगू लागे— 'आता असं करतो, तीन वर्षांनी कायमचाच येतो. त्याआधी मुलींना एक-एक महिना पुण्यास पाठवतो. तेवढीच त्यांना सवय होईल !'

त्याच्या मुली आल्या. राहिल्या. परत गेल्या. हा परत आला. आम्ही विचारलेच, 'काय रे बाबा, काय बेत ?' तशी हा उदास झाला. थबकला. म्हणाला, 'आता इतक्यात तरी नाही येता येणार.' पुन्हा थबकला. मग म्हणाला, 'मुलींना तिकडेच आपलं वाटतं. इकडे परकं वाटतं. शाळा, मित्र-मैत्रिणी, हवापाणी-तिकडचंच आपलं वाटतं.' त्याची हळहळ आम्हाला समजत होती, तरी वास्तवाकडे त्याला वळवावे म्हणून म्हणालो-'त्यांचं स्वाभाविक आहे. थोरली लहान असल्यापासून तिकडे, धाकटीचा जन्मच तिथला. त्यांना तेच जग आपलं वाटणार ! जशी आपल्याला पर्वती, तसं त्यांना सेंटपॉलचं मंदिर. तू त्यांचा असा विचार का करीत नाहीस ?'

तो म्हणाला, 'त्यांचं ठीक आहे; पण त्यांच्या ब्रिटिश होण्यानं माझ्या मनाला दुःख होतं, त्याचं काय ?'

मी म्हणालो, 'तुझी भावना मी समजू शकतो. आपण जेव्हा या जगात नसू तेव्हा त्यांना अशी आठवण आली पाहिजे की, ही माझ्या वडिलांची-आजोबांची-खापरपणजोबांची पर्वती आणि ही माझ्या आईची-आजीची-खापरपणजीची तुळशीबाग ! असंच तुला म्हणायचंय ना ?'

तो हसला. त्याच्या मनाचा तळ स्पष्ट झाला होता.

मी पुढे म्हणालो, 'तू वीस वर्षांपूर्वी इंग्लंडला गेलास तेव्हाच खरं तू हा विचार करायला हवा होतास; पण त्या वेळी तुझ्या आई मनातल्या मनात हा विचार करीत होत्या आणि तू विचार करीत होतास बदलाचा, नवेपणाचा ! आता तुझ्या मुली नवेपणाची स्वप्नं पाहतायत आणि तुझ्या आईच्या जागी तू जाऊन पोचलायस.'

त्यावर तो विचार करीत राहिला.

□

हा संवाद एकदाच झाला असे नाही. भारतातच झाला असेही नाही. एकाच मित्राशी झाला असेही नाही. अमेरिकेला जाता-येताना लंडनला थांबलो होतो तेव्हा तिथे आणि अमेरिकेतही अनेकदा, विवाहयोग्य मुलींबाबत मित्र व मित्रपत्नी असे बोलायचे. 'कल्चरल कंटिन्युइटी' राहणार नाही म्हणून हळहळायचे !

या हळहळण्यात मग आणखी अनेक छटा आपोआप प्रकट होत असत.

एक मित्र. मराठी. स्थानिक मंडळी त्याचे वारंवार कौतुक करीत होती. त्याच्या थोरल्या मुलीचे लग्न छान झाले. जसं व्हायला हवे होते तसे झाले. म्हणजे कसे ? तर लग्न भारतात झाले. भारतीय जुन्या पद्धतीने झाले. नवरा भारतीय आणि तरी इकडे स्थायिक झालेला !

झाले असे. मुलगी-मुलगा दोघेही कॉम्प्युटर-तज्ज्ञ. शिकताना गाठ पडली. लग्न करायचे ठरवले. पुढचे काय ? तशी मुलगा म्हणाला, 'माझे आईवडील आंध्रात असतात. ते सनातनी आहेत. माझं स्वतःचं काही म्हणणं-मागणं नाही; पण मी एकुलता. त्यात परदेशी. म्हणून यात तरी त्यांना राजी राखावं असं वाटतं.' मुलीला विचारले. मुलगी म्हणाली, 'मी इकडची. मला तुमचा तो व्यवहार काही कळत नाही. सनातनीपणा तुम्हाला नको असेल तर मी हे लग्न मोडते !'

आता आईवडिलांनी विचार केला. त्यांचे

आतडे तुटले ते भारतात आले वरमाईला वगैरे भेटले. तिची इच्छा ऐकली ती पुरी करण्याचे ठरविले. वरवधूना बोलावले. आधात कृष्णाकाठी उभय प्रांताच्या जुन्या रीती एकत्र करून सोहळा साजरा झाला. वरमाता–वरपिता तृप्त झाले. यथाकाळ वधूवर अमेरिकेस परतले. त्याचा जॉब सुरू झाला आहे आणि वधूमाता पहिल्या वर्षातले सारे सणवार हौसेने करते आहे. वर्षसणाला आम्हा उभयताना निमंत्रण होते; पण आम्हाला आधीच भारतात परतायचे होते.

निवातपणाने बसलो असता मित्राकडे विषय काढला. तो मुडात होता. अमेरिकेत 'वधू–वर पाहिजेत' अशा जाहिराती येत नाहीत याचे कौतुक करीत होता. अमेरिकन मुले-मुली लग्न कसे स्वतःच ठरवतात, भारतातली मुलं मोठेपणीदेखील वडील माणसावरच अवलंबून असतात...असं शुद्ध तात्त्विक विवेचन करीत होता. त्याचं विवेचन संपल्यावर नेताजीना मी माझ्या मनातला प्रश्न विचारला, 'महाशय, आपल्या मुलीच्या लग्नात वधूवर वडील माणसावरच अवलंबून राहिली ना?' नेताजी जरा अस्वस्थ झाला. तो शाळेपासून आदर्शवादी होता. म्हणून आम्ही मित्र त्याला नेताजी म्हणत असू. तो म्हणाला, 'पण माझ्या मुलीनं मला स्पष्ट सांगितलं होतं, वाटल्यास मी हे लग्न मोडते!'

'कुणाला वाटल्यास? तिला की तुला? तिने आपल्या मित्राला परस्पर का नाही सांगितलं की, बाबा, आपल्याला असं अस चालणार नाही आणि तू तुझ्या व्याह्यांना जाऊन भेटलास, जुन्या पद्धतीनं लग्न लावलस, ते का? या वेळी तुझा पुरोगामीपणा कुठे गेला होता?' मी खोदले.

'तुला खरं सांगू का?' तो म्हणाला, 'खरं म्हणजे मला हे सारं पटत नाही; पण माझी आई, माझ्या बहिणी, साऱ्याना इतकं बरं वाटत होतं की त्यानं मला पण बरं वाटत होतं आणि अगदी खरं म्हणजे मला स्वत.लाही वेगळं बरं वाटत होतं.'

'का बरं वाटत होतं?'

'मी अमेरिकेत राहून अगदीच काही साहेब झालो नाही असं पाहून माझ्या आई–बहिणीना बरं वाटत होतं आणि...आणि काही क्षण तरी आपण पुन्हा अस्सल भारतीय झालो आहो, याचं समाधान मला मिळत होतं. कद नेसताना, नथ घातलेल्या बायकोला पाहताना काही तरी वेगळंच बरं वाटत हो.'— नुकत्याच घेतलेल्या अनुभवात तो आठवणीने पुन्हा रंगला होता.

माझे खोदणे मला थांबवायचे नव्हते. म्हणून मी पुन्हा विचारले, 'अरे, अस समाधान मिळणं प्रतिगामी आहे,पारपारिक आहे, आपल्याला आंतरराष्ट्रीय झालं पाहिजे, असं तू म्हणायचास. त्याचं काय?'

आता तो वादाच्या मूडमध्ये नव्हता. प्राजळ भावनेत होता. म्हणाला, 'ते काय मला आता सांगता येत नाही; पण समाधान वाटलं हे खरं.'

मला त्याचा प्राजळपणा आवडला. म्हणून वाद सोडून मी विचारलं, 'तुझं अन् वहिनीचं समजलं, पण चंदा आणि रघू यांचं काय? लग्नाचे विधी करताना त्याना काय वाटत होतं?'

'त्याना गंमत वाटत होती, कुतूहल वाटत होतं; पण भावना तयार होत नव्हती. आम्हा दोघासारखं समाधान मिळत नव्हतं.'

एवढ्यावर आमचं बोलणं संपलं; पण मनातले विचार तर नुकते सुरू झाले होते. चंदा–रघूच्या मुलाना तर कदाचित अशी गंमत, कुतूहलदेखील वाटणार नाही. नंतर त्यांच्या मुलाना तर....

म्हणजे, असे कमी कमी होत हे वेगळे भारतीयत्व पुरते नाहीसे होणार! हे बरं होईल का?

आणखी, बरं असो, वाईट असो, हे टळणार आहे का? तर नाही. मग हे अपरिहार्य आहे का? तर हो!

हे अटळ असेल, अपरिहार्य असेल; पण हे पुरतेपणी होणे शक्य आहे का? आणि जर नसेल तर ते अगदी सूक्ष्म रूपात उरलेले भारतीयत्व कसे असेल?

¤

उत्तरोत्तर कमी होणारे, तरीही सूक्ष्म रूपात उरणारे भारतीयत्व कसे असेल ते मनात उभे करण्याचा छंदच मला अमेरिकेत लागला होता. काही नमुने अजून मनात उरले आहेत. काही त्रास देत, काही सुखावत...

...लंडनला हीथ्रो विमानतळावरचे कॅंटीन भारतीयानी कंत्राटाने घेतले आहे. सारा कारभार स्त्रियाचा आहे. एकाच कुटुंबातील दिसतात. पदार्थ देणे, टेबल पुसणे, बिल करून पैसे घेणे, सारी कामे त्याच करतात. अस्सल भारतीय सुस्तपणाने करतात. चेहऱ्यावर मग्रूर थंडपणा आम्हाला तर भारतात असल्यासारखे, अगदी महाराष्ट्रात मराठी उपाहारगृहात बसल्यासारखे वाटले. एकच फरक. गोऱ्यांपेक्षा आमच्याशी अधिक थंड मग्रूरी ..

मिनेआपोलिसचे हिंदु मंदिर. पद्माकर दीक्षित तन्मयतेने अभंग गात आहेत— 'अवघाची संसार। सुखाचा करीन॥' समोर पन्नाससाठ श्रोते. मराठी–बंगाली–हिंदीभाषिक–तमीळ. त्यांच्या चेहऱ्यांवरील भक्तिभाव–भांबडा, वावरलेला. काहीसा गोंधळलेला 'मंदिर' सपवून नंतरच्या कार्यक्रमाची वेळ साधेल ना म्हणून अस्वस्थ. ह्या विघ्न–छटा न्याहाळणाऱ्या शांत, अंतर्मुख विमलाताई दीक्षित...

..हैद्राबादचा एक मुस्लिम विद्यार्थी. पाकिस्तानी मैत्रिणीसह बोलवायला आलेला. पाक विद्यार्थिनी आग्रह करते आहे, 'आपण जरूर जरूर या. 'कुली'त अमिताभ आहे. काही नाही तरी टाइम पास होईल. नाही तरी इथे दीड महिना राहून दोघं बोअर झाला असाल. दोघं याच!'

...मिनेआपोलिसमधले 'आयलंड लेक' काठाने चालत फिलिप, सूझन, आम्ही दोघे. पलीकडे रस्त्यावरून उलटे जाणारे एक मराठी जोडपे. आम्ही एकमेकांकडे बघतो. हसतो. हात वर करून निरोप घेतो. तसेच आपापल्या उलट्या दिशेने जातो. फिलिप, सूझन चकित. शेवटी न राहवून सूझन विचारते, 'तुम्हाला बोलायच नाही एकमेकाशी?' आम्ही न बोलता फक्त हसतो...

¤

...कार्लटनचा एक तिबेटी विद्यार्थी. दलाईलामा भारतात आले तेव्हा त्याचे कुटुंबही आले होते. त्याचा जन्म इथला. आई नंतर अमेरिकेत गेलो. शाळा संपल्यावर कॉलेजशिक्षणासाठी हा घराबाहेर पडला. एक सेमेस्टर शिकतो. एक सेमेस्टर कमावतो. हा शोधत माझ्याकडे आला. म्हणाला, 'इथे मी आशियायी विद्यार्थ्यांचं मंडळ चालवतो. आम्ही पधरा–सोळा जण आहो. आमच्यात

जेवायला—गप्पा करायला या.' आम्ही दोघे गेलो. त्याना आनद झाला. मी विचारले,

'तुम्ही आशियायी म्हणून वेगळे का राहता ? इथल्या मुख्य प्रवाहात का सामील होत नाही ? '(आधी मनात नव्हता; पण 'मुख्य प्रवाह' हे शब्द वापरताना इकडचा सदर्भ आठवल्याशिवाय राहिला नाही.)

ती मुलमुली म्हणाली, 'आम्ही खूप तसा प्रयत्न करू; पण इथल्या मुख्य प्रवाहानं आम्हाला सामावून घ्यायला हव ना ? ते आमच्याकडे पाहतात ते 'आशियायी परदेशी' (एशियन सेटलर्स) म्हणूनच.'

'इथले गोरे अमेरिकनच नव्हेत, तर कृष्णवर्णीय लोकदेखील आमच्याकडे परके म्हणूनच बघतात.' एक थाई मुलगी म्हणाली.

...'परके'! मला येथील इटर्नल रेव्हेन्यू ऑफिसरने विचारलेला प्रश्न आठवला. तो म्हणाला होता, 'तुम्ही 'रेसिडेंट एलियन' की 'नॉन–रेसिडेंट एलियन ?' त्याच वेळी जाणवले होते की हा फरक केवळ 'अमेरिकन' आणि 'अमेरिकनेतर' असा नाही तर 'आपले' आणि 'परके' असा आहे. अगदी 'ग्रीन कार्ड' मिळवून तिकडे गेलात, नोकरी केलीत, घर केलेत... तरी तुम्ही 'एलियन'च. फक्त रहिवासी एलियन. म्हणजे हा फरक केवळ भौगोलिक किंवा राजकीय नाही, तर भावनात्मक आहे. या आशियायी मुलाना हा भावनात्मक फरकच जाणवत होता; अगदी झोबत नसला तरी कुरतडत होता...

अशा कुरतडण्यातूनच बहुधा एका व्हिएतनामी मुलाने स्वतःची व्यथा सागितली. तो म्हणाला, 'गेल्या वर्षापासून इथे नव्या प्रकारचे अमेरिकन–व्हिएतनामी लोक येऊ लागले आहेत. या नव्या 'व्हिएत–अमेरिकन' लोकांना इथे परक मानल जात नाही; पण आम्ही आता इथे पाच पाच वर्षं राहिलो तरी परकेच आहोत '

'व्हिएत–अमेरिकन म्हणजे काय ?'

'व्हिएतनाममध्ये लढणाऱ्या सैनिकानी ज्यांना आपलं म्हटलं अशा स्त्रिया आणि त्याची मुलं. ही अमेरिकन सैनिकाची मुल आणि त्यांच्या माता ही राष्ट्रीय जबाबदारी मानायच सरकान ठरवलं. ती कुटुबं खास विमानातून इकडे आली. त्यांच पुनर्वसन आता चालू आहे.'

'म्हणजे याना आणि तुम्हाला मिळणाऱ्या वागणुकीत काही फरक पडतो का ?'

'तसा कायद्याचा जो फरक असायचा तो आहे आणि असणार. आम्हाला जाणवतो तो फरक आपला–परका या जातीचा आहे आणि तो तसा बोचला नाही तरी त्यान एकट वाटतं '

'मग तुम्ही आपापल्या देशात परत का जात नाही ?'

'ती पंचाईतच आहे. आम्ही लहानपणापासून इथे राहून अगदी इकडचे झालो आहोत. आता आमचा देशही आम्हाला थोडा अनोळखी वाटतो. त्या लोकानाही आम्ही परके वाटतो.'

¤

असा दोहीकडचा परकेपणा इथल्या भारतीयाच्या वाटघाला आलेला आहे

हा एकटेपणा नाहीसा व्हावा म्हणून त्याचे प्रयत्न चालू आहेत. धर्म, भाषा, साहित्य, सास्कृतिक परपरा, असे आधार एकत्र येण्यासाठी वापरले जात आहेत.

मिनेआपोलिसचे हिंदु मंदिर हा असा एक प्रयत्न. हिंदु म्हणून एकत्र यावे, हिंदु म्हणून एकतेची ऊब अनुभवावी, ही मूळ प्रेरणा. या प्रेरणेतून काही लोक एकत्र आले. त्यानी एक जुने चर्च विकत घेतले. त्याचे मदिरात रूपातर केले व्यासपीठाच्या मागच्या भिंतीला मिळतील तशा देवादिकाच्या आणि साधू स्त्रीपुरुषाच्या तसबिरी लावल्या. दर रविवारी सकाळी ९ वाजता जमायचे. मग सर्वांनी मिळून एक प्रार्थना म्हणायची. सर्वांना वाचता यावी म्हणून ही प्रार्थना रोमन लिपीत कॅपिटल अक्षरात छापली आहे. सर्वांना सोपेपणाने गाता यावे म्हणून हिंदी सिनेमातील एक प्रसिद्ध गीत निवडले आहे. त्यात थोडे बदल केले आहेत. चाल मात्र मूळचीच ठेवली आहे, नवख्यालादेखील यामुळे प्रार्थना म्हणणे एकदम जड जात नाही प्रार्थनेनतर मडळाचे कार्यवाह डॉ. साने येत्या आठवड्याचे हिंदु पचाग, सणवार, महत्त्वाचे योग–उदा आद्य शकराचार्यजयती– अशी माहिती सागतात. नतर भगवद्गीतेचे दहा–बारा श्लोक इग्रजी भाषातरासह वाचून दाखवतात. मग प्रमुख पाहुणा असेल तर त्याचे प्रवचन. शेवटी लहानथोराची उत्स्फूर्त भजने. सरतेशेवटी भोग–प्रसाद. म्हणजे कोणी तरी आणलेले बुफे पद्धतीचे खाणे. आळीपाळीने खाणे आणतात– १२ ते १ ला हा साप्ताहिक कार्यक्रम सपतो.

एकतेच्या दृष्टीने हा कार्यक्रम चागला आहे. धर्म, सस्कृती, परंपरा गाठीभेटी, सुखदु खाच्या गोष्टी, आपापल्या गावच्या आठवणी...खुशाली साऱ्या गोष्टी आपोआप एकत्र येऊन होतात. या कार्याचे श्रेय मुख्यत. मराठी मडळींना आहे. दीक्षित आणि साने याचा उल्लेख आधी आलाच आहे त्याच्या जोडीला सुहास आणि सौ. रजनी पाटणकर, सौ. इदिरा जुधरे, श्री. पोंक्षे याचा उल्लेख करायला पाहिजे. प्रा. मागलिकासारखे हिंदी भाषिकही आहेत; पण मुख्यतः या मेळाव्यात मराठी लोक फार आहेत.

मराठी म्हणून प्रथम याचा अभिमान वाटला. नंतर मात्र वाटले, वाटत राहिले, हे काही बरोबर नाही. आधीच परदेशात (स्वदेशातही) आपण भारतीय म्हणून एकतेने उभे राहत नाही. अमेरिकन शीखसघटना वेगळी. अमेरिकन मुस्लिम संघटना वेगळी. धर्मभावनेने एकत्र आलेल्या या सघटनात राष्ट्रभेद व राष्ट्राची अस्मिता, या बाबी गौण ठरतात. निदान हिंदु भारतीयानी एकत्र यावे, तसेही होत नाही तमिळ सघटना, बगाली सघटना आहेत त्याचे काम जोरात आहे; परंतु विश्व हिंदु परिषदेची अधिवेशने भरत असूनही हिंदु या एका भूमिकेवर अमेरिकेतील सारे हिंदु–भारतीय एकत्र आले आहेत असे म्हणता–मानता येणार नाही !

¤

धर्म म्हणा, राष्ट्र म्हणा, भाषा म्हणा, माणसाना भावनात्मक समाधानासाठी यापैकी कशाची तरी ऊब लागते असे दिसते. यापैकी भारताच्या राष्ट्रीयत्वाची ऊब अजून तयार झालेली नाही. शे–दोनशे वर्षांनी बहुधा होईल; पण अजून तरी तशी ऊब तयार झालेली नाही.

मात्र, याबाबत आपणास फार अपयशी, अपराधी वाटण्याचे कारण नाही. अमेरिकेचेच बघा. हा देश नवाकोरा जन्माला आला. येथे आलेले बहुतेक सारे एका धर्माचे, एका भाषेचे. देशाला दोनशे वर्षं झाली. पैसा आहे सुबत्ता आहे. सारी आधुनिक सुविधा आहे आणि तरीही साऱ्या प्रकारचे भेद या देशात

तीव्र आहेत. कृष्ण-धवल भेद आहे मूळ रक्तवर्णी आणि परके यूरोपीय हा भेद आहे. शिवाय जर्मन, इटालियन, आयरिश, स्कँडिनेव्हियन, चिनी, जपानी असे वांशिक आणि राष्ट्रिक भेद आहेत पूर्वेकडले विरुद्ध पश्चिमेकडले, उत्तरेचे विरुद्ध दक्षिणेचे, असेही भेद आहेतच

सामाजिक क्षेत्रात या अस्मिता कार्यकारी असतात. निवडणुकात त्याचा प्रभाव जाणवतो न्यायदानात देखील विरोधी निकाल गेला की, अमुक वशीयाचा पद्धतशीर काटा काढला जात आहे, अशी हाकारी केली जाते तरीही, ते सारे भेद पोटात घेऊन नवे अमेरिकी राष्ट्रीयत्व उदयाला आले आहे, विकास पावत आहे: त्याची नवी परपरा निर्माण होते आहे. येत्या दीड-दोनशे वर्षांत भारताचे राष्ट्रीय व्यक्तिमत्त्व विकसित होईल असे मानायला मुळीच हरकत नाही.

हे मी कशाच्या आधारावर म्हणतो? माझ्या अवघ्या तीन-साडेतीन महिन्याच्या वास्तव्यात मला या येऊ घातलेल्या नव्या भारतीयत्वाचा स्पर्श झाला म्हणून—

अमेरिकेतील भारतीयाना-बहुधा सर्व परदेशी भारतीयाना-दोहीपेक्षा परकेपणा जाणवतो, हे मी आवर्जून लिहिले आहे. असा परकेपणा कोणालाही जाणवणारच. अशा परकेपणातून एकलेपणा आणि पोरकेपणादेखील निर्माण होऊ शकतात. श्रेष्ठ साहित्यकार स्टीफन झ्वाइगचे असेच झाले. ज्यूविरुद्ध हिटलरने अमानुष हत्याकाड आरभले, तेव्हा स्टीफन स्वाइग जर्मनी सोडून अमेरिकेत आला आला खरा, पण त्याचे मन या देशात रमेना आल्प्सच्या शिखरानी वेढलेले त्याचे बालपण त्याला सारखे खुपणारे 'द वर्ल्ड ऑफ यस्टरडे' या आत्मवृत्तातील त्याचे करुणरम्य निवेदन आपण बहुतेकानी वाचले आहे. शेवटी नव्या देशातही नवी सुखवस्तु राहणी त्याला असह्य झाली. त्या पोरकेपणात त्याने आत्महत्या केली!

आज प्रत्येक परदेशी भारतीयाच्या मनात एक स्टीफन झ्वाइग आहे, तो आपण समजून घेतला पाहिजे. आज एक तर आपण परदेशी गेलेल्याची टिंगल तरी करतो, नाही तर हेवा तरी आपण खरे तर त्यांना समजून घेतले पाहिजे त्याना भावनेचा आधार आणि ऊब दिली पाहिजे. असे जर त्याना मिळाले तर, त्याच्यापैकी प्रत्येक कुटुब म्हणजे भारताची खाजगी वकिलात होईल, वकिलातच नव्हे, परदेशी छोटे भारत—राष्ट्र होईल. इतक्या खोलवर याचे भारतीयत्व रुजले आहे इथे ते जितके जास्त काळ राहतात, तितके तितके हे भारतीयत्व त्याना जास्त जास्त कळत जाते त्याचे महत्त्व कळत जाते. या भारतीयत्वाचा स्पर्श पुन्हा पुन्हा व्हावा, नव्याने व्हावा, नव्या सदर्भात व्हावा अशी तीव्र आकाक्षा त्याच्या मनात तयार होते आमच्यासारखे दोन किरकोळ भारतीय भेटले तरी उल्हासतात. येथपासून तो निवृत्तीनतर भारतात येऊन बाबा आमटे याच्या किंवा त्याच्यासारख्या क्षेत्रात सेवामय वर्षे काढावी अशी स्वप्ने वर्षानुवर्षे मनाशी बाळगतात त्याचा एक प्रकारचा विसार म्हणून पाच पाच हजार डॉलर्स जमा करून बाबा आमटयाकडे पाठवतात!

हे पाहून बरे वाटत होते आजपर्यंत कधी नष्ट न झालेली आणि प्रत्येक नव्या आव्हानाच्या वेळी नवे धुमारे फुटणारी आमची सस्कृती आहे, असे कार्लटनला मी अभिमानभराने सागितले होते. अमेरिकन भारतीय माझा अभिमान खरा, साधार ठरवीत आहेत, हे इथे सागायला मला आणखीनच अभिमान वाटतो आहे

या आपल्या बाधवानी स्टीफन झ्वाइग व्हायचे नाकारले आहे. ते परके झालेले असले तरी पोरके झालेले नाहीत अमेरिकन जीवनात त्याना यशस्वी व्हायचे आहे. ते यशस्वी झालेही आहेत आणि याबरोबरच त्याना भारतीयही राहायचे आहे अशिक्षित—सुशिक्षित, कष्टजीवी—बुद्धिजीवी, पारपरिक—आधुनिक साऱ्या भारतीयाची ही इच्छा आहे—आपण भारतीय असावे. भारताने आपणास हक्काने आणि अभिमानाने भारतीय म्हणावे.

मला वाटते, आपण लोक, आपले सरकार विशेषत: आपले दूतावास याबाबतीत जेवढे करायला पाहिजे, तेवढे करीत नाही. त्या त्या देशातल्या भारतीयत्वाशी आतरिक धागा जुळविण्याचा प्रयत्न करीत नाही. तरुण वीर रवींद्र म्हात्रे याचा खून झाला, तेव्हा इथल्या असख्य भारतीयाप्रमाणे इग्लडमधील भारतीयानाही असेच जाणवले होते भारतीयत्वाचा आतरिक धागा अजून फार दुबळा आहे.

¤

परतताना या भारतीयत्वाचा स्पर्श माझ्या अगभर भरून राहिला होता. मिलवॉकीत आल्या आल्या फोन आला. मराठीत 'आम्ही काहीजण नेमाने ज्ञानेश्वरी वाचतो. आपलं मराठीत व्याख्यान हव आहे.' मी तत्काळ होकार दिला होकार दिला हे नवल नव्हे. महाराष्ट्रातच मी आहे, असा अनुभव मला आला हे मात्र नवल!


ग्रामीण भागात
डॉक्टर्स नेण्याचा प्रयत्न
भारतात प्रथम
डॉ. आयडानी केला.
त्यांच्या त्यागमय
जीवनाची कहाणी.


डॉ.
आयडा स्कडर
सौ. वीणा गवाणकर
बावीस रुपये

राजहंस प्रकाशन
१०२५ सदाशिव पेठ, पुणे – ३०.

वैराण मुलुखाचे
सुजलाम् सुफलाम् भूमीत
रूपांतर करणारा
थोर निग्रो संत आणि शास्त्रज्ञ
डॉ. कार्व्हर याचे प्रेरणादायी
चरित्र.

एक होता
कार्व्हर
सौ. वीणा गवाणकर
तीस रुपये

राजहंस प्रकाशन
१०२५ सदाशिव पेठ, पुणे – ३०.



# कोणार्क
## स्तब्ध गरगरे चक्र रथाचे !

● अशोक कृष्णाजी कुलकर्णी ●

कलकत्त्याहून आम्ही 'कोणार्क'ला जायला निघालो.

कोणार्क आहे भारतातील ओरिसा राज्यात. ओरिसाची राजधानी जरी 'भुवनेश्वर' असली तरी 'कटक' हे ओरिसातील एक प्रमुख शहर आहे. तेथे जाळीदार चांदीच्या उत्तमोत्तम वस्तू मिळतात अशी माहिती आमच्या ग्रुपमधील स्त्रियांनी आणली. झालं ! कलकत्त्याहून निघाल्यापासून तीच चर्चा सुरू झाली...

'कोणार्कला जाऊन बघायचं काय तर तुटक्या देवळांतल्या फुटक्या मूर्ती ! त्याऐवजी कटकला गेलो तर चांदीच्या जाळीदार वस्तूंची खूप खरेदी करता येईल !'... एक मस्थुल्ललना.

'कोणार्कबरोबर जगन्नाथपुरीही रद्द करायला काऽही हरकत नाही.' तिचीच सहेली.

'नाही हं, पुरीची यात्रा करायलाच हवी, चार धामांपैकी एक धाम आहे ते !' जकातदार आजी.

'कोणार्कचं मंदिर आहे कसलं पण ?' राजेशबाबूंचा पृच्छा.

'सूर्याचं !' डी. के. सरांचं उत्तर.

'आता सूर्योपासना राहिलीय कुठे ? कोणार्क रद्द करायला काहीच हरकत नाही.' आणखी एक पुरंध्री.

मी तर कोणार्क पाहण्याच्या उमेदीने ह्या कंटाळवाण्या प्रवासाला तयार झालो होतो. त्यामुळे या चर्चेमुळे वैतागून मी ओरडलो, 'कोणार्कसारखं शिल्पाकृतींनी नटलेलं सुंदर मंदिर रद्द करायचं ? आणि तेही फालतू खरेदीसाठी ? तुम्हा बायकांची तरी कमाल आहे !'

'अहो, ओरडता काय असे ?' सौ. अनुराधाशिवाय दुसरं कोण असं खेकसणार ?

'तुम्ही पुरुष आमच्या 'कटक'च्या खरेदीत असे 'कटका'सारखे वाटेत याल असं वाटलं नव्हतं !' निर्मलाबाईंचा रिमार्क.

या सर्व वादावादीवर प्रमोदरावांनी मार्ग काढला. प्रथम पुरी कोणार्क पाहायचं मग परतीच्या वाटेवर 'कटक' खरेदी करायचं असं त्यांनी ठरवलं.

'खरेदी परतीच्या वाटेवर बरी, ओझं सतत वाळगायला नको.' शुभदावहिनी म्हणाल्या.

त्या वादावादीत, संवाद–विसंवादात पुरी केव्हा आलं कळलंच नाही. त्या दिवशीच्या रात्रीचा मुक्काम या समुद्रतीरीच्या पुरीतच होता.

रात्रीची जेवणं उरकून आम्ही सर्व जण चंद्रप्रकाशात समुद्रतीरी गप्पागोष्टी करायला बसलो. शीतल चंद्रप्रकाशाशिवाय दुसरा कुठलाही प्रकाश तेथे नव्हता. समुद्राच्या लाटांच्या आवाजाशिवाय दुसरा आवाज नव्हता. किनाऱ्यावर आमच्याशिवाय दुसरं कुणीच नव्हतं. जसा काही आपल्याच मालकीचा हा किनारा... अशा वृत्तीत सगळे आरामात बसलो होतो. उद्या सकाळी कोणार्क पाहायला जायचं होतं त्यामुळे विषय तोच निघाला. प्रत्येक जण आपल्याला ठाऊक असलेली माहिती सांगू लागला...

भारतात खूप फिरलेले अण्णा गाडगीळ म्हणाले, 'भारतात सूर्यमंदिरे अशी फारशी नाहीत. प्रसिद्ध असलेली फक्त दोनच महत्त्वाची सूर्यमंदिरे ! एक भारतात पश्चिम किनाऱ्यावर गुजराथमध्ये 'मोढेरा' इथे आहे आणि दुसरं पूर्वकिनाऱ्यावर उद्या आपण पाहाणार असलेलं कोणार्कचं मंदिर.

प्रभाताईंचं पुराणवाचन खूप. त्या म्हणाल्या, 'या कोणार्क क्षेत्राचं वर्णन ब्रह्मपुराणात 'कोणादित्य क्षेत्र 'या नावाने आलंय बरं का ! आणि पुराणात या क्षेत्राची कथाही आहे.'

कथा म्हटल्यावर सर्व जण सावरून ऐकायला बसले. प्रभाताईंनी कथा सुरू केली.

'पुराणकाली श्रीकृष्णपुत्र सांब अतिशय देखणा होता. एकदा दुर्वासऋषि द्वारकेला आले असताना त्यांच्या विचित्र रूपाकडे पाहून सांबाने त्यांची नक्कल करून त्यांना वेडावले. दुर्वासऋषींनी संतापून सांबाला 'कुष्ठरोगी होशील !' असा शाप दिला. सांबाला कुष्ठरोग झाला.

कुष्ठरोगातून मुक्त होण्यासाठी नारदाने सांबाला चंद्रभागेतीरी असलेल्या कोणादित्यक्षेत्री सूर्योपासना करावयास सांगितली. ही चंद्रभागा आपल्या पंढरपूरची नव्हे बरं का ! ही एके काळी कोणार्कमधून वाहत असलेली नदी. आता ती नाही आहे; पण त्या काळी सांबाने या कोणादित्यक्षेत्री अनेक वर्षे

खडतर तपश्चर्या केली सूर्य त्याला प्रसन्न झाला साबाला कुष्ठमुक्ती मिळाली. सूर्याने साबाला सागितले, 'चद्रभागानदीत माझी मूर्ती तुला मिळेल. तिची तू स्थापना करून पूजा कर!' त्याप्रमाणे साबास चद्रभागेत स्नान करीत असताना कमळावर बसलेली सूर्यमूर्ति मिळाली. साबाने नदीकाठी त्या मूर्तीची स्थापना करून त्या काळी तेथे देऊळही बाधले होते.'

''कोणार्क' या नावाचा अर्थ काय?'– शुभदावहिनीनी विचारल.

'जगन्नाथपुरी आणि भुवनेश्वर ही चक्र-क्षेत्रे म्हणून प्रसिद्ध आहेत याच्या ईशान्येच्या कोनावर अर्क म्हणजे सूर्य स्थिर झाला आहे म्हणून या स्थानास कोणार्क अस नाव पडल'– प्रमोदरावानी उत्तर दिल.

'सध्या कोणार्कला जे पडित मदिर आहे त्याची कथा माहिती आहे का तुम्हाला?'– मी विचारल.

'तुम्हाला माहिती असेल तर सागा की. कथा ऐकायला आम्हाला आवडेलच'– हेमाताईंनी फर्मावल.

### कोणार्कला जाण्यापूर्वी

मी सुरुवात केली...

'या ओरिसा राज्याला पूर्वी कलिंग अथवा ओड्र अस नाव होत. या देशातील गगवशीय राजा पहिला नरसिंहदेव (इ स. १२३० ते १२६४) याच्या काळात यवनानी उत्तरभारत व्यापला होता; पण त्याना हा ओड्र प्रात जिंकता आला नव्हता. त्यानी खूप लढाया केल्या. अशाच एका लढाईत यवनावर मिळालेल्या विजयाप्रीत्यर्थ नरसिंह-देवाने या कोणार्कक्षेत्री सूर्यमदिर बाधायच ठरवल...'

सर्वांना कथेत रस आहे की नाही ते सर्वांवरून दृष्टि फिरवून मी अजमावून घेतल आणि कथा पुढे सुरू केली.

'. राजाने आपला प्रमुख स्थापत्यकार व शिल्पकार विशुमहाराणा याला बोलावून हे मदिर बाधण्यास फर्मावल. त्याच्याबरोबर एकूण १२०० कलाकार दिले. सर्व कलाकाराना मदिर पूर्ण झाल्याशिवाय कोणार्क सोडायचे नाही अशी आज्ञा दिली. आपली बायका–मुले याना राजधानीत सोडून सर्व कलाकार कोणार्कला हजर झाले. छिन्नी-हातोडे चालू झाले. वर्षांमागून वर्षे लोटू लागली.'

'इकडे राजधानीत मुख्य कलाकार विशु-महाराणाचा पुत्र धर्मपद वाढू लागला. तो सारखी आईकडे आपल्या वडिलाची चौकशी करी. त्याच्या सततच्या चौकशीला कटाळून आईने त्याला त्याच्या वडिलाची आणि ते करीत असलेल्या महान कार्याची माहिती दिली. एकदा वडिलाची माहिती झाल्यावर त्याने वडिलाकडे जाण्याचा हट्ट सुरू केला. तो १४ वर्षांचा झाल्यावर आईने त्याला आपल्या दारी असलेल्या वेगळ्याच जातीच्या बोराच्या झाडाची बोरे काढून दिली आणि कोणार्कला वडिलाचा शोध घेऊन त्याना ती बोरे देण्यास सागितले'

'बोरे घेऊन धर्मपद कोणार्कला आला त्याने तेथील रक्षकाला ही बोरे विशुमहा-राणा यानाच द्यायची आहेत असा हट्ट धरला रक्षकाने ती बोरे विशुमहाराणाना दिली. त्यानी त्या बोराची चव ओळ-खली आणि बोरे आणणाऱ्याला आपणाकडे घेऊन येण्यास सागितले. पिता–पुत्राची भेट झाली. ओळख झाली. धर्मपद पित्याबरोबर तेथेच राहू लागला. शिल्पकामात रस घेऊ लागला.'

'मदिर बाधायला सुरुवात करून आता सोळा वर्षे होत आली मदिराची उभारणी पूर्ण होत आली. गर्भगृहाच्या शिखरावरील आमलक व त्यावरील कळस बसवायचा होता. इतर कारागिराच्या मदतीने विशु-महाराणाने तो आमलक शिखरावर बसवला आमलक वर बसताच सर्व मदिराला हादरे बसू लागले. शिखरावरील आमलक शिख-राची नुकसानी करीत धाड्दिशी खाली पडला! हा प्रकार दोन–तीनदा घडला. सोळा वर्षे झाली. मदिरातील देवमूर्तीच्या प्राणप्रतिष्ठेचा मुहूर्त जवळ येत चालला. अजून मंदिर पूर्ण झाले नाही म्हणून सतापून राजाने निरोप पाठविला, 'जर मुहूर्ताच्या दिवसाच्या आत मदिर पूर्ण झाले नाही तर सर्वच्या सर्व कलाकाराचे हात तोडण्यात येतील!'

समुद्राच्या घनगभीर आवाजाच्या पार्श्व-भूमीवर सर्वजण उत्सुकतेने माझे कथाकथन ऐकत होते...

'विशुमहाराणा चिंतेत होता. मदिराच्या कळसाचा हा आमलक बसवायचा कसा या चिंतेने त्याला झोप लागेना. ही स्थिती धर्मपदाने पाहिली. त्याने वडिलाना विचा-रले, 'हा आमलक कसा बसवायचा ते मी सागू का?'

विशुमहाराणाने आश्चर्याने मुलाकडे पाहिले; पण पाहू या तरी, हा काय म्हणतो, ते! असा विचार करून त्याने मुलाचे म्हणणे ऐकले. 'आमलकाच्या पाकळ्याची आतील बाजू बाहेर करून ते या जागी घासून बसवले तर तो आमलक व्यवस्थित बसेल!' मुलाच्या सागण्यातील तथ्य जाणून विशुमहाराणाने मुलाला या कामात सर्व कारागिराची मदत दिली. आश्चर्य म्हणजे आमलक अगदी व्यवस्थित बसला! मंदिर पूर्ण झाले, पण आता सर्व कलाकाराना भीती वाटू लागली की, एका लहान मुलाने हे मदिर पूर्ण केले हे राजाला कळले तर राजा आपल्या सर्वांचे हात तोडून टाकेल! कलाकारानी आपली भीति विशुमहाराणा-कडेही बोलून दाखविली. या बाबतीतली कुणकुण धर्मपदाच्या कानी गेली. त्याबरोबर त्याने कुणालाही न सागता चंद्रभागानदीत जीव दिला आणि कलाकाराना राजाच्या क्रोधापासून वाचविले. आता या कथेची साक्ष देणारी 'चद्रभागा केव्हाच वाळवटात लुप्त झाली आहे आणि मदिरही भग्न झाले आहे!'

'हे मदिर कुणी तोडल?' शामलाबाईंनी विचारल.

'दतकथा अशी आहे की कुणी तरी 'काळापहाड' नावाच्या यवनराजाने हे मंदिर उध्वस्त केल मुख्य म्हणजे हा राजा मुळात हिंदू होता यवन प्रेयसीशी लग्न करून तिला हिंदू धर्मात आणण्याचा त्याने प्रयत्न केला; पण ते जमल नाही. म्हणून हिंदू धर्मावर भडकून तो स्वत: तर मुसलमान झालाच, पण त्या सपाट्यात त्याने हिंदू देवळही उध्वस्त केली. त्यात याही देवळाचा विध्वस झाला!'– मी माहिती दिली.

'नतरच्या काळात या देवळाचा जीर्णो-द्धार कसा कुणी केला नाही?'– शामला-बाईंनी विचारलं.

'त्याचं कारण म्हणजे पुढील काळात सूर्योपासनाही मागे पडत गेली.' डॉ. परा-जप्यानी सागितल.

'सूर्योपासना कशी काय मागे पडत गेली ते सांगा ना डॉक्टर !'– मी म्हटलं.

'सूर्योपासनेचा सर्वात जुना आधार ऋग्वेद आहे. त्यात सूर्यावर अनेक ऋचा आल्या आहेत. 'मोहेनजोदडो' काळात सूर्य-चक्र, स्वस्तिक, उडणारा पक्षी (सूर्य पूर्वेकडून पश्चिमेकडे उडत जातो म्हणून) अशा प्रतीकरूपात पूजला गेला. गुप्तकाळात सूर्योपासना जोरात होती. गुप्तकाळानंतर सूर्य त्रिमुखी स्वरूपात आला. पुढे त्या मुखाना ब्रह्मा, विष्णु, महेश अशी नावे मिळाली. उदयापूर्वीच्या सूर्याच्या स्वरूपास 'भग' हे नाव आहे. त्यापासून भगवान, भागवतधर्म आला त्यातूनच पुढे विष्णुस्वरूप आले. विष्णु या शब्दातील 'वि+स्नु' या रूपाचा अर्थच 'उडणारा पक्षी'–म्हणजेच सूर्य ! याचाच अर्थ असा की, सूर्योपासनेचं रूपातर विष्णुउपासनेत झालं हे घडल मध्ययुगानंतर. सूर्यकिरण-विष्णूच्या पायात रूपातरीत झाले, सुवर्णरंग पीताबरात आला, सूर्याचे रूप चक्रात आले, सूर्याचे उडणे गरुडात रूपातरित झाले आणि जसजसे हे रूपातर परिपूर्ण होत गेले तसतशी सूर्योपासना मागे पडत गेली.'– डॉक्टरानी माहिती दिली.

या सर्व चर्चेमुळे कोणार्कला जाणाऱ्याचा विरोध बोथटला आता रात्रही बरीच झाली होती. सारा आसमंत झोपी गेला होता. प्रमोदराव जाभई देत म्हणाले, 'रात्र बरीच झाली. उद्या कोणार्कला जायचय ना ? चला जाऊन झोपू या !'

सर्वजण उठले. हॉटेलात परतून आपापल्या खोल्यात झोपी गेले

## रथमंदिर, नटमंडप

दुसऱ्या दिवशी कोणार्कला जायला सगळेच उत्सुक होते. आम्ही बसने निघालो. काही वेळा रस्ता समुद्रकिनाऱ्यानेही जात होता. सोनेरी वाळूतून माडाच्या राईतून बस चालली होती. मदिर समुद्रापासून तीन किलोमीटर आत असल्यामुळे आता समुद्र दिसेनासा झाला अधूनमधून छोट्या झोपड्या, गावे दिसत होती. प्रवासाचे दोन तास सहजच सपले. बस एके ठिकाणी थावली. तेथे जवळच वडाच्या चार–पाच मोठ्या झाडांनी एका मोकळ्या जागेवर सावली धरली होती. तेथे आमच्या आचाऱ्यांनी स्वैपाकाला सुरुवात केली. एका बाजूला एक–दोन छोटी हॉटेले होती. त्याच्या बाजूला देवाचे फोटो, छोट्या दगडी मूर्ती, देवळाचे रंगीत फोटो विकणारी दोन–चार दुकाने होती. बाकी आजूबाजूला वस्ती फारशी नव्हती.

सकाळी नऊचा सुमार होता. सर्वत्र कोवळी उन्हे पसरली होती. आमच्या डाव्या बाजूला अकरा एकराच्या विस्तीर्ण जागेत कोणार्कचे भव्य मदिर उभे होते हे काळसर-पिवळसर दगडाचे भव्य मदिर निळ्या आकाशाच्या पार्श्वभूमीवर आपले 'ब्लॅक पॅगोडा' हे नाव सार्थ करीत होते.

आम्ही देवळाच्या दिशेने निघालो तो दोन-चार गाइडानी आम्हाला घेराव घातला. हे गाइडलोक या कोणार्कमदिराची माहिती देतात म्हणजे कुठल्या तरी पाच–सहा शिल्पांची माहिती द्यायची, दोन–चार विनोद करायचे आणि टूरिस्टांना देवळाच्या पार्श्वभूमीवर फोटो काढून घेण्यासाठी आग्रह करायचा. फोटोत पैसा जितकाचागला मिळतो त्यामानाने गाइडकीत कमी मिळतो. त्यामुळे माहितीत सखोलता कमी असते. फोटोच्या बाबतीत-सुद्धा फोटो काढण्याच्या त्याच्या जागाही ठराविक असतात. त्याच त्याच ठिकाणी त्यानी अनेकदा फोटो काढल्यामुळे फोटो मात्र चागले आणि ताबडतोब काढून देतात हे गाईडलोक ! शेवटी पोट भरण्यासाठी कराय‌चा हा उद्योग असल्याने लोकाना रुचेल-पचेल एवढी माहिती आणि फोटो एवढ्यावर ते चागला पैसा मिळवत असावेत.

तर आम्ही देवळाकडे निघालो...

ओरिसातील मदिरे ही नागरशैलीची आहेत. या पद्धतीत देवळाचे चार भाग असतात. गर्भगृह अथवा मुख्य मदिर (वियान), सभामडप (जगमोहन), देवापुढे करावयाच्या नृत्य-नाट्यासाठी बांधलेला मडप (नटमडप), मदिरातील देवतेला विविध वस्तू अर्पण करण्याच्या विधीसाठी असलेला मंडप (भोगमडप) हे ते चार भाग. कोणार्कमंदिरात भोगमडप नाही. विमान व नटमडप भग्नावस्थेत आहे जगमोहन बाहेरून ठाकठीक दिसत असला तरी तो ढासळू नये म्हणून त्याला आतून दगडविटांनी चिणून टाकलेले आहे.

नागरशैलीच्या मंदिरातील वरील भाग आतून जरी चौरसाकृती असले तरी त्याच्या चारही बाजूना बाहेरून पुढे आलेले भाग असतात.

एखाद्या मंदिराच्या भिंतीला तीन भाग पुढे आलेले असतील तर त्यास त्रिरथमदिर म्हणतात. एखाद्या मदिरात पाच भाग पुढे आलेले असतील तर त्यास पंचरथमदिर असे म्हणतात.

ओरिसा–शैलीच्या मदिराच्या बाधणीत जसजशी प्रगती होत गेली तसतशी या पुढे आलेल्या भागाची सख्या वाढू लागली. त्यामुळे मंदिराच्या प्लॅनमध्ये पुढे आलेले भाग-मागे गेलेले भाग यांनी अनेक कोपरे वाढू लागले. कोणार्कमदिराच्या भिंती तर अशा शेकडो कोपऱ्यानी नटलेल्या आहेत. हे पुढे आलेले भाग मदिराच्या भिंतीपुरते मर्यादित न राहता ते वर वर चढत कळसापर्यंत जाऊ लागले या शैलीत शिखराचा आकार सरळ निमुळता होत गेलेला नसतो. तो शेवटी थोडा बहिर्वक्र कसाप्रमाणे फुगीर होतो. त्यावर कगोरेदार आमलक, त्यावर कलश व कलशावर मदिरातील देवतेचे आयुध अशी रचना असते.

त्यानतर देऊळ बाधण्याच्या कलेतील प्रगतीमुळे ओरिसातील मदिराची उची वाढू लागली. सहाव्या शतकात छोटी छोटी शिखरे असलेली देवळे बाधली जात. पुढे आठव्या शतकात ३५ फूट उचीच्या मुक्तेश्वरमदिरा-पासून... आणखी उच... आणखी उच... अशा स्पर्धेत मदिरे होऊ लागली. भुवनेश्वर-मधील लिंगराजमदिराची उची १५० फूट झाली या स्पर्धेतील शेवटचे मदिर म्हणजे हे कोणार्कचे मदिर. कोणार्क मदिरातील विमानाची उची २३० फूट होती. त्यावरील शिखर नागरशैलीचे होते

हे सपूर्ण मदिर रथाच्या आकारात बाधलेल होत. ही रथमदिराची कल्पना अर्थातच मोठमोठ्या उत्सवप्रसगी देवमूर्तीची जी मिरवणूक काढीत त्यावरूनच आली असावी. देवमूर्तीची रथातून मिरवणूक काढण्याची प्रथा आजही भारतातील अनेक देवळातून आहे. जगन्नाथपुरीची रथयात्रा तर जगप्रसिद्धच आहे सहाव्या शतकात लिहिलेल्या 'मानसार-शिल्पशास्त्र' या ग्रथात उत्सवासाठी वापरण्याचा रथ उत्तम लक्षणानी युक्त कसा बाधावा याची माहिती दिलेली होती

त्याचाहीं उपयोग हे मंदिर बांधताना केला गेला असावा.

कोणार्कपूर्वीच्या काळातही अशा तऱ्हेची रथमंदिरे बांधली गेलेली आहेत. उदा. आपल्या महाराष्ट्रातील वेरुळचे कैलासलेणे अथवा चिदंबरम्च्या शिवमंदिरातील नृत्य-सभा. कोणार्कचे हे सूर्यमंदिर बांधवून घेणारा नरसिंहदेव हा ओड्र प्रांतातील गंगवंशीय असला तरी त्याचे आजोळ हे दक्षिणेतील 'चोल' घराणे होते. त्यामुळे लहान वयात आजोळी गेला असताना दक्षिणेतील रथ-मंदिराचा ठसा त्याच्या मनावर उमटला असावा. आजोळचा ठसा जीवनाचा किती भाग व्यापतो आणि व्यष्टीमधून समष्टीला गवसणी घालतो याचे कोणार्कचे मंदिर हे उत्तम उदाहरण आहे. त्या वेळी या रथमंदि-राला सात वारांचे निदर्शक असे आकाशात उड्डाण करणारे घोडे होते. सात घोड्यांच्या मागे मंदिराचे सर्व भाग जोडलेले होते. रथाचे सारथ्य करण्यास सूर्याचा सारथी अरुण होता. काळाच्या ओघात आज यातलं काहीही उरलेलं नाही. जे काही उरलेलं होतं ते पाहण्यास आम्ही पुढे चालू लागलो...

आम्ही प्रथम नटमंडपापाशी गेलो. प्रवे-शाच्या पायऱ्यांच्या दोन्ही बाजूंना गज-सिंहांची दोन प्रचंड मोठी शिल्पे आहेत. बसलेल्या हत्तीवर आरूढ झालेला सिंह असं ते शिल्प आहे. गज हे संपत्तीचे प्रतीक आणि सिंह हे सावधानतेचं प्रतीक आहे. सावधा-नता ही संपत्तीपेक्षा महत्त्वाची असल्यामुळे सिंह हा हत्तीवर दाखविलेला आहे. या शिल्पांतील दोन्ही प्राण्यांच्या चेहऱ्यांवरील भावदर्शनही अत्यंत रेखीवपणे शिल्पबद्ध केलेलं आहे. पायऱ्या चढून आम्ही मंडपात गेलो. या मंडपात खांबांच्या चार रांगा आहेत. खांबांतील दगडाच्या थरात दोन दगडांना एकत्र बांधण्यासाठी लोखंडी सळया वाकड्या करून दगडांत खुपसून ठेवलेल्या आहेत. या सर्व खांबांवर विविध वाद्ये वाज-वणारे, नृत्य करणारे स्त्रीपुरुष आहेत. यातील नृत्यमुद्रा या ओडिसी नृत्यकलेवर लिहिल्या गेलेल्या 'संगीतदर्पण' या प्राचीन ग्रंथा-तील अनेक नृत्यमुद्रांशी मिळत्याजुळत्या आहेत. यातील स्त्रीपुरुषांच्या चेहऱ्यांवरील आपल्या कलेतील तल्लीनता अत्यंत उत्कृष्ट-पणे कोरली गेली आहे. या खांबांच्या रांगांचं वैशिष्ट्य म्हणजे सूर्य दक्षिणायनात असो, उत्तरायणात असो अथवा विषुववृत्तावर असो खांबांच्या कुठल्या तरी दोन रांगांतून उग-वत्या सूर्याचे किरण रोज सकाळी सूर्यमूर्ती-वर पडत असत. अशा प्रकारचे दिशासाधन भारतातील अनेक मंदिरांत केलेलं आहे; पण हे वर्षातील विशिष्ट कालापुरतंच मर्यादित असे. म्हणजेच वर्षातील काही दोन-चार दिव-सच सूर्यकिरण मूर्तीपर्यंत पोचू शकतात. येथे मात्र हे वर्षातील सर्व दिवस मूर्तीवर पडावेत अशा रीतीने खांबांची रचना केलेली आहे. यामुळे आणखी एक गोष्ट साध्य होत असेल. ती म्हणजे सकाळच्या प्रहरी सूर्यमूर्तीवर आणि गाभाऱ्यात पडणाऱ्या सूर्यप्रकाशाने मंदिराचा गाभारा उजळून जात असेल आणि सकाळी सूर्यमूर्तीकडे तोंड करून सूर्याची उपा-सना करणाऱ्या उपासकांच्या पाठीवरून खऱ्या सूर्याचे कोवळे किरण ममतेने आपला हात फिरवीत असतील.

नटमंडप पाहून झाल्यावर आम्ही खाली उतरलो...

नटमंडपाच्या प्रवेद्वाराजवळील गजसिंहाचे शिल्प



## शिल्पांची विविधता

मंडपाचा चौथरा पाहू लागलो. मंडपाच्या खालच्या पट्टीवर सुमारे १५०० हत्ती कोर-लेले आहेत. त्यांतील एक हत्ती दुसऱ्या-सारखा नाही! एक हत्ती पिल्लांसह रमत-गमत चाललेला आहे तर दुसरा सोंडेने पाणी उडवीत आहे तर तिसरा सोंडेने झाडाला विळखा घालीत आहे. या पट्टीवर हत्तींना पकडण्याचो खेडा ही संपूर्ण कृती तिच्या सर्व बारकाव्यांसह आली आहे. हत्तींच्या रांगेच्या वरच्या बाजूला सिंहांची व त्यावर घोड्यांचीं रांग आहे. या तिन्ही रांगांतील प्राणी अनेक प्रकारांनी दाखविलेले आहेत. कोणार्कची शिल्पांकित प्राणिसृष्टि हत्ती, घोडे, सिंह या-

शिवाय हरणे, काळवीट, बदक, हस, डुक्कर शिवाय गमतीदार कल्पनिक प्राणी यानी गजबजलेली आहे या सर्व भारतीय प्राण्याच्या शिल्पसृष्टीत एक परकीय प्राणी मानाने मिरवीत आहे तो म्हणजे जिराफ !

हे जिराफ असलेले शिल्पचित्र पाहण्यासाठी मी कुतूहलाने जवळ गेलो मान उच करून पाहू लागलो...

यात हतीवर बसून राजा आलेला आहे राजाचे कोणार्कबदरातील कस्टमअधिकारी राजाला परदेशातून भेट म्हणून आलेला जिराफ दाखवीत आहेत. भारतीय माणसे जिराफाला आणि जिराफ या नव्या देशाला पाहून चकित झालेला आहे.

हे शिल्पदृश्य पाहिल्यावर, सौ. नी विचारलं, ' काय हो, हा जिराफ कसा काय दाखवलाय इथे? यातून काय अर्थ निघत असावा ?'

*मी म्हटल, 'अर्थ सरळ आहे चद्रभागा-नदीच्या मुखावर वसलेल कोणार्क हे त्या* काळातल मोठं बदर होतं. इतिहासकाराच्या मते या मोठया बदरातून सिलोन, जावा, सुमात्रा, आफ्रिका वगैरे देशाशी येथून व्यापार चालत होता त्या व्यापारातूनच कुठल्या तरी आफ्रिकन राजाने हा जिराफ भेट म्हणून पाठविला असावा या जिराफामुळेच कोणार्कमधून परदेशाशी मोठा व्यापार चालत असावा या मताला पुष्टी मिळते.'

'हो हो, या बदरातून मोठमोठ्या जहाजातून व्यापार चालत होताच आणि या मदिराच्या कळसात बसविलेल्या चुबकशिळामुळे समुद्रातील मोठमोठी जहाजे येथील बदरापर्यंत खेचली जात अस मी कुठेतरी वाचलय बर का–' सौ. ने माहिती दिली.

'या चुबकशिळामुळे जहाजे खेचली जात म्हणून दर्यावर्दी लोकानी म्हणे चिडून या मदिराच्या कळसाची मोडतोड केली. त्यामुळं *मदिराचा समतोल ढासळला आणि मदिर* सपूर्ण कोसळले, अशीही दतकथा आहे, पण ही चुबकशिळाची कथा बहुधा सत्य नसावी. कारण त्या वेळची जहाजे जवळजवळ सपूर्ण लाकडाचीच असत. त्यात लोखड अगदीच कमी असे किंवा अजिबात नसे आणि हे मदिर समुद्रापासून तीन किलोमीटर आत आहे. त्यामुळे ही जहाजे समुद्रातून एवढया दूरवरून खेचण्याची ताकद कुठल्याही नैसर्गिक चुबकशिळेत नसते. दुसरा एक भाग म्हणजे य। चुबकशिळा शिखरात असत्या तर देवळात ठिकठिकाणी असलेल्या लोखडी कांबी, तुळया याचा समतोल ढासळला असता आणि देऊळही नीट राहिले नसते. या सर्व कारणामुळे शिखरातील चुबकशिळाची ही कथा कपोलकल्पित असावी असं वाटत ' मी सौ. ला खुलासा केला.

सौ. ने तेवढ्यात माझ लक्ष देवळाच्या आवारात पडलेल्या लोखडी तुळईकडे वेधल. केवढी प्रचड तुळई होती ती ! मी तिच्या आकाराची माहिती काढली ३६ इच घेराची ही तुळई ३५ फूट लाब असून, तिचे वजन ९० टन आहे. अशा प्रकारच्या कमी–जास्त आकाराच्या तुळया देवळात ठिकठिकाणी वापरलेल्या आहेत.

मनात सहजच तुलना झाली दिल्लीला कुतुबमिनारच्या जवळ १६ इच घेराचा २२ फूट उचीचा *१८ टन वजनाचा लोखडी स्तभ* आहे तो भारताच्या राजधानीत असल्यामुळे त्याला खूप प्रसिद्धी मिळाली आणि कोणार्कच्या या तुळया दिल्लीच्या स्तभापेक्षा प्रचड मोठया व जड आहेत एवढच नव्हे तर येथील हवा समुद्राजवळची असल्यामुळे दमट खारट असली तरी या तुळया गजलेल्या नाहीत. अस असूनसुद्धा या तुळयाना प्रसिद्धी नाही ! नशीब एकेकाचे !

नटमदिराच्या चौथऱ्यावरील शिल्पाकृती पाहत पाहत आम्ही पुढे गेलो तो समोर जगमोहनमडपाची भव्य इमारत आली. जगमोहनच्या पायापासून छतापर्यंत भिंतीचा सर्व भाग शिल्पाकृतीनी नटलेला आहे. वरच्या बाजूला 'भद्र' पद्धतीचे शिखर आहे या पद्धतीचे शिखर सूचीच्या आकाराचे असते. त्याला आडव्या असलेल्या आकाराने कमी–कमी होत जाणाऱ्या पायऱ्यासारख्या मजल्याची रचना असते. दोन पायऱ्याच्या मधला *भाग आत गेलेला असतो या शिखरावर* नेहमीप्रमाणे आमलक वगैरे आहेच.

जगमोहनच्या छपराच्या प्रत्येक कोपऱ्यात वादन करणाऱ्या स्त्रिया आहेत. कुणाच्या हातात झाजा आहेत, तर कुणाच्या हातात बासरी आहे. या स्त्रियाच्या शिल्पाकृती संस्कृत साहित्यातील आदर्श स्त्रीसौंदर्याप्रमाणे म्हणजे कृशागी, कृशकटी अशा अजिबात नाहीत. या चारही स्त्रियाचे अवयव स्थूलतेकडे झुकणारे आहेत वयही पस्तिशीची वाटतात, पण त्याची वादनातील तल्लीनता इतकी परिपूर्णतेने चित्रित केली आहे की, आता आपल्याला त्याच्या वाद्यातून सूर ऐकू येऊ लागतील, इतके आपण या शिल्पात बेभान होऊन जातो

या वादक स्त्रियाच्या शिल्पाच आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे ही शिल्पे 'सर्वतोरचित' आहेत ( म्हणजे चारही बाजूनी घडवून काढलेली ) भारतीय शिल्पकलेत देवळात, गुफात, स्तूपावर कुठेही पाहिले तरी सर्वत्र आपणास 'उत्थित' शिल्पेच दिसतात ही शिल्पे फक्त पुढून घडविलेली असतात. आणि ही शिल्पे त्या स्थापत्याचाच एक भाग असतात. हिंदुधर्मात कुणीही ईश्वरी मूर्तीची पाठ पाहू इच्छित नाही त्यामुळे सर्वत्र उत्थित शिल्पेच बनविण्याची पद्धत होती एखादेच शकरापुढील नदीचे शिल्प सर्वतोरचित असे *तेही दुसरा पर्यायच उपलब्ध नाही म्हणून !* यामुळेच या वादक स्त्रियाची शिल्पे वैशिष्ट्यपूर्ण वाटतात.

आता आम्ही जगमोहनाच्या भिंतीवरील शिल्पचित्रे पाहायला सुरुवात केली...

एके ठिकाणी यात्रेला जाणाऱ्या यात्रेकरूच्या बैलगाड्याच दृश्य आहे. काही ठिकाणी यात्रेकरू मेळयातून जाताना दिसत आहेत कुठे कुठे तरुतळी विश्राती घेणारे यात्रेकरू दिसताहेत. एके ठिकाणी एक वृद्ध आजी काठी टेकीत तीर्थयात्रेला निघाली होती. तिची मुलेबाळे तिला वाकून नमस्कार करीत होती. आजीचा एक नातू तर आजीने जाऊ नये म्हणूस तिला घट्ट बिलगला होता दगडात हे इवलेसे अलगद बिलगणे अगदी भावपूर्ण कोरलेले आहे.

आणखी एका शिल्पात देवदर्शनाला आलेले एक जोडपे आहे त्या जोडप्याच्या चेहऱ्यावर देवासमोर आल्याचे तृप्तीचे भाव नीटसपणे दाखविले आहेत

ही शिल्पे पाहता पाहता सहजच वरच्या बाजूला दृष्टी वळवली तो काय !! ...

यत्र, तत्र, सर्वत्र मिथुनशिल्पेच मिथुनशिल्पे ! अगदी रेलचेल नुसती ! भारतात मिथुनशिल्पासाठी खजुराहो प्रसिद्ध आहे; पण तेथे देवळाच्या सपूर्ण शिल्पात दहा टक्केसुद्धा मिथुनशिल्पे नाहीत. येथे मात्र या जगमोहनमडपाच्या सर्व भिंती जास्तीत

जास्त मिथुनशिल्पानी भरलेल्या आहेत. मैथुनाचे येथील विविध प्रकार हल्लीच्या मॉडर्न पोर्नो पुस्तकातसुद्धा मिळणार नाहीत! चुबनात, आलिंगनात मग्न असलेली, एकमेकाचे अवयव कुरवाळणारी नागजोडपी अशी साध्या शृंगाराची शिल्पे येथे आहेत.

एका दृश्यात एका पुरुषाने एका स्त्रीला उचललेली आहे. स्त्री पाठमोरी आहे. तिने पुरुषाच्या मानेभोवती हाताचा विळखा घातलेला आहे. या शिल्पात स्त्री व पुरुषाच्या स्नायूचे आकुचन-प्रसरण वगैरे तर उत्तम आहेच; पण पाहताना अस वाटत की, या क्षणापूर्वी या स्त्रीचा केसाचा अंबाडा हलत असावा आणि आता सभोगाच्या उच्च पातळीवर पोहोच-ल्यामुळे सर्व अवयव स्थिर झाले आहेत. अगदी केसाचा अबाडाही स्थिर राहून त्या जोडप्याच्या सभोगसमाधीचा भग करीत नाही आहे!

एका शिल्पात दडावर रुद्राक्षमाळा बाध-णाऱ्या साधूचे मैथुन दाखवून त्याचे विश्वा-मित्राशी असलेले साम्य दाखविले आहे

नैसर्गिक सभोगाचे विविध प्रकार दाख-विल्यावर कोणार्कच्या कलाकारानी अनैस-र्गिक सभोगाचे (Lesbian स्त्रियाचे मैथुन इत्यादी) प्रकारही दाखविले आहेत आणि हे दोन्ही प्रकार सपल्यावर अतिमैथुनाचे दुष्परि-णाम दाखविण्याचेही कोणार्ककलाकारानी टाळलेले नाही. एका पुरुषाच्या लिंगावर बँडेज बाधलेले दाखविले आहे तर एके ठिकाणी एक स्त्री योनीत होणाऱ्या दाहास थडावा येण्यासाठी श्वानाकडून चाटून घेताना दाख-विल आहे.

अशा या मिथुनशिल्पाचे वर्णन करण्यास लज्जेने आपले शब्द अपुरे पडतात; पण कोणार्कचे कलाकार अपुरे पडत नाहीत! या मिथुनशिल्पातील स्त्रीपुरुषाच्या चेहऱ्या-वरील भावदर्शन, त्याच्या शरिराच्या अव-यवाची प्रमाणबद्धता वाखाणण्यासारखी आहे तरीसुद्धा प्रश्न असा पडतो की, देवळासारख्या पवित्र ठिकाणी अशी ही विविध प्रकारची मिथुनशिल्पे त्याच्या सर्व बारकाव्यानिशी दाखवण्याचे कारणच काय?

कोणार्कमधील गाईड याच उत्तर देताना म्हणाला, 'सम्राट अशोकाने या कलिंग देशाशी जे युद्ध केले त्या वेळी अमाप प्राणहानी झाली युद्ध थावल्यावर युद्धास व जीववास विटून देशातील पुरुष सन्यास घेऊ लागले. देशातील प्रजोत्पादन थाबा-यची वेळ आली. काळ 'परिवारआयो-जना'स उत्तेजन देण्याचा आला म्हणून देवळाच्या भिंतीवर ही मिथुन–शिल्पे काढ-ण्यात आली '

मी गाईडला म्हटलं, 'मग त्यासाठी मिथुन–शिल्पाचे वेगळे म्युझियम बनवता आले असते. देवळाच्या भिंतीवर याची रेल-चेल का?'

गोपाळरावानी त्यावर वेगळच कारण सागितल. ते म्हणाले, 'वीज ही कुमारी असल्यामुळे मिथुनशिल्पे असलेल्या ठिकाणी ती पडत नाही असा त्या वेळी विश्वास होता.

'मग त्यासाठी एखादे मिथुनशिल्प असतं तर चालल असत! हा वात्स्यायनाचा दरबार भरवण्याच काहीच कारण नव्हत!' मी माझ मत सांगितल.

मी अगदी मुळाशी जाऊन विचार करू लागलो ..

माणूस संभोग का करतो?... अर्थात त्याला त्यातून आनद मिळतो म्हणून... या आनंदाच स्वरूप काय असत?... सभोगाच्या अत्युच्च क्षणी पोचल्यावर माणूस स्वत चा मीपणा, अहपणा काही क्षण तरी विसरतो आणि केवळ आनदलहरीत डुबत राहतो... तात्रिक पथीयाच्या मते हा क्षण वाढवीत वाढवीत माणूस समाधीत जाऊ शकतो... मग कुडलिनीशक्ती जागृत होऊन ती शरीरातील एकेका चक्राला भेदू लागते... संभोगकाल वाढवीत कसा जावा व समाधीत कस जावं याच शिक्षण देण्यासाठी तर ही मिथुनशिल्पे येथे नसतील ना?

पण मग अनैसर्गिक मैथुन अथवा अतिमैथुनाचे परिणाम दाखविण्याची काय गरज होती?

या मिथुनशिल्पाचे आणखी एक स्पष्टी-करण अस आहे की, चित्रपटातील हाणा-मारीची दृश्ये पाहिल्यानंतर माणूस थिएटर-बाहेर आल्यावर मारामारी सुरू करत नाही! कारण त्याच्या मनातील हाणामारी कर-ण्याच्या भावनेचा निचरा होऊन जातो. तद्वतच या मिथुनशिल्पावर ध्यान लावून बसल्याने सन्यास घेणाऱ्या माणसाच्या मना-तील कामवासनेचा निचरा होऊन जाई आणि पुढील सन्यस्त आयुष्यातील कार्य तो व्यवस्थित करू शके.

या स्पष्टीकरणावर पुन्हा हाच प्रश्न निर्माण होतो की तरीसुद्धा ही शिल्पे देव-ळाच्या भिंतीवर असण्याच काहीच कारण नव्हतं. त्याचं वेगळ म्युझियम का केलं नाही?'

या मिथुनशिल्पाबाबत एक महत्त्वाची गोष्ट अशी आहे की ही सर्व शिल्पे देवळाच्या भिंतीवर बाहेरील बाजूने आहेत. आत नाहीत. याचा अर्थ असा होऊ शकतो की, देवळाच्या आत जाताना माणसाने आपल्या मनातील वासनाचा त्याग देवळाबाहेर करून देवळात जावे

कोणत्या कसोटीने ही शिल्पे घडवली याच्या विचारात मी दग असताना सौ. अनूने मला हलवले आणि म्हटले, 'अहो, मदिराचा पुढचा भाग पाहायचा नाही का?'

'हो हो, पुढे चलायलाच हवे. पुढची आणखी अप्रतिम असतील–' मी घाईने म्हटल

त्याच वेळी आमच्या ग्रुपमधील 'शशी–शुभा' हे नवे तरुण जोडपे प्रमोदरावाना म्हणत होते, 'अहो, आज रात्रीचा प्रवास रद्द करून रात्री कुठल्या हॉटेलात मुक्काम नाही का करता येणार?'

प्रमोदराव म्हणाले, 'तस कस चालेल? उद्याच आपल नेपाळला जाणाऱ्या विमानाच बुकिंग कलकत्त्याहून झालेल नाही का? रात्री प्रवास करून कलकत्त्याला पोचायलाच हव!'

'आम्ही पुढे निघालो... मुख्य मदिरा-पाशी आलो...

आतापर्यंतच उत्कृष्ट शिल्पकाम पाहिल्यामुळे मुख्य मंदिरातील शिल्पे कशी असतील याबाब-तची माझी उत्सुकता शिगेला पोचली होती.

### तीन सूर्यमूर्ती

जगमोहनमडप आणि मुख्य मदिर या दोन्हीचा चौथरा एकच आहे १९०३ ते १९०७ या काळात मुख्य मंदिराचा शाबूत असलेला भागही भीतिदायक परिस्थितीत उभा होता. त्यामुळे सर्व भाग पाडावा लागला. त्या वेळी ३२ फूट लाबीरुदीच्या चौरस आकाराचे हे मुख्य मदिर होते. वरच्या भागावर ९ चौरस इचाच्या ४० फूट लाबीच्या लोखडी तुळया होत्या. या लोखडी तुळया फोर्जिंग करून जोडलेल्या होत्या. या तुळयाना आत वळलेल्या तुळया जोडलेल्या होत्या. या तुळयावर अतिशय मोठे पूर्ण विकसित असे दगडी कमल ठेवलेले होते. या

कमळाच्या प्रत्येक पाकळीवर सात अश्वांच्या रथावरील छोटया सूर्यप्रतिमा आणि नृत्यांगना कोरलेल्या होत्या. हा सर्व भाग आता तेथे नाही; पण मुख्य मंदिराच्या तिन्ही भिंतींवरील 'परस्वदेवता' अजूनही याच ठिकाणी आहेत. या तिन्ही मूर्ती सूर्याच्याच आहेत. देवळाच्या पाडापाडीच्या वेळी या मूर्तीही खाली पडल्या होत्या; पण पुन्हा त्या पहिल्या जागी बसविल्या गेल्या.

वेदांमध्ये ब्रह्मा, विष्णु, महेश या तिन्ही देवतांचं एकत्रीकरण सूर्यामध्ये आहे असं मानलं जातं. सकाळचा सूर्य हे ब्रह्मरूप, सकाळनंतर संध्याकाळपर्यंतचा सूर्य जीवनदायी. म्हणून तो विष्णुरूप आणि संध्याकाळचा सूर्य महेशरूप मानला जातो. मुख्य देवळाच्या दक्षिण भिंतीवर प्रभातसूर्याची, पश्चिम भिंतीवर मध्यान्हसूर्याची आणि उत्तर भिंतीवर अस्ताचलसूर्याची प्रतिमा आहे.


प्रभातसूर्याचा चेहरा हसतमुख, उत्साही दिसतो. या मूर्तीच्या दंडावर, गळयात, कानात आभूषणे आहेत. डोक्यावरील मुगुटाचा आकारही वेगळाच आहे. कमरपट्टयाला मोत्याचे गोंडे आहेत. या पट्टयाला अव्यंग म्हणतात. इराणी लोक कपडयाच्या आत जो पट्टा बांधतात त्याला 'ऐवीयोंधेन' म्हणतात. भारतीय अव्यंगाचंच हे इराणी रूपांतर असावं. या मूर्तीच्या गुडघ्यापर्यंत धोतरासारखे वस्त्र आहे. पायातील पादत्राण हे गमबूटासारखे गुडघ्यापर्यंत आलेले आहे. या पादत्राणाचं नाव 'उपनत' आहे. सूर्यमूर्तीचं शरीर डोक्यापासून कमरेपर्यंत उघड आहे आणि पाय मात्र वस्त्राने अथवा उपनताने झाकलेले आहेत याची एक गंमतीदार पुराणकथा सौ. प्रभाताईंनी सांगितली...

'विश्वकर्म्याने आपल्या मुलीचं लग्न सूर्याशी करून दिलं. तिला सूर्याचं तेज सहन होईना म्हणून ती रानात जाऊन बसली. विश्वकर्म्याला ही गोष्ट कळताच त्याने सूर्याचे तेज कमी करण्यासाठी त्याला तासून काढायला सुरुवात केली. डोक्यापासून कमरेपर्यंत कसं तरी सूर्याचे तेज सहन करीत करीत विश्वकर्म्याने त्याला तासून काढलं. पुढे सूर्याचं तेज अगदी सहन होईना म्हणून विश्वकर्म्याने सूर्याला तासण्याचं काम अर्धवट सोडून दिलं. सूर्याचे पाय तासावयाचे राहिले म्हणून त्याच्या पायाचं तेज झाकून टाकण्यासाठी ते वस्त्रात अथवा पादत्राणात झाकलेले दाखवतात किंवा सूर्याला कमळात बसलेला दाखवितात.'

'सूर्यमूर्तीचे पाय झाकण्याची ही प्रथा ग्रीक इराणमध्येही आहे'– डॉ. परांजप्यांनी सांगितलं.

या प्रभातसूर्याच्या मूर्तीच्या दोन्ही हातात फुललेली कमळे होती; पण सध्या हे हात तुटलेले आहेत, या सूर्यमूर्तीची शिल्पाकृती बुद्धमूर्तीसारखी वाटते. बुद्धकालीन शिल्पांच्या प्रभावामुळेही हे घडलं असण्याची शक्यता आहे.–सूर्यमूर्तीच्या खालच्या पट्टीवर नृत्य, अथवा वादन करणाऱ्या स्त्रिया आहेत. त्या खालच्या पट्टीवर सात घोडे आहेत व त्यांचे लगाम सूर्याच्या दोन्ही पायांच्या मधोमध बसलेल्या अरुणाच्या हातात आहेत. सूर्यमूर्तीच्या पायाच्या दोन्ही बाजूला राजाराणी हात जोडून बसलेले आहेत. बाजूलाच पहारेकरी आहेत. सूर्यमूर्तीच्या कमरेच्या दोन्ही बाजूंना मिळून सूर्याच्या चार पत्नींच्या म्हणजे उषा, प्रत्यूषा, संध्या, छाया यांच्या मूर्ती आहेत. सूर्यमूर्तीच्या खांद्याच्या बाजूला ब्रह्मा, विष्णूच्या मूर्ती आहेत. अगदी वरच्या बाजूला सूर्याला पुष्पहार अर्पिणाऱ्या विद्याधर मूर्ती आहेत. सूर्यमूर्तीच्या डोक्यावर सिंहाचा चेहरा असलेल्या कीर्तिमुखातून मौक्तिकमाला बाहेर आलेली आहे.

या प्रभातसूर्याच्या संपूर्ण पॅनेलमधील बाकीच्या सर्व मूर्ती सूर्यमूर्तीच्या एकपष्ठांश उंचीच्या आहेत. कोणार्कमध्ये इतर सर्व मूर्तींना वापरलेला दगड फिकट लालसर–पिवळसर रंगाचा, थोडासा सच्छिद्र असा आहे. शिल्पकारीच्या दृष्टीने तो थोडासा मऊही असावा असं वाटतं; पण या पॅनलचा दगड हिरवटसर रंगाचा आणि कठीणही असावा असं दिसतय. यातील शिल्पकारी इतर शिल्पांच्या तुलनेत फारच उच्च दर्जाची आहे. या कोणार्कमंदिरात १२०० शिल्पकार काम करीत होते. त्यामुळे शिल्पकारीच्या दर्जात,



कोणार्क चक्राचा एक अष्टमांश भाग

आवडीनिवडीत फरक असणे स्वाभाविक आहे कोणार्कमंदिर व तेथील हजारो शिल्पे पाहताना आपण त्यात एवढे गुंगून जातो को प्रथम शिल्पकारीच्या दर्जाचा विचारच मनात येत नाही पण या प्रभातसूर्याच्या पॅनेलपाशी आल्यानंतर मात्र दर्जातील फरक तावडतोब जाणवतो अर्थात या मंदिरातील कुठलही शिल्प दुसऱ्या अथवा तिसऱ्या दर्जाच नाही· सर्व शिल्पे चांगली, फार चांगली, उत्तम अत्युत्तम अशा दर्जात येतील. देवळातील खालच्या पट्टीतील हत्ती, घोडे वगैरे शिल्पे चांगली, भिंतीवरील मिथुनशिल्पे फार चांगली. शिखरावरील वादक–स्त्रियाची शिल्पे उत्तम तर प्रभातसूर्य, माध्यान्हसूर्य आणि अस्ताचलसूर्य ही पॅनेल्स अत्युत्तम अशी अर्गवारी होऊ शकेल.

'प्रभातसूर्य' पाहिल्यावर पश्चिम भिंतीवरील 'माध्यान्हसूर्य' पाहिला. हे पॅनेल प्रभातसूर्यासारखेच आहे फक्त माध्यान्ह सूर्याच्या चेहऱ्यावरील भाव उग्र आहेत. या दोन्ही सूर्याच्या अंगावरील दागदागिने, कपडे, पादत्राणे ही तत्कालीन उत्तरभारतीय पद्धतिची आहेत. कारण बृहत्संहितेत सूर्याच्या वेषाचे वर्णन 'उदीच्यवेष' म्हणजे उत्तर भारतीय पद्धतीचा असे वर्णिले आहे

उत्तरेकडील भिंतीवरील प्रतिमा 'अस्ताचलसूर्याची' आहे या सूर्याच्या चेहऱ्यावरील भाव दिवसभराचे काम करून थकल्याभागलेल्या माणसासारखे आहेत. एवढेच नव्हे तर रथाचे इतर सर्व घोडे थकून गेल्यामुळे उरलेल्या एका घोड्यावर सूर्याची स्वारी बसलेली आहे तो घोडाही अडखळत चालला आहे असा भास होतो.

या तिन्ही प्रतिमा पाहण्यासाठी आम्ही बरेच वर चढून गेलो होतो. वरच्या बाजूने गाभाऱ्याच्या खोलीत डोकावले तो आत एक चौथरा दिसला गाईड म्हणाला की, ते सूर्याचे सिंहासन आहे. नेहमीप्रमाणे मी व सौ. तिथे खालपर्यंत जायला तयार झालो. मग आमच्याबरोबर इतरही काहीजण उतरू लागले.

या मंदिरातील मूळ सूर्यमूर्ती या सिंहासनावर होती. ती आता दिल्लीच्या म्युझियममध्ये आहे अस म्हणतात. आता ही कोणार्कची सूर्यमूर्ती म्युझियममधल्या इतर शिल्पाकृतीत बुडून गेली असणार! त्याच वेगळ वैशिष्ट्य ती मूर्ती येथेच ठेवली असती तर नजरेत भरल असत; पण... हे सांगणार कुणाला आणि सांगितल तरी ऐकणार कोण ?

सिंहासनाच्या चौथऱ्याच्या भिंतीही छोट्या छोट्या शिल्पाकृतींनी भरलेल्या आहेत तत्कालीन रोजच्या आयुष्यातील छोट्या–मोठ्या घटनांच्या आणि राजाराणीच्या छोट्या शिल्पाकृती येथे आहेत गाभाऱ्यातील जमीनही गुळगुळीत आहे.

## नवग्रहमंदिर

सिंहासनचौथऱ्यासमोरच जगमोहनमंडपाचा दगडविटांनी चिणून टाकलेला भाग दिसतो मंडपाबाहेरील कलाकृती एवढ्या सुंदर आहेत तर आतील किती सुंदर असतील असा प्रश्न मनात घोळत होता. आता त्या कलाकृती पाहायला मिळण शक्य नाही, पण त्याची थोडी झलक पाहता आली तर पाहावी म्हणून मी व सौ त्या चिणलेल्या भागात गेलो तेथील भिंतीच्या एका कोपऱ्यावरील प्रभातसूर्यासाठी वापरलेल्या, हिरवटसर कठीण दगड वापरून तयार केलेल्या अतिशय कलात्मक नक्षीचा एक भाग दृष्टीस पडला याचा अर्थ जगमोहनमंडपाच्या आतील कलाकृतीसाठी हा उत्तम दर्जाचा गुळगुळीत दगड वापरला असावा आणि १२०० कलाकारातील सर्वांत श्रेष्ठ कलाकारांनी या शिल्पाकृती घडविल्या असाव्यात एवढाच तर्क करणे आज आपल्या हाती आहे!

सूर्यमंदिरातून बाहेर पडल्यावर आवारात इतस्तत पडलेली मोठमोठी हत्तीशिल्पे, मोडके खांब दृष्टीस पडले. शत्रूला आपल्या खुरांनी तुडविणारा अश्व आणि त्या अश्वाला उत्तेजन देणारा योद्धा यांच एक मोठं देखण शिल्पही आवारात आहे अर्थात योद्धयाच शिर अस्तित्वात नाही

सूर्यपत्नी संध्या आणि छाया यांचीही एक छोट मंदिर आवारात आहे. मनात विचार आला संध्या आणि छाया हे अनादिकालापासून चालत आलेले वैदिक काव्य म्हणजे आजच्या वैदिक युगातील Umbra आणि Penumbra तर नव्हेत ?

मंदिराच्या संपूर्ण आवाराच्या थोडस बाहेर उत्तरेला नवग्रहमंदिर आहे. मंदिर म्हणजे त्याला चार भिंती आणि छप्पर आहे एवढच बाकी मंदिर म्हणून प्रेक्षणीय काही नाही. हे सर्व नवग्रह २० फूट लांब, ४ फूट उंच आणि ७ फूट जाडीच्या प्रचंड मोठ्या एकसंध शिळेवर घडवून ती शिळा जगमोहनमंडपाच्या प्रवेशद्वारावर बसविलेली होती. मंदिर कोसळल्यावर ती शिळाही कोसळली मग ही संपूर्ण शिळा कलकत्त्याच्या म्युझियममध्ये नेण्याचे ठरविले; पण एवढ्या प्रचंड आकाराची आणि वजनाची ही शिळा वाहून नेण्यासाठी योग्य ते वाहन मिळेना. मग ती मधोमध कापली तरीही ते दोन तुकडे वाहून नेण जमलं नाही त्यामुळे ती शिळा येथे ठेवून तिच्याभोवती भिंती आणि छप्पर उभ केल

आमचे इतर सहप्रवासी नवग्रहातून काही भविष्यकथन जाणवू शकेल म्हणून तेथे वळले; ... पण तेथे नुसत्या नवग्रहाच्या मूर्ती आहेत! भविष्य कुठल मिळायला ?

हे नवग्रह घडविताना पुराणातील वर्णनाप्रमाणे घडविलेले नाहीत बहुतेकांचे चेहरे सारखेच आहेत. सर्वांच्या डोक्यावर उंच टोकदार मुगुट आहेत. बऱ्याच जणांच्या हातात कमंडलू व जपमाळ आहे सर्वजण कमळावर बसलेले आहेत. सूर्य कमळावर दाखवला आहे ते ठीक आहे, पण चंद्र हंसावर हवा. त्याच्या हातात चंद्राच्या कला हव्यात. प्रत्यक्षात कमंडलू आहे मंगळ बोकडावर हवा. त्याच्या हातात कवट्यांची माळ हवी; पण तोही कमळावरच आहे आणि हातात कमंडलूच आहे बुधाच्या हातात धनुष्य–बाण हवा, बृहस्पती हा बेडूक अथवा मानवी कवटीवर बसलेला हवा; पण तो कमळावरच हवा असुरांचा गुरु शुक्र याची मूर्ती एकाक्ष अशी योग्य दाखविली आहे सूर्य–चंद्र हातात घेतलेला अर्ध्या शरीराचा राहू आणि अर्धे शरीर सर्पाचे असलेला केतू योग्य घडविले आहेत कोणार्कच्या कलाकाराना पुराणाच ज्ञान नसाव हे संभवत नाही. कारण त्याच्या ज्ञानाच्या मंदिरात खाणाखुणा दिसतात; पण येथे हे अस का ? काही कळत नाही!

या नवग्रहशिळेला तिच्या प्रचंड वजनामुळे व आकारामुळे कलकत्त्याला नेता आल नाही मग त्या काळात कुठेही दगड अथवा खडक नसलेल्या या कोणार्कच्या रेताड प्रदे-

शात हे मोठमोठे दगड आणले कसे ? ते घडवून पुन्हा देवळात योग्य जागी बसवले कसे ? त्यांच्याकडे कोणती किमया होती ? जगात अशा प्रचंड स्थापत्याची काही कमतरता नाही इजिप्तचे पिरॅमिडस् आहेतच, पण ईस्टर आयलंडच्या समुद्रकिनाऱ्यावरही खडकाचे नावच नाही ! मैलन् मैल नुसती वाळू पसरलेली या अशा किनाऱ्यावर ३३ फूट ते ६६ फूट उंचीच्या प्रचंड दगडी मूर्ती आहेत. हे एवढे वजनदार दगड आणले कसे ? योग्य जागी बसविले कसे ?

हल्ली अवकाशात जाणाऱ्या अवकाशवीरांना वजनविरहित अवस्थेचा सराव होण्यासाठी गुरुत्वाकर्षणाचा प्रभाव नसलेल्या खोल्या पृथ्वीवर बनवून त्यात अवकाशवीरांना सोडतात ! असाच काहीसा प्रकार कोणार्कच्या कलाकारानी केला असेल का ? देऊळ बांधून होईपर्यंत त्या क्षेत्रातील गुरुत्वाकर्षणाचा प्रभाव कमी केला असेल का ?

या प्रचंड आणि वजनदार मंदिराचा पाया कसा बांधला असेल ? आपल्याला वाटत की पाया खूप खोलवर बांधला असेल, पण प्रत्यक्षात पाया फक्त ५ ते ६ फूट खोल आहे तो मोठमोठ्या दगडगोटयानी भरलेला आहे या प्रचंड वजनाच्या देवळाने पाया कुठे खचला आहे का याची पाहणी काही ठिकाणी खोदून करण्यात आली पाया कुठेही खचलेला नाही. कोणार्कच्या कलाकाराच देऊळबांधणीचं तंत्र किती प्रगत होत याचच हे परीमाण !

सर्व देऊळ पाहून झाल होत. आमच्या ग्रुपमधील बाकी सर्वजण जेवायला जायच्या विचारात होते. आम्ही चालू लागलो चालता चालता मी सौ. ला विचारल, 'या संपूर्ण देवळात आपण अनेक शिल्पाकृती पाहिल्या. तुला कुठली आवडली ?'

सौ. ने विनाविलंब उत्तर दिल, 'रथमंदिराची चक्रे !'

मी म्हटल, 'दे टाळी, मलाही तेच आवडलय !'

सौ. ने टाळी दिली आणि सर्वांनी आमच्याकडे दचकून पाहिले आम्ही थोडे खजिल झालो. तेवढ्यात सौ. ने मला हळूच विचारले, 'अहो, ट्रिपला निघण्यापूर्वी तुम्ही या मंदिराची, मंदिराच्या चाकाची खूप माहिती जमा केली होतीत, त्याशिवाय गाईडने दिलेली माहिती ! ही दोन्ही मला नीट समजून घ्यायचीय आपण पुन्हा चक्रे पाहायला जाऊ या का ?'

'मस्त आयडिया ! आता आपल्याला प्रत्येक चक्र काही पाहता येणार नाही, पण एखादं अगदी नीट पाहू या !'–मी सुचविलं

'काय हो, या रथाला चोवीसच चाके का आहेत ? वीस, तीस, चाळीस अशी दशमानात का नाहीत ?' –सौ ची पृच्छा.

'हे बघ, आपल्या हिंदू वर्षाचे महिने बारा त्या प्रत्येक महिन्यात शुक्ल आणि कृष्ण असे दोन पंधरवडे. म्हणजे प्रत्येक महिन्यासाठी दोन चक्रे अशी बारा महिन्याची चोवीस चक्रे. म्हणजे ही चोवीस चक्रे एक ऋतुचक्र पूर्ण करतात.'– मी

'ते पहा, ते चक्र आल जवळ. त्याच्या वर्तुळाकार कडेवर किती सुंदर फुलापानाच, भौमितिक आकृत्याच नक्षीकाम आहे हे चक्र जवळ आल्यावर केवढं प्रचंड दिसत हो ! या चाकाचा व्यास किती असेल हो ?'–सौ.

'असेल नऊ–दहा फूटच ! तुझ्याजवळच्या त्या पत्रकात किती दिलाय बघ हा, नऊ फूटच ! नऊ फूट व्यास आहे याचा !'– मी.

'या चक्राला बघा आठ मोठे आरे दिसताहेत आणि आठ छोटे आरे दिसताहेत. त्याचा अर्थ काय ?' –सौ. ने बारकाईने चक्राचे निरीक्षण करीत विचारले

'हे चक्र म्हणजे पूर्ण दिवस. आता हा दिवस आठ मोठ्या आऱ्यात विभागला आहे म्हणजे अष्टौप्रहरात विभागला आहे. एक प्रहर म्हणजे तीन तास. आता एक पाहिलंस का, प्रत्येक छोटा आरा हा दोन मोठ्या आऱ्याच्या मधोमध आहे म्हणजे त्याने एक प्रहर विभागला आहे म्हणजे छोटा आरा अर्धा प्रहर म्हणजे दीड तास दाखवितो असा अर्थ होईल–' मी डोक खाजवीत उत्तर दिल.

'या प्रत्येक मोठ्या आऱ्याच्या मध्यभागी एक पदकासारखं वर्तुळ आहे त्यातील शिल्पाकृती पाहिल्यात का ?'– सौ.

'पाहू या बर, ही शिल्पातली स्त्री काय करतेय ? झोपेतून उठून आळस झाडतेय ! ही दुसऱ्या वर्तुळातील स्त्री वेणीफणी करतेय ! अरेच्चा, हे बघ ना, या आठही वर्तुळात मिळून एका स्त्रीची दिनचर्या दाखविली आहे. अगदी सकाळी झोपेतून उठल्यापासून ते आपल्या पतीबरोबर रात्री शृंगार करण्यापर्यंत सर्व दाखवलंय ! आणि या चक्राचा आसही चक्रातून फूटभर बाहेर आलेला आहे आणि त्याच्यावरही छोटी शिल्पाकृती आहेच–' मी.

'अहो, आणखी एक पाहा ! मोठा आरा आणि छोटा आरा याना जोडणाऱ्या वर्तुळखडावर छोटे दगडी मणी आहेत त्याला काही अर्थ असेल का ?' सौ ची जिज्ञासा

'थांब. आपण ते मणी मोजू या. एक... दोन, तीन .. एकोणतीस, तीस ! हा, तीस मणी आहेत'– मी

'म्हणजे मोठा आरा आणि लहान आरा यातल हे अंतर दीड तासाच हे तुम्ही मघाशी म्हणालात किनई ! दीड तास म्हणजे नव्वद मिनिट. नव्वद मिनिटाच अंतर तीस मण्यात विभागलय याचा अर्थ एक मणी तीन मिनिटाचा आहे, हो की नाही ? असाच हिशेब मघाशी आपण केला होता ना ?' सौ.

'हो, आता आपण या चक्राच्या अक्षाशी ही काठी आडवी धरू या आणि तिची सावली कुठे पडते ते पाहू या· ती बघ सावली. मघाशी आपण सर्वांच्याबरोबर हिशेब केला तसा करू या आणि या सूर्यघड्याळात किती वाजले ते पाहू या. आता ११ वाजून ५४ मिनिट झालेली दिसताहेत या सूर्यघड्याळात ! आणि हे मणी एवढे मोठे आहेत की, आपल्याजवळील काठी बारीक असेल तर मण्याच्या एकतृतीयांश भागावरील सावलीही आपण ओळखू शकू ! म्हणजे एका मिनिटापर्यंत वेळ पाहता येईल !' मी सौ.ला समजावून सांगितल.

हे रथचक्र आम्ही दोघानी मनसोक्त पाहिल...

आम्ही कमालीचे भारावून स्तब्धमुग्ध झालो...

काळाच्या ओघात मंदिराची पडझड झाली असली तरी ही रथचक्रे स्वत स्तब्ध राहून अजूनही दिवसाची वेळ दाखवीत गरगरत आहेत. हे चक्र म्हणजे सूर्यघड्याळ आहे हा अर्थही गेल्या काही वर्षातच उलगडला गेला आहे विज्ञानाचा मागोवा घेत जाणाऱ्या या सर्वच्या सर्व चोवीस चक्राचा पूर्ण अभ्यास केला गेला तर अजूनही काही अर्थ उलगडतील

मोहेनजोदडो, हडाप्पा या ठिकाणी आढळलेल्या चित्रलिपीचा अर्थ आजतागायत

उलगडलेला नाही. तशाच कुठल्या तरी चित्रलिपीचा उपयोग करून या मंदिराच्या भिंती चित्रशिल्पांनी मढविलेल्या असतील का? जर या संपूर्ण मदिरातील चित्रशिल्पांचा एकसंध अर्थ उलगडला गेला तर येथील मिथुनशिल्पाविषयी आपणास वेगवेगळे तर्क करावे लागणार नाहीत.

पण आज तरी हे रथमादर... 'एवढे प्रचंड वजनदार मंदिर त्या काळात बांधले कसे? मोठमोठ्या शिळांची वाहतूक कशी केली? मंदिराच्या भिंतीवर हा वात्स्यायनाचा दरबार का शिल्पांकित केला आहे? सूर्याचा भासमान प्रवास पूर्वेकडून पश्चिमेकडे असतो; पण हा सूर्यमंदिराचा रथ पश्चिमेकडून पूर्वेकडे का चालला आहे?'... वगैरे अनेक प्रश्न उभे करीत उभे आहेत!

सूर्यमंदिर पाहून झाले...

आमची बस निघाली...

पण माझे मन अजूनही सूर्यमंदिराच्या चक्रातच गुंग होऊन राहिले होते. एकाच वेळी अप्रतिम शिल्पकलेने मखरलेले आणि सूर्यकिरणांचा अत्यंत चपलखतेने विज्ञाननिष्ठ मागोवा घेणारे ते कसब माझ्या डोक्यात गरगरू लागले. तीन मिनिटांच्या कालावधीपासून संपूर्ण ऋतुचक्र दाखविणारी ही चक्रे मानवी जीवनातील प्रसंग न् प्रसंग त्यात शिल्पाकृतीच्या रूपाने सामावून घेत जीवनाचे विराट भाष्य करीत गरगरत आहे. केवढा हा Social Impact मूर्त केलेला आहे या गरगरणाऱ्या चक्रात!

अजूनही मी वळून वळून मागे पाहात होतो...

मला ते चक्र कमालीच्या प्रचंड वेगाने अंतराळातील न्येबुलाप्रमाणे गरगरत आहे असा भास होत होता... आणि... आणि... माझ्यातील विज्ञाननिष्ठ मीपणही स्वतःभोवती गरगरत राहिले... आणि थोड्या वेळाने तर ते मीपण पार नामशेष झाले... मला भास होत होता... भगवद्गीताकार भगवान श्रीकृष्ण माझ्या कानात ओरडून म्हणत आहेत...

कोणार्कअर्णो मया कृत्वा गुण–कर्म–क्रमांकशः!

□

## पुस्तके

# प्रेरणेसाठी भटकंती

'माणूस' ने दीड वर्षापूर्वी छापलेली लेखमाला– 'प्रेरणा चिपकोची, भटकंती उत्तराखंडाची'– वाचकांना अजून आठवत असेल. डिसेंबर ८२, जानेवारी ८३ या दोन महिन्यांत या मालेतील सात लेख क्रमशः प्रसिद्ध झाले होते. हिमालयातील पर्यावरणाची ओळख करून देणारे जगदीश गोडबोलेयांचे ते एक वेगळ्या प्रकारचे प्रवासवर्णन पुष्कळांना आवडले होते. ते आता पुस्तकरूपाने नुकतेच प्रसिद्ध झाले आहे.

सुभाष अवचटांनी रेखाटलेले या पुस्तकाचे मुखचित्र फार बोलके आहे. एक झाड तोडले गेले आहे. त्या झाडाला एक चेहरा आहे आणि तो वेदनेने व्यथित झाला आहे. झाडाच्या तुटक्या फांदीवर बसलेला, एक छोटासा पक्षी झाडाकडे असहाय्यतेने पाहतो आहे.

अशाच असहाय्यतेने गढवाली आणि कुमाँउनी लोक आपल्या गावच्या तुटणाऱ्या जंगलांकडे काही काळ असहाय्यतेने पाहत होते. कधी तरी, कुणी तरी भावविवश होऊन कोसळणाऱ्या कुऱ्हाडीपासून झाडाला वाचविण्यासाठी त्याला मिठी घातली. मिठी घालणे–चिपकना–'चिपको!' लोकांना मार्ग सुचला! 'चिपको आंदोलन' उभे राहिले.

'चिपको' ने जगदीश गोडबोल्यांना प्रेरणा दिली. जंगलतोडीचे परिणाम हिमालयाप्रमाणे सह्याद्रीसुद्धा भोगतो आहे. मग, हिमालयात जे आंदोलन यशस्वी ठरले, त्यापासून महाराष्ट्रातील ग्रामीण आणि आदिवासी भागातल्या समाज-कार्यकर्त्यांनी का प्रेरणा घेऊ नये? लेखकाने स्वतः चिपकोच्या मुलखात १९७९ व पुन्हा ८० साली मुशाफरी केली होती. आपण जे पाहिले, अनुभवले ते मित्रांना कार्यकर्त्यांना दाखवायला पाहिजे, असे त्याच्या मनाने घेतले. ही कल्पना पुण्याच्या 'महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेने' उचलून धरली. परिषदेने गोडबोल्यांच्या नेतृत्वाखाली पन्नास कार्यकर्त्यांना गढवालमध्ये अभ्यास–मोहिमेवर पाठवले. त्या अभ्यासकांनी ज्या नोंदी केल्या, रोजनिशा लिहिल्या, अहवाल सादर केले त्यांचा हे पुस्तक लिहिण्यासाठी खूप उपयोग झाला, असे लेखकाने पुस्तकाच्या सुरवातीस आपल्या 'मनोगता'त म्हटले आहे.

### साहित्यिक मुशाफिरी

आपल्या सहकाऱ्यांच्या लिखाणाचे संकलन करताना लेखकाने पुरेशी खबरदारी घेतलेली नाही. त्यामुळे प्रवासवर्णनाचा एकसंधपणा न जाणवता ते तुटक झाले आहे. आणि काही जागी काही मुद्द्यांची पुनरुक्ति जाणवते. याउलट, पन्नास निरीक्षकांचे काही अनुभव तरी एकमेकांना काटशह देणारे असतील, ही आपली साहजिक अपेक्षा; परंतु सर्वांचे अनुभव जंगलतोड व पर्यावरण यांच्यातील एका विशिष्ट कार्यकारणसंबंधाला पूरक ठरले, असा लेखकाचा दावा दिसतो. इतकी सुसंगती कशी शक्य आहे?

अर्थात हे पुस्तक म्हणजे अनेकांच्या अभ्यासावर आधारित एक सुसंगत प्रबंध आहे, असा काही लेखकाचा दावा नाही. हे पुस्तक मूलतः एक साहित्यिक मुशाफरी आहे आणि त्यामुळेच ते वाचनीय झाले आहे. या मुशाफरीत मॅगसेसे पारितोषिकविजेते चंडीप्रसाद भट भेटतात. 'मूल जसं आईचं दूध पितं, रक्त नाही शोषत, तसा वनसंपत्तीचा मर्यादित उपयोग छोट्या उद्योग-धंद्यांसाठी करण्याचा' आग्रह चंडीप्रसादजी धरतात. प्रत्यक्षात सर्वोदयी-नेते सुंदरलाल बहुगुणा इथे भेटतात. 'व्यापारी जंगलतोडीस संपूर्ण बंदी असावी,' असा सुंदरलालजींचा आग्रह आहे. रेणीगावच्या आंदोलनाचे नेतृत्व केलेल्या गौरादेवींचे शब्दचित्र लेखकाने छान रंगवले आहे. 'आमच्या गावाने स्वतःची वीज–निर्मिती करून शासकीय मक्तेदारीविरुद्ध एक प्रकारे सूचना दिली आहे,' असे आत्मविश्वासाने सांगणारे दोगडी गावचे आनंदसिंह विष्ट इथे दिसतात. होळीच्या दिवशी वृक्षारोपण करून एक नवा पायंडा पाडणारे तंग-

सारे गावकरी इथे आहेत.

सर्वांत चटका लावणारा प्रसंग लस्यालगावचा आहे तिथल्या दलीवसिंगाच्या घरी गोडबोले मुक्कामास गेले त्याच दिवशी दलीवसिंगाची मुलगी 'दाना' मृत्युमुखी पडली. दानाच्या नावाने टाहो फोडून घरातल्या स्त्रियांनी केलेला आक्रोश, शेजारच्या खोलीत आपली झालेली कानकुडी अवस्था, आपल्या पाहुणचारात कसूर होऊ नये म्हणून त्याही परिस्थितीत चाललेली दलीवसिंगची धडपड, याचे वर्णन गोडबोल्यांनी फार हळुवारपणे केले आहे अशाच हळुवारपणे वर्णन केलेली दुसरी हकिकत म्हणजे अडीचशे वर्षांपूर्वी जोधपूरजवळ विश्नोई जमातीच्या साडे–तीनशे स्त्री-पुरुषांनी आपली झाडे वाचवण्यासाठी केलेल्या बलिदानाची कहाणी होय, पण एक जाणवते. ऐकीव कहाण्यांपैकी खरे काय आणि काल्पनिक काय, याचे तारतम्य बाळगण्याऐवजी त्या कथा अधिक भडक रगवण्याकडे लेखकाचा कल आहे. उदाहरणार्थ, रेणी गावातल्या स्त्रियांनी जगल वाचवण्यासाठी ठेकेदाराच्या मजुराबरोबर कसा सामना दिला त्याचे वर्णन वास्तवापेक्षा भडक वाटते.

एकीकडे गभीर तत्त्वचर्चा करण्याचे व ती सुसह्य व्हावी म्हणून जाता जाता चुटके व किस्से कथन करण्याचे कसब लेखकाकडे आहे. एका बाजूस टेहरी–गढवालचा इतिहास, 'चिपको' ची पार्श्वभूमी, डेहराडूनच्या वनसंशोधनसस्थेची जशी माहिती दिली आहे, तशी दुसऱ्या बाजूस रेल्वेरिझर्वेशनसाठी केलेली यातायात, मनस्ताप व लाचखोरीची खुल्लमखुल्ला हकिगत आहे. (इतका मोकळेपणा बरा नव्हे ! ) गाडी मुक्कामाला पोचल्यावर सुटकेचा नि.श्वास टाकताना लेखक म्हणतो, 'आभाळ गच्च भरून आल होत; पण मन हलक हलक झाल होत !' दूर जाणाऱ्या गगेच्या प्रवाहाकडे पाहून, कळत–नकळत दूर जाणाऱ्या बालपणीच्या मैत्रिणीची त्याला आठवण होते हेवलघाटीत दबकत प्रवेश करणारे सूर्यकिरण त्याला वर्गात उशिरा येणाऱ्या मुलासारखे भासतात. लेखकाची प्रतिभा कायम जागृत असते !

या पुस्तकाला प्रस्तावना लिहिली आहे, सुप्रसिद्ध निसर्गशास्त्रज्ञ डॉ माधव गाडगीळ यानी. त्यांनी ब्रिटिशांच्या आणि सध्याच्या सरकारच्या वन-नीतीचे वाभाडे काढले आहेत. तिसऱ्या जगताच्या परिसरविषयक समस्येचे स्वरूप जगापुढे माडण्याचे, त्या दृष्टीने हालचाल सुरू करण्याचे श्रेय ते चिपको आंदोलनाला देतात आणि ही जाणीव महाराष्ट्रापर्यंत पोचवण्याचे श्रेय ते जगदीश गोडबोल्यांना देतात. गोडबोल्यांनी 'चिपको' च्या वाटचालीची नुसती ओळखच करून दिलेली नाही, तर ते स्वत: पवनाखोऱ्यात एक विधायक कार्यक्रम राबवीत आहेत, असे आश्वासन माधव गाडगीळ देत आहेत. मग आता 'मोहीम इद्रावतीची' आणि 'प्रेरणा चिपकोची' या लागोपाठच्या दोन पुस्तकानतर 'पवनाकाठची पहाट' प्रकाशित होण्याची अपेक्षा गोडबोल्याकडून करावी काय ?

–सुरेश परांजपे

प्रेरणा चिपकोची, भटकती गढवालची
जगदीश गोडबोले
वार्ता प्रकाशन
पृष्ठे : १५०  किंमत : रु. २८

---

## समाधीवरील फुलं

दोनशे वर्षांपूर्वी, १५ जानेवारी १९८४ रोजी, सर विल्यम जोन्सने (William Jones) कलकत्ता येथे आशिॲटिक सोसायटीची स्थापना केली. स्वत. विल्यम जोन्सने आणि त्याने स्थापिलेल्या सोसायटीच्या उद्दिष्टांनी प्रेरित होऊन ज्या पाश्चात्य सशोधकांनी भारतीय सस्कृतीच्या सशोधनाचे बहुमोल कार्य अठराव्या व एकोणिसाव्या शतकात केले त्याच्यापैकी चौघा सशोधकाचे चरित्र व त्याच्या कार्याची थोडक्यात माहिती प्रा. माहुलकरानी प्रस्तुत पुस्तकात दिली आहे. त्यासाठी लेखकाने बरेच परिश्रम घेतले आहेत, हे पुस्तक वाचताना लक्षात येते. ही माहिती सरळ न देता शाळकरी मुलाना गोष्टी सागाव्यात तशा स्वरूपात दिली आहे हे ह्या पुस्तकाचे वैशिष्ट्य. अशा प्रकारे पुस्तक लिहिण्याची कल्पना प्रा माहुलकराना त्याच्या पत्नी अलकनदाबाईंनी दिली. प्रा. माहुलकरांनी सहृदयपणे ती कृतीत उतरविली. चरित्र व घटना सागताना 'वास्तव व काल्पनिकता याचा सगम साधण्याचा प्रयत्न लेखकाने कौशल्यपूर्ण केला आहे.

पुस्तकात एकदर तीन गोष्टी आहेत.

पहिली गोष्ट विल्यम जोन्सची आहे. १७४६ साली इग्लडात जन्मलेला विल्यम १७८३ साली ईस्ट इडिया कंपनीतर्फे कलकत्यास न्यायाधीश म्हणून आला. भारतात आल्यावर त्याने सस्कृतच्या अभ्यासास सुरुवात केली आणि तीत प्राविण्य मिळवून 'शाकुतल' नाटकाचे भाषांतर केले. ग्रीक, लॅटिन, पर्शिअन ह्या भाषा विल्यम जोन्सला आधीच येत होत्या. त्याच्या जोडीला सस्कृतचे ज्ञान प्राप्त झाल्यावर ह्या निरनिराळया भाषात आढळणाऱ्या साम्यामुळे त्याने १७८६ साली एक मोठा क्रातिकारक विचार ॲशियाटिक सभेत भाषण करताना माडला. तो म्हणाला की, ह्या भाषात आढळणाऱ्या साम्याचे कारण त्या सर्व कोणत्या तरी एका अज्ञात भाषेपासून निर्माण झाल्या आहेत, ह्या घटनेत असले पाहिजे जोन्सची ही कल्पना भक्कम पायावर आधारलेली असल्याने तिने लौकरच मूळ धरले आज आपणास इण्डो–युरोपियन भाषाशास्त्राचा जो विस्तार झालेला दिसतो ते त्या कल्पनेचेच परिणत रूप होय.

विल्यमने पर्शिअन भाषेचे व्याकरणही लिहिले होते. फिट्झ जेराल्डने उमर खय्यामच्या 'रुबाया'चे इग्रजी भाषांतर केले त्याचे श्रेय विल्यमच्या व्याकरणाला आहे.

दुसऱ्या गोष्टीत प्रा. माहुलकरानी आकेतिल दु पेरों (Anquetil du Perron) ह्या फ्रेंच सशोधकाची माहिती दिली आहे पारशी लोकाचा धर्मग्रथ अवेस्ता, त्याच्या 'वदिदाद' नावाच्या एका भागाचे हस्तलिखित ऑक्सफर्डच्या लायब्ररीत होते त्याचा अवेस्ता लिपीतला नमुना एका फ्रेंच वर्तमानपत्रात प्रसिद्ध झालेला आकेतिलने पाहिला आणि त्याने ती लिपी व त्या लिपीत लिहिलेला ग्रथ समजून घेण्याचा ध्यास घेतला त्यासाठी भारतात येणे जरूर होते म्हणून तो फ्रेंच सैन्यात भरती झाला आणि १७५४ साली तो पाँडिचेरी येथे आला. नतर त्याने सैन्यातून मुक्ती मिळवली व सुरतेस येऊन तिथे एक पारशी दस्तुराचा विश्वास सपादन केला. अखेर त्याने अवेस्ताची प्रत देखील मिळवली. अभ्यास गेल्यावर आकेतिलने दारा शुको-

ह्यची माहिती मिळवली. १७६१ मध्ये आकेतिल मायदेशी जाण्यास निघाला नतर अवेस्ताच्या अभ्यासात दहा वर्षे खपून १७७१ साली त्याने ते तीन खडात प्रसिद्ध केले (Ouvrage de Zoroester) अवेस्ताचे युरोपीय भाषेतले हे पहिले भाषातर दाराशुकोह्च्या ' सिर्र-इ-अकबर ' ह्या ग्रथाचे लॅटिन भाषातरही आकेतिलने प्रसिद्ध केले.

तिसऱ्या गोष्टीत प्रा. माहुलकरानी अलेक्झाडर च्सोमा (Alexander Scoma) व ऑरेल स्टाइन (Aurel Stein) ह्या दोन हगेरिअन सशोधकाची माहिती दिली आहे हगेरिअन लोकाचे मूळ वसतिस्थान मध्यआशियात आहे ह्या कल्पनेने च्सोमा तिकडे जायला निघाला, पण योगायोगाने १८४० साली लेह येथे पोहोचला. तिथे तिबेटन भाषेचा अभ्यास करून त्याने त्या भाषेचे व्याकरण व शब्दकोश तयार केला आणि मग त्या भाषेतल्या अनेक बौद्धग्रथाचे भाषातर केले च्सोमाची ज्ञाननिष्ठा अपूर्व होती. एका इग्रज गृहस्थाने त्याच्याविषयी म्हटले आहे ' मी त्याला भेटलो तेव्हा त्याच्या भोवताली सस्कृत,बगाली, मराठी भाषाची पुस्तके होती च्सोमा कधी बाहेर दृष्टीस पडत नसे एकदाच मी त्याला व्हराडचात शातपणे पावले टाकीत फिरताना पाहिल.' १८४२त कलकत्याहून मध्यआशियात पुन्हा जाण्यास निघाला-असता वाटेत दार्जिलिंग येथे तो मृत्यू पावला. च्सोमाच्या जीवनावर आधारलेला एक दूरदर्शन चित्रपट हगेरिअन सरकार तयार करणार असल्याचे वृत्त नुकतेच प्रसिद्ध झाले आहे.

सर ऑरेल स्टाइन हे दुसरे हगेरिअन सस्कृतचे अभ्यासक १८८७ साली भारतात आले व त्यानी चागली मानाची पदे भूषविली. कल्हणाच्या राजतरगिणीचे इग्रजी भाषातर करून त्यानी फार मोठी कामगिरी पार पाडली. मध्यआशियात वाळवटाखाली जी सस्कृती दडपली गेली होती तिथे उत्खनन करून तिला पुन्हा प्रकाशात आणण्यात त्याना यश मिळाले. वयाच्या ८१ व्या वर्षी हिमालयाच्या एका शिखरावर त्याना मृत्यू आला !

पुस्तकात मुद्रणदोष अगदी तुरळक आहेत पृ ७४, नवव्या ओळीत १८८४ च्या ऐवजी १८४४ हवे

—म. अ. मेहेंदळे

समाधीवरची फुल,
दिनेश द माहुलकर
पृष्ठे ९४, मूल्य . १५–०० रु

दि, २७ सप्टेंबर १९८४ रोजी आतरराष्ट्रीय कीर्तीचे मानसोपचारतज्ज्ञ डॉ. अल्बर्ट एलिस याच्या वयाला ७१ वर्षे पूर्ण होत आहेत. अमेरिकेतील न्यूयॉर्क शहरातील ' दि इन्स्टिटच्यूट फॉर रॅशनल–इमोटिव्ह थेरपी ' या संस्थेचे ते सस्थापक व कार्यकारी सचालक आहेत. या सस्थेचे कि. मो. फडके भारतातील पहिले व एकमेव ' फेलो ' आहेत. डॉ. अल्बर्ट एलिस याच्या मानसोपचारपद्धतीचे ते एक चिकित्सक अभ्यासक आहेत. सोबतच्या लेखाद्वारे त्यांनी डॉ अल्बर्ट एलिस याच्या विचारसरणीची वाचकाना तोडओळख करून दिली आहे.

# एक बुद्धिप्रामाण्यवादी मानसशास्त्रज्ञ

लेखक : कि. मो. फडके, एम. ए., एफ. आय. आर. इ. टी. (न्यूयॉर्क) डायरेक्टर, फडके सेटर मुंबई

अमेरिकेमध्ये ' द न्यू सन ' या नावाचे एक नियतकालिक प्रसिद्ध होत असते. ते नियतकालिक बुद्धिप्रामाण्यवादाच्या प्रसाराला वाहिलेले आहे, असे नक्कीच म्हणता येणार नाही. उलट, सामान्यत त्या नियतकालिकातून प्रसिद्ध होणारे साहित्य म्हणजे श्रद्धावान मंडळीनी श्रद्धावान वाचकासाठी केलेले लिखाण, असे म्हणणे वावग ठरणार नाही. तथापि आपल्या नियतकालिकाला पाखडी विचाराचे वारेही लागता कामा नये, असे समजण्याइतकी काही त्या नियतकालिकाच्या सचालकाची भूमिका एकागी नाही. म्हणूनच त्या नियत कालिकाने एकोणीसशेसत्त्याहत्तर सालच्या ऑक्टोबर महिन्याच्या अंकात, स्वत ला नास्तिक म्हणवून घेणाऱ्या एका सुविख्यात मानसोपचारतज्ज्ञाची मुलाखत प्रसिद्ध केली. ते मानसोपचारतज्ज्ञ म्हणजे न्यूयॉर्क शहरातील ' द इन्स्टिटयूट फॉर रॅशनल–इमोटिव्ह थेरपी ' या सस्थेचे सस्थापक व कार्यकारी सचालक डॉ अल्बर्ट एलिस हे होत.

डॉ. अल्बर्ट एलिस यानी वरील नियतकालिकाच्या प्रतिनिधीशी तीस मिनिटे बातचीत केली. साहजिकच इतक्या थोड्या वेळात त्याना आपले सर्व विचार अगदी सविस्तरपणे सागणे शक्यच नव्हते. तरीसुद्धा त्याच्या विचाराचा व मुख्यत. त्यानी शोधून काढलेल्या विवेकनिष्ठ मानसोपचारपध्दतीचा ओझरता परिचय करून घेण्याच्या दृष्टीने, ती मुलाखत मराठी वाचकाना उपयुक्त ठरेल, एवढाच मर्यादित उद्देश नजरेसमोर ठेवून, मी या लेखात त्या मुलाखतीचा गोषवारा देण्याचा प्रयत्न केला आहे

' द न्यू सन ' या नियतकालिकाच्या वतीने डॉ. अल्बर्ट एलिस याची मुलाखत घेण्याचे काम श्री इलिएट सोबेल यानी मन.पूर्वक केले होते, असे म्हटले पाहिजे कारण मुलाखत वाचल्यावर असे दिसून येते की, आपल्याला मिळालेल्या अर्ध्या तासाचा विनियोग करून घेण्यासाठी श्री. इलिएट सोबेल यानी डॉ अल्बर्ट एलिस याच्या फक्त ग्रंथाचाच अभ्यास केला होता असे नव्हे, तर आपली मानसोपचारपध्दती डॉ. अल्बर्ट एलिस कशी कार्यान्वित करतात याचे प्रत्यक्ष निरीक्षणही केले होते. ही सर्व पूर्वतयारी झाल्यावर श्री. इलिएट सोबेल यानी मुलाखत घेताना आपण ज्या एका विशिष्ट वाचकवर्गासाठी मुलाखत घेत आहोत, त्या वाचकवर्गाच्या पार्श्वभूमीचे भानही

ठेविले होते. त्याचा परिणाम असा झाला को, मुलाखतीच्या वेळी डॉ अल्बर्ट एलिस याना आपले विचार सडेतोडपणे व्यक्त करण्यास बराच वाव मिळाला व मुलाखत चागली रंगली. तेव्हा आता श्री. इलिएट सोबेल काय म्हणतात ते पाहू

¤

मी डॉ. अल्बर्ट एलिस याना मानसोपचाराच्या क्षेत्रातील श्री. महमद अली समजतो. अर्थात सुप्रसिध्द मुष्टियोध्दे श्री. महमद अली स्वत च ज्याप्रमाणे 'मी सर्वोत्कृष्ट मुष्टियोध्दा आहे' असे बेधडक म्हणतात, त्याप्रमाणे डॉ. अल्बर्ट एलिस काही स्वत च तसे म्हणत नाहीत–पण कदाचित म्हणतीलही ! ते काही असले तरी मला वाटते की, श्री महमद अलीप्रमाणेच, डॉ. अल्बर्ट एलिस याचे व्यक्तिमत्त्वही मोठे आकर्षक व आवडण्याजोगे आहे. निदान ते आप शी मते कोण काय म्हणेल याची भीडमुर्वत न बाळगता, रोखठोकपणे व्यक्त करण्यास कचरत नाहीत, म्हणून तरी तुम्हाला त्याचे कौतुक करावे लागेल. कारण थोड्याच वेळात तुमच्या असे लक्षात येईल की, ते बोलतात तेव्हा, लोक काय म्हणतील याची ते काहीच पर्वा करीत नाहीत.

माझी अशी खात्री आहे की, आपल्या नियतकालिकाच्या जवळजवळ सर्वच वाचकाना या मुलाखतीत डॉ अल्बर्ट एलिस जे काही बोलतात त्यामध्ये काही तरी चीड आणण्यासारखे सापडेल; परतु आपल्या नियतकालिकात काही तरी वादग माजविणारे, आपली सुस्ती घालविणारे व आपल्यात जागृती निर्माण करणारे साहित्य प्रसिद्ध व्हावयास हवेच होते. अर्थात माझ्या मते, या मुलाखतीत आध्यात्मिक विषयासबधी डॉ. अल्बर्ट एलिस यानी जे काही वक्तव्य केले आहे त्याचे वर्णन अगदी त्याच्याच लाडक्या शब्दात करायचे तर ते वक्तव्य म्हणजे शुद्ध व पराकोटीचा मूर्खपणा आहे, असे म्हणता येईल परतु मला असेही वाटते की, ईश्वराचा ध्यास लागलेल्या आपल्यासारख्या काहीशा चक्रम लोकाना, ते या मुलाखतीत काही शहाणपणही मार्मिकपणे सागून जातात आणि ते शहाणपण म्हणजे आपली विश्वाबद्दलची कल्पना कितीही अद्भुत, गूढ व गहन असली तरी आपण राहत असतो ते या मृत्युलोकात आणि आपल्याला पदोपदी भिडावयाचे असते ते या जगातील वस्तुस्थितीलाच !

डॉ. अल्बर्ट एलिस हे विवेकनिष्ठ मानसोपचारपध्दतीचे जनक आहेत. त्याच्या या मानसोपचारपध्दतीची उभारणी दोन मुख्य तत्त्वांवर झालेली आहे पहिले तत्त्व म्हणजे माणसाच्या भावना त्याच्या विचारातून, कल्पनातून, दृष्टिकोनातून अथवा जीवन–तत्त्वज्ञानातून जन्माला येतात. दुसरे तत्त्व म्हणजे माणसाचे विचार, कल्पना, दृष्टिकोण किंवा जीवन–तत्त्वज्ञान आमूलाग्रपणे बदलता येते; आणि हे करण्याचा उत्तम उपाय म्हणजे ज्या विचार करण्याच्या प्रक्रियेतून माणसाचे जीवन-तत्त्वज्ञान जन्माला येते, ती प्रक्रिया बदलणे अथवा तिच्यावर कठोरपणे प्रहार करणे.

डॉ. अल्बर्ट एलिस आपली मानसोपचाराची पध्दत कशी कार्यान्वित करतात, ते तुम्ही न्यूयॉर्क शहरातील त्याच्या सस्थेत जाऊन पाहू शकता. बहुधा दर शुक्रवारी रात्री ते आपल्या मानसोपचारपध्दतीचे प्रात्यक्षिक प्रेक्षकापुढे सादर करीत असतात. त्या वेळी प्रेक्षकापैकी कोणीही माणूस व्यासपीठावर जाऊन, आपली एखादी समस्या डॉ. अल्बर्ट एलिस याना सागून, त्याचे मार्गदर्शन मिळवू शकतो. शिवाय, डॉ. अल्बर्ट एलिस यांनी मार्गदर्शन केल्यानतर त्या माणसाला प्रेक्षकाकडूनही झालेल्या प्रात्यक्षिकानुसार अधिक मार्गदर्शन मिळविता येते. मला स्वत ला हा सर्व प्रकार थोडासा सर्कशीसारखा वाटला, परतु तो खासच मनोरजक होता !

डॉ. अल्बर्ट एलिस याची व्यक्ती व मानसोपचारतज्ज्ञ म्हणून थोडक्यात ओळख करून देणे फारच कठीण आहे त्याचे चारशेहून अधिक निबध प्रसिद्ध झालेले आहेत आणि त्यानी लिहिलेल्या व सपादित केलेल्या पुस्तकाची संख्या सदतिसाहून अधिक आहे. त्यापैकी काही पुस्तके म्हणजे : 'सेक्स विदाउट गिल्ट' 'द आर्ट अ‍ॅण्ड सायन्स ऑफ लव्ह', व 'ए न्यू गाइड टू रॅशनल लिव्हिंग'.

¤

**श्री. सोबेल** – मला असे वाटते की, मी तुम्हाला काही प्रश्न विचारण्यापूर्वी, तुम्ही तुमच्या मानसोपचारपद्धतीचे छोटेसे प्रात्यक्षिक वाचकाना सादर केलेत तर, ते चटकदार होईल आणि म्हणून मी माझीच एक समस्या तुमच्यापुढे माडतो. ती समस्या म्हणजे अशा तऱ्हेच्या मुलाखती घेताना मी चितातुर होतो व या माझ्या चितातुर मन स्थितीवर मी तुमच्या मदतीने मात करू इच्छितो.

**डॉ. एलिस** – ठीक आहे. आपण असे समजू को, 'क' या टप्प्यावर तुम्हाला चिंता छळत आहे आणि 'अ' हा टप्पा म्हणजे तुम्ही माझी मुलाखत घेण्यासाठी येथे आलेले आहात. वरवर पाहता असे वाटते की, मुलाखत घेणे हे काम तुमच्या मनात चिंता निर्माण करीत आहे, परतु खरे म्हणजे 'ब' या मधल्या टप्प्यावर आपल्या आजच्या मुलाखतीविषयी तुमचा जो दृष्टिकोन आहे, त्यामुळे तुमच्या मनात 'क' या टप्प्यावर चिंता निर्माण झालेली आहे. तेव्हा तुम्ही 'ब' या टप्प्यावर या मुलाखतीबद्दल स्वतःला काय सागत आहात, ते मला सागा पाहू. कारण ही मुलाखत काही तुमच्या मनात चिंता निर्माण करीत नाही. तुमच्या या मुलाखतीकडे पाहण्याचा जो दृष्टिकोन आहे त्यानुसार 'ब' या टप्प्यावर तुम्ही स्वत.शी जे काही बोलत आहात त्यामुळे 'क' टप्प्यावर तुम्ही स्वत ला चितातुर करून घेत आहात. सागा, तुम्ही स्वत शी काय बोलत आहात ते.

**श्री सोबेल** – मला वाटते, मी स्वत ला असे सागत आहे की, खरे म्हणजे डॉ. एलिस याना माझ्याशी बोलणे नकोच आहे... त्यानी मला फक्त अर्धा तास दिला आहे. इतका अपुरा वेळ म्हणजे...म्हणजे आपले उगाच त्याच्या खोलीत जाऊन भोज्जाला शिवून बाहेर येणे, असलाच प्रकार आहे...त्याना मी म्हणजे एक पीडा वाटते.

**डॉ. एलिस** – आपण असे समजू को, तुमचे हे म्हणणे बरोबर आहे. समजा मला तुम्ही म्हणजे खरोखरच एक पीडा वाटते आहे; पण त्याविषयी तुम्ही स्वतःला काय सागत आहात ? केवळ मला तुम्ही म्हणजे एक पीडा वाटते, ही परिस्थिती काही तुमच्या मनात

**असे समजू की, तुमचे हे म्हणणे बरोबर आहे. मला तुम्ही म्हणजे पीडा वाटते आहे.**

चिंता निर्माण करू शकत नाही. कारण त्या परिस्थितीविषयी तुम्ही स्वत.ला असेही सांगू शकता की, 'त्यांना मी म्हणजे एक पीडा वाटते तर वाटते! गेले उडत!' परंतु तुम्ही स्वत ला दुसरेच काही तरी सांगत आहात सांगा तुम्ही स्वत शी काय बोलत आहात ते!

**श्री. सोबेल** – मला वाटते की, 'डॉ. एलिस याना मी म्हणजे एक पीडा वाटते आहे, याचा अर्थ मी नालायक आहे.' असे काही तरी मी स्वत.ला सांगत आहे

**डॉ. एलिस** – पाहिलेत ना तुम्ही 'ब' या टप्प्यावर काय करीत आहात ते? तुम्ही 'ब' या टप्प्यावर स्वत ला असे सांगत आहात की, 'डॉ. एलिस याना मी म्हणजे एक पीडा वाटते आहे, याचा अर्थ माझ्यात काही तरी न्यूनत्व आहे व ही वस्तुस्थिती मला सहन करता येत नाही.'

**श्री. सोबेल** – अगदी बरोबर ओळखलेत!

**डॉ. एलिस** – पण मला तुम्ही म्हणजे एक पीडा वाटते किंवा मी तुम्हाला नालायक समजतो, यावरून तुमच्याबद्दल काही सिद्ध होऊ शकते काय?

**श्री. सोबेल** – तुम्हाला माझ्याबद्दल काय वाटते, यावरून अथवा तुमच्या माझ्याविषयीच्या मतावरून खरे म्हणजे माझ्याबद्दल काही सिद्ध होऊ शकत नाही, हे मला समजते आहे; पण मला वाटते की, इतर लोक माझ्याविषयी काय म्हणतात, त्यावरून माझे स्वत बद्दलचे मत पक्के करण्याकडेच माझ्या मनाचा कल आहे.

**डॉ. एलिस** – अगदी बरोबर! कारण तुम्ही एक कल्पना गृहीत धरलेली आहे. ती कल्पना मनात बाळगूनच तुम्ही माझी मुलाखत घ्यावयास आला आहात. सांगा पाहू तुम्ही कोणती कल्पना तुमच्या मनात गृहीत धरलेली आहे?

**श्री. सोबेल** – ...कोणती कल्पना मी माझ्या मनात गृहीत धरलेली असावी बरे?... मला नक्की सांगता येत नाही... पण मला वाटते, मी तुमच्याइतका चांगला नाही, ही कल्पना मी माझ्या मनात गृहीत धरलेली असावी.

**डॉ. एलिस** – ...नाही. ही कल्पना म्हणजे कदाचित तुम्ही काढलेला निष्कर्ष असेल; पण तुम्ही तुमच्या मनात गृहीत धरलेली कल्पना बहुधा अशी आहे, 'मी ज्या व्यक्तीची मुलाखत घेतो त्या सर्वांची व विशेषत डॉ. एलिस याची मर्जी मी संपादन केलीच पाहिजे किंवा त्याची शाबासकी मिळवलीच पाहिजे आणि जी गोष्ट मी केलीच पाहिजे, ती मी केली नाही, तर मी जेवढा चांगला असणे आवश्यक आहे किंवा शक्य आहे, तेवढा चांगला नाही.'

ही कल्पना तुमच्या मनात ठाण मांडून बसली आहे की नाही? थोडक्यात म्हणजे तुम्ही असे गृहीत धरले आहेत की, तुम्ही डॉ. एलिस याची किंवा तुम्ही ज्या कोणाच्या मुलाखती घेता, त्याची मर्जी संपादन करणे अत्यावश्यक आहे!

**श्री. सोबेल**– होय. तुम्ही म्हणता ते बरोबर आहे

**डॉ. एलिस** – का म्हणून तुम्ही माझी किंवा इतरांची मर्जी संपादन केलीच पाहिजे? अर्थात तुम्ही इतरेजनाची मर्जी संपादन केलीत तर ठीकच! पण म्हणून तुम्ही माझी अथवा इतरांची मर्जी संपादन केलीच पाहिजे! तुम्ही तसे करणे अत्यावश्य आहे का?

**श्री. सोबेल** – कारण तुम्हाला अथवा इतराना मी आवडलो नाही, आपली मुलाखत स्वस्थपणे, मोकळ्या वातावरणात पार पडली नाही, तर ते मला फारच जाचक होईल...

**डॉ. एलिस** – ते तुम्हाला इतके जाचक कशामुळे होईल माहीत आहे? तुमच्या मनात गृहीत धरलेल्या या कल्पनेमुळे! तुम्ही माझी मर्जी संपादन केलीच पाहिजे, असे तुम्ही एकदा गृहीत धरलेत की, मग जर तुम्हाला माझी मर्जी संपादन करणे जमले नाही तर, ते तुम्हाला जाचक वाटेल, पण हा जाच तुम्ही तुमच्या मनात गृहीत धरलेल्या कल्पनेमुळे निर्माण होईल तुम्ही तुमच्या मनात अशी कल्पना गृहीत धरलेली नसेल व मुलाखत स्वस्थपणे, मोकळ्या वातावरणात झाली नाही, तर तुम्हाला थोडे वाईट वाटेल, इतकेच! म्हणून तुम्ही असेही समजा की तुमच्या मनात तुम्ही ही कल्पना गृहीत धरलेली नाही, उलट तुम्ही असेही समजा की, या मुलाखतीकडे पाहण्याचा तुमचा दृष्टिकोण असा आहे, 'मला डॉ एलिस याची मर्जी संपादन करणे आवडेल, पण जर मला त्यांची मर्जी संपादन करता आली नाही तर नाही!' एकदा तुम्ही असा दृष्टिकोण आत्मसात केलात की तुम्हाला माझी मर्जी संपादन करणे जमले नाही तर, तुम्हाला थोडे वाईट वाटेल, तुम्ही थोडे नाखूष व्हाल; पण तुम्ही अतोनात अस्वस्थ होणार नाही.

याचा अर्थ असा की, तुम्हाला या क्षणी जी चिंतातुरता जाणवत आहे, ती माझी मर्जी संपादन करण्याच्या प्रयत्नामुळे निर्माण झालेली नसून ती माझी मर्जी संपादन करण्याविषयी तुमच्या मनात जो अविवेकी व अवास्तव दृष्टिकोण आहे, त्यामुळे निर्माण झालेली आहे.

**श्री. सोबेल** – पण.. माझी चिंतातुरता म्हणजे... माझी शारीरिक प्रक्रिया आहे, असे वाटते. उदाहरणार्थ, माझी छाती थोडी धडधडते आहे व माझा श्वासोच्छ्वास काहीसा जलद गतीने होत आहे आणि मला असे वाटते की तुमच्या मानसोपचारपद्धतीचा भर माणसाच्या मनातील अविवेकी व तर्कदुष्ट विचार, कल्पना, दृष्टिकोण किंवा जीवनतत्त्वज्ञान याच्यावर हल्ला चढवून, त्याच्यात आमूलाग्र बदल करणे, यावर आहे. अशा प्रकारे माणसाच्या विचारात बदल झाला की, त्या अनुषंगाने त्याच्या शारीरिक प्रक्रियाही बदलतात, असे तुमचे म्हणणे आहे ना?

**डॉ. एलिस** – तुमच्या छातीमधील ती धडधड किंवा तशाच तऱ्हेच्या तुमच्या इतर शारीरिक प्रक्रिया म्हणजे तुम्ही तुमच्या मनात गृहीत धरलेल्या त्या कल्पनेला किंवा दृष्टिकोणाला मिळालेला प्रतिसाद आहे आणि तुमचा तो दृष्टिकोण म्हणजे 'मी डॉ. एलिस याची मर्जी संपादन केलीच पाहिजे व जर मी त्याची मर्जी संपादन करू शकलो नाही तर मी माझी स्वत चीही मर्जी संपादन करू शकणार नाही जर ते माझ्यावर खूष झाले नाहीत तर मीही स्वत वर खूष होऊ शकणार नाही

**श्री. सोबेल** – तुमचे म्हणणे माझ्या लक्षात आले आहे. शिवाय, मी तुमचे ग्रंथही वाचले होते व म्हणून तुमची ही विचारसरणी मला माहीत होती. इतकेच नव्हे तर, तुमची मुलाखत घेण्यास येताना मी स्वत ला सांगत होतो की, 'होईल ते होईल, नाही मला त्यांची मर्जी संपादन करता आली तर नाही!' तरी सुध्दा माझ्या या विचाराची किंवा दृष्टिकोणाची काही पर्वा न करता माझी छाती धडधडतेच आहे...

**डॉ. एलिस** – कारण तुम्ही स्वतःला हे जे काही सांगत होता, तो म्हणजे तुम्ही तुमचा खरा विचार किंवा दृष्टिकोण नाही. तो फक्त तुमचा वरवरचा विचार आहे मात्र तुम्ही जर स्वतःला खरो-खरच असे सांगितलेत की, 'होईल ते होईल, नाही मला त्यांची मर्जी संपादन करता आली तर नाही!' तर तुमची छाती धडधडेल? अगदी खरोखरच तुम्हाला हा दृष्टिकोण पटला तर तुमची छाती खरोखर धडधडेल? अर्थात तुम्ही स्वतःला असेही न सांगितलेले बरे की, 'ही मुलाखत कशी होते, याला काहीच महत्त्व नाही.' कारण हा विचार अविवेकी आहे ही मुलाखत कशी होते, याला काही मर्यादित महत्त्व जरूर आहे; पण तुम्ही स्वतःला 'ही मुला-खत चांगली व्हावी हे महत्त्वाचे आहे, तरी सुध्दा ही मुलाखत चांगली होणे ही काही अत्यावश्यक गोष्ट नाही,' असा अधिक विवेकी दृष्टिकोण पटवून द्यावा हे बरे.

**श्री. सोबेल** एखाद्या माणसाला असा विवेकी दृष्टिकोन पटवून देण्यासाठी तुम्ही काय करता?

**डॉ. एलिस** . त्या माणसाला या दृष्टिकोनानुसार निग्रहाने व जोमदारपणे पुन्हा पुन्हा विचार करण्यास प्रवृत्त करतो. कारण असे पहा की, तुमच्या मनात दोन दृष्टिकोण आहेत एक दृष्टिकोण अशक्त व दुबळा आहे व तो दृष्टिकोण तुमच्या मनात फक्त कधी-कधी तरळून जातो. तो दृष्टिकोण म्हणजे 'त्यांना मी नाही आवडलो तर नाही!' पण दुसरा दृष्टिकोण सशक्त व बलवान आहे व तो तुमच्या मनात ठाण देऊन बसला आहे. तो दृष्टिकोण म्हणजे 'त्यांना मी आवडलोच पाहिजे. जर मी त्यांना आवडलो नाही तर ती एक भयंकर अरिष्ट घटना घडेल!' तेव्हा तुमच्या मनातील चिंतातुरता नष्ट करावयाची असेल तर तुम्ही तुमच्या मनात ठाण देऊन बसलेल्या त्या दुसऱ्या सशक्त व बलवान दृष्टिकोणाला सरळ सामोरे जावे, त्याला आव्हान द्यावे व त्याचे खंडन करावे. शिवाय, तुम्ही मुद्दाम त्या दृष्टिकोणाविरुद्ध जाऊन काही तरी कृती करावी. उदाहरणार्थ, मुद्दाम जमेल तेवढ्या लोकांच्या मुलाखती घ्याव्यात व तसे करताना तुम्हाला कितीही चिंतातुरता जाणवली तरी कच न खाता तुम्ही मुलाखती घेण्याचा सपाटा चालूच ठेवावा

**श्री सोबेल** : म्हणजे माझ्या मनात ठाण देऊन बसलेल्या त्या सशक्त व बलवान पण अविवेकी दृष्टिकोणाविरुद्ध विचार करण्याची मी स्वतःला सवय लावावी, असेच ना? याचाच अर्थ तुमची ही पद्धत म्हणजे स्वतःला सतत विवेकी विचार सांगणे, असेच ना?

**डॉ एलिस** : होय परंतु स्वतःला सतत पटवून द्यावयाचा तो विवेकी दृष्टिकोण म्हणजे: 'काही झाले तरी मी काही नालायक माणूस नाही' किंवा अधिक अचूकपणे बोलावयाचे म्हणजे: 'डॉ. एलिस यांना अथवा इतर कोणाला मी आवडो वा न आवडो, मी स्वतःचा स्वीकार करण्याचा खंबीर निश्चय केला आहे'

आता मला सांगा की, तुम्ही पूर्णपणे, म्हणजे अगदी शंभर टक्के वरील दृष्टिकोण तुमच्या मनात रुजविलात, तर तुम्ही चिंतातुर व्हाल? तुमची छाती धडधडेल?

**श्री. सोबेल** : पण आपले मन आपल्याला स्वतःबद्दल सतत विघा-तक गोष्टी सांगण्यात इतका आनंद का मानते?

**डॉ एलिस** : या प्रश्नाचे उत्तर अगदी साधे आहे त्या उत्तराला बहुतेक मानसशास्त्रज्ञ विरोध करतात आणि बहुसंख्य सामान्य लोक त्या उत्तरावर विश्वास ठेवीत नाहीत. ते उत्तर म्हणजे मी सर्व बाबतीत परिपूर्ण असणे व इतरांना आवडणे अत्यावश्यक आहे, असे मानण्याकडे माणसाचा जन्मजात कल असतो. ही एक उपजत मानवी प्रवृत्ती आहे ती प्रवृत्ती आपण आपल्या आई-वडिलांकडून अथवा इतर लोकांकडून आत्मसात करीत नसतो. तसे समजणे बहुताशी मूर्खपणाचे आहे. आपले आई-वडील किंवा इतर लोक आपल्या या उपजत प्रवृत्तीला खतपाणी घालीत नाहीत, असे नव्हे कारण त्यांच्याही मनात ती प्रवृत्ती उपजतच असते व काही प्रमाणात ती प्रवृत्ती ते आपल्याला सुपूर्द करतात; परंतु जरी समजा त्यांनी आपले पालन-पोषण व संगोपन योग्य रीतीने केले व आपल्याला लाखो वेळा सांगितले की, 'बाळा, लोकांना तू आवडलास तर छानच, पण त्यांनी तुझ्यावर प्रेम केलेच पाहिजे, असा काही या विश्वातील त्रिकालाबाधित नियम नाही,' तरीसुद्धा आपला कल विरुद्ध दिशेने विचार करण्याकडे राहील.

शेखसल्लीपणे विचार करणे, ही आपली नैसर्गिक प्रवृत्ती आहे. 'मी सर्व गोष्टी परिपूर्णपणे, उत्तम प्रकारेच केल्या पाहिजेत व इत-रांची मर्जी संपादन केलीच पाहिजे, नाही तर मी नालायक माणूस आहे.' असा विचार करणे ही आपली मूलप्रकृती आहे. या जगात कोणत्याही संस्कृतीत, कोठेही असा माणूस शोधूनही सापडणार नाही की, ज्याच्या मनात ही शेखसल्ली विचारसरणी दिसून येणार नाही. अर्थात एखाद्याने प्रयत्नपूर्वक स्वतःची या विचारसरणीच्या बंधनातून मुक्तता करून घेतली असेल, तर ती गोष्ट निराळी! नाही तर असा विचार करणे ही माणसाची जन्मजात, निसर्गदत्त प्रवृत्तीच आहे.

**श्री. सोबेल** : तुम्ही तुमच्याकडे सल्ला घ्यावयास आलेल्या माण-साच्या मनातील अविवेकी दृष्टिकोण इतक्या चटकन शोधून काढता, यावरून मला असे वाटते की, तुम्हाला तुमच्या स्वतःच्या मनोव्यापा-राची चांगलीच कल्पना असेल. तसे असेल तर तुम्ही तुमची मान-सोपचाराची पद्धत स्वतःवर वापरू शकता काय? म्हणजे मला असे म्हणावयाचे आहे की, तुम्ही तुमच्या स्वतःच्या मनातील अविवेकी दृष्टिकोण उखडून टाकले आहेत काय?

**डॉ. एलिस** : होय अनेक वर्षांपूर्वी मी श्री. पॉल कॅसनर यांना एक मुलाखत दिली होती. ती मुलाखत त्या वेळी बरीच गाजली होती. त्या मुलाखतीत एकोणिसशेसाठ साली मी असे म्हणालो होतो की, 'गेल्या पंचवीस वर्षांत मी जवळजवळ कधीच चिंतातुर झालेला नाही. कारण माझी मानसोपचारपद्धती स्वतःवर वापरून मी स्वतःचा स्वीकार केला होता आणि मी कोणतीही गोष्ट परिपूर्ण, सर्वोत्कृष्ट रीतीने करणे व इतरांची मर्जी संपादन करणे अत्यावश्यक नाही, हे स्वतःला पटवून दिले होते. तरीसुद्धा क्वचित प्रसंगी मी चिंतातुर होतो.'

## तुम्ही तुमच्या मनातील अविवेकी दृष्टिकोण उखडून टाकले आहेत काय ?

आज मी असे म्हणेन की, गेल्या पचेचाळीस वर्षात मी कधी निमनस्कता अनुभवलेली नाही. मात्र कधीकधी मी लोकावर सतापतो. अशा वेळी, माझ्या मनातील कोणत्या कल्पनेमुळे माझा संताप उद्‌भवलेला असतो, हे मी ओळखतो. ती कल्पना म्हणजे इतर लोक जे वर्तन प्रत्यक्ष करीत असतात, ते वर्तन त्यानी करताच कामा नये! याचा अर्थ माझ्या सतापाच्या मुळाशी जो अविवेकी दृष्टिकोण असतो तो असा की, लोकानी माझ्याशी अयोग्य रीतीने व अन्यायाने वागताच कामा नये मग मला चटकन उमगते की, माझ्या मनातील सताप लोकानी निर्माण केलेला नसतो. लोक तसे काही करू शकत नाहीत. माझा सताप मी स्वत च निर्माण केलेला असतो म्हणून अशा वेळी मी पुढील प्रश्न स्वत.ला ठणकावून विचारतो : 'लोकानी जसे वागावे असे मला वाटते, प्रमाणे त्यानी वागलेच पाहिजे, असे समजण्यास कोणता आधार आहे ?' हा प्रश्न मी स्वत ला नेटाने विचारल्यावर मला पट लागते की, लोकानी माझ्या इच्छेनुसार वागलेच पाहिजे, असे समजण्यास कोणताही आधार नाही, माझी ही कल्पना म्हणजे माझा एक अविवेकी हट्ट आहे व मी तो हट्ट सोडून द्यावा हेच शहाणपणाचे आहे. याचा परिणाम असा होतो की, अगदी थोडया वेळात माझा सताप नाहीसा होतो. किंबहुना 'माणसाने क्रोधासकट व क्रोधाशिवाय जीवन कसे जगावे' या नावाचे पुस्तक लिहिण्यास मी प्रवृत्त झालो याचे एक कारण म्हणजे, मी माझ्या स्वतःच्या मनातील क्रोध नाहीसा करण्यासाठी विवेकनिष्ठ मानसोपचारपद्धतीचा उपयोग करीत असतो!

**श्री. सोबेल** : आपल्या मनातील जन्मजात अविवेकी प्रवृत्तीला सामोरे जाऊन, तिच्यावर प्रहार करून, तिचा बीमोड करून, तिला अधिक विवेकी करण्याची आपल्या मनाची ही जी दुसरी बाजू आहे, तिचे स्वरूप काय आहे ?

**डॉ. एलिस** : माणसाच्या मनात ती प्रवृत्तीही उपजतच असते. ती प्रवृत्ती म्हणजे आपल्या विचार करण्याविषयी विचार करणे. निदान काही किमान बुद्धिमत्ता असलेली बहुतेक सर्व माणसे विचार करू शकतात, निरीक्षण करू शकतात व आपल्या स्वत.च्या विचारांबद्दल विचार करू शकतात आणि ज्या वेळी त्यांच्या असे लक्षात येते की, ज्या अर्थी त्यांचे विचार त्यांना इच्छित फळे देत नाहीत त्या अर्थी त्या विचारात काही तरी गफलत असली पाहिजे, त्या वेळी वाटल्यास ते आपले विचार बदलू शकतात. माणूस ज्या कोणत्या गोष्टीवर विश्वास ठेवू शकतो, त्या गोष्टीवर विश्वास न ठेवण्यासही तो स्वत ला शिकवू शकतो. ही त्याची जन्मजात प्रवृत्ती आहे. याचा अर्थ तो ही क्रिया नैसर्गिकपणे करू शकतो. त्यासाठी त्याला खास शिक्षण देण्याची गरज नसते, पण त्याला तसे काही विशिष्ट शिक्षण–म्हणजे उदाहरणार्थ, विवेकनिष्ठ मानसोपचारपद्धतीनुसार मिळालेले शिक्षण–प्राप्त झाले तर, तो या कामात अधिक वाकबगार होऊ शकतो.

**श्री. सोबेल** : माणसाच्या या प्रवृत्तीचा उगम कशात आहे असे तुम्हाला वाटते ?

**डॉ. एलिस** : त्या प्रवृत्ती म्हणजे माणसाचा जन्मजात वारसा आहे. त्याचे काही खास उगमस्थान असे नाही. माणसाच्या या प्रवृत्ती मुख्यत्वेकरून जन्मजात असतात आणि अनेकदा काही लोक व विशेषत. फ्रॉइडप्रणीत मनोविश्लेषणवादी लोक, या प्रवृत्तीच्या मुळाशी काही खास कारण असते, असे गृहीत धरतात. साहजिकच असे लोक काही कार्यकारण मीमासा शोधून काढतात. उदाहरणार्थ, माझा पूर्वानुभव, माझा माझ्या आई–वडिलाबरोबरचा व इतरेजनाबरोबरचा अनुभव, यामुळे 'मी असा झालो', असे म्हटले जाते. ही सर्व कार्यकारण मीमासा मोठी मनोरंजक असते, परतु ती बहुताशी असभाव्य असते. बहुधा कशाला काही विशेष कारण नसते! माणूस येथे आहे म्हणून तो येथे आहे सर्व धर्म व बहुतेक सर्व मानसोपचारतज्ज्ञ माणसाच्या या जगातील अस्तित्वामागील कोणते तरी विशेष प्रयोजन शोधून काढतात. याचे कारण असे की, माणूस येथे आहे, म्हणून तो येथे आहे ही वस्तुस्थिती ते मान्य करीत नाहीत.

अनेक वर्षांपूर्वी सुप्रसिद्ध फ्रेंच तत्त्वज्ञ सार्त्र म्हणाला होता त्याप्रमाणे, विश्व व मानवी आयुष्य अर्थशून्य आहे. वस्तुस्थिती ही अशी आहे. माणूस येथे का आहे किंवा तो करतो ते वर्तन का करतो, याला कोणतेही खास अथवा वैश्विक कारण नाही. माणूस आत्मघातकीपणे व वेडपटपणे वागतो म्हणून तो तसे वागतो! माणूस अमुक अमुक प्रकारे कसे वागू लागतो, हा मुळी खरा प्रश्नच नाही. खरा प्रश्न असा आहे की, माणसाने आपले आत्मघातकी वर्तन कसे सुधारावे ?

**श्री. सोबेल** यावरून मला असे दिसते की, तुमच्या विवेकनिष्ठ मानसोपचारपद्धतीची बैठक, एका आध्यात्मिक किंवा पौर्वात्य कल्पनेशी जुळती–मिळती आहे. ती कल्पना म्हणजे 'वास्तविक आपले मन किंवा आपले विचारच विश्व निर्माण करतात.'

**डॉ. एलिस** : अध्यात्मिकाच्या व पौर्वात्याच्या विचारसरणीत ही एक कल्पना अतर्भूत आहे; परंतु ते लोक त्यांच्या विचारसरणीत इतर अनेक गोष्टींचीही भेसळ करून ठेवतात! जर ते फक्त त्यांच्या मूळ कल्पनेला धरून राहतील, तर ते अधिक शहाणे व समजूतदार होतील.

**श्री. सोबेल** : ते काहीही असले तरी, त्यांच्या विचारसरणीत व तुमच्या विचारसरणीत साम्य आहे, हे तुम्हाला माहीत आहे ना ?

**डॉ. एलिस** : अर्थात! विशेषत. गौतमबुद्धाच्या धर्मात व इतर काही पौर्वात्य धर्मात बराच काही सुज्ञपणा आहे; परंतु त्याचबरोबर त्या धर्मात शुद्ध मूर्खपणाचाही समावेश आहे. ते धर्म विचार करावयास सुज्ञपणे सुरुवात करतात, परतु नंतर त्यांची विचारसरणी अचिकित्सकपणे निरर्थक गोष्टीकडे धाव घेते. उदाहरणार्थ, माणूस त्याच्या आयुष्यात घडणाऱ्या सर्व घटनाना सपूर्णपणे स्वतःच जबाबदार असतो, हा सिद्धात. विल्यम एरहार्ड यांच्या प्रशिक्षणाच्या कार्यक्रमातही या सिद्धाताचा समावेश आहे; परतु हा सिद्धात म्हणजे शुद्ध मूर्खपणा आहे कारण का ते माहीत आहे ? पहिली गोष्ट अशी की, माणूस काही आनुवशिक वारसा घेऊन या जगात जन्म घेत असतो. याचा अर्थ असा की, एखाद्या विशिष्ट प्रकारे विचार करण्याची प्रवृत्ती घेऊन माणूस जन्माला येतो; तो काही हात हलवून पक्ष्याप्रमाणे आकाशात उड्डाण करू शकत नाही. मानवजातीची ती मुळी नैसर्गिक प्रवृत्तीच नाही. दुसरी गोष्ट अशी की, माणसावर त्याच्या सभोवतालच्या परिस्थितीचा परिणाम होत असतो, तो परिणाम काही फार मोठा किंवा सखोल असतो असे नाही; पण माणसावर त्याच्या सभोवतालच्या परिस्थितीचा परिणाम होत असतो, हे नाकारता येणार नाही.

**श्री. सोबेल :** विल्यम एरहार्ड यांच्या प्रशिक्षणात समाविष्ट असलेला सिद्धांत असे म्हणत नाही की, माणूस त्याच्या आयुष्यात घडणाऱ्या सर्व घटनाना संपूर्णपणे स्वत च जबाबदार असतो. तो सिद्धात असे सागतो की, माणसाच्या आयुष्यात ज्या घटना घडतात, त्याविषयी त्याचा जो अनुभव असतो, त्याला तो स्वतःच सपूर्णपणे जबाबदार असतो हाच सिद्धात वेगळया शब्दात सागावयाचा झाला तर असे म्हणता येईल की, माणसाच्या आयुष्यात कोणत्याही घटना घडल्या तरी त्याविषयी तो स्वत.ला जे काही सागत असतो, त्याला तो स्वत च जबाबदार असतो.

**डॉ. एलिस :** परंतु तसे म्हणणेही बरोबर नाही माणूस त्याच्या आयुष्यात घडणाऱ्या घटनाविषयी स्वत ला जे सागत असतो त्याला तो काही सपूर्णपणे जबाबदार नसतो. कारण स्वत ला काही विशिष्ट गोष्टी सागण्याची प्रवृत्ती घेऊनच तो जन्माला येत असतो. आपण जेव्हा 'सपूर्णपणे' किंवा 'निखालसपणे' असे शब्दप्रयोग करतो, तेव्हा बहुधा आपण मूखपणा करीत असतो. आम्ही विवेकनिष्ठ मानसोपचारतज्ज्ञ म्हणतो त्याप्रमाणे, पौर्वात्य धर्म जर माणूस त्याच्या आयुष्यात घडणाऱ्या सर्व घटनाना संपूर्णपणे जबाबदार असतो असे न म्हणता, तो पुष्कळ अशी जबाबदार असतो, असे म्हणतील तर ते अधिक समजस होतील व मग ते धर्म इतके गूढवादी राहणार नाहीत. स्वत ला सपूर्णपणे बदलण्याचे सामर्थ्य कोणत्याच माणसात नसते. माणूस हा मर्यादित सामर्थ्याचा, प्रमादशील व बेवकूफ प्राणी आहे! माणसाची ही ठेवण त्याच्या जैविक व सामाजिक परिस्थतीने झालेली आहे माणूस काही प्रमाणात त्याच्या उपजत प्रवृत्तीवर मात करू शकतो किंवा त्याच्या पलीकडे भरारी मारू शकतो; परतु पूर्वेकडील व बहुतेक सर्व धर्म, माणूस त्याच्या काही मर्यादाच्या पलीकडे भरारी मारू शकतो, यावरच विश्वास ठेवतात असे नाही तर ते कोणत्या तरी अतिमानुष अशा श्रेष्ठ शक्तीवर विश्वास ठेवतात. अशी काही अतिमानुष श्रेष्ठ शक्ती अस्तित्वात असणे बहुताशकरून असंभाव्य आहे,म्हणून जगात अशी काही शक्ती आहे यावर भक्तिभावाने विश्वास ठेवणे म्हणजे कमालीच्या भावनिक प्रक्षुब्धतेचे लक्षण म्हणावे लागेल. बहुतेक सर्व पौर्वात्य व पाश्चिमात्य धर्मही अशाच एखाद्या सुख–शाति–समृद्धीच्या स्वर्गाची वेडपट कल्पना फैलावीत असतात. माणसाच्या सामर्थ्याची स्पष्ट मर्यादा ते मान्य करीत नाहीत. माणूस आपल्या काही मर्यादावर मात करू शकतो आणि विशेषत. आपल्या काही मर्यादावर मात करण्यासाठी तो जर विवेकनिष्ठ मानसोचार–पद्धतीत अगभूत असलेल्या विवेकी, सुज्ञ व विज्ञानाधिष्ठित जीवन–तत्त्वज्ञानाचा अंगीकार करील, तर फारच उत्तम! पण तो स्वत च्या सर्वच मर्यादावर व प्रमादशीलतेवर मात करू शकत नाही. ही वस्तुस्थिती पौर्वात्य व गूढवादी धर्म मान्य करण्याचे नाकारतात व माणसाला अवनीतलापलीकडील स्वर्गाकडे जाणारा एखादा रस्ता दाखवितात; पण खरे पाहता तो रस्ता म्हणजे वस्तुस्थितीपासून पलायन करण्याचा मार्ग असतो.

**श्री. सोबेल :** तुमच्या आयुष्यात असे काय घडले की, ज्यामुळे तुम्ही तुमची अविवेकीपणे वागण्याची जन्मजात मानवी प्रवृत्ती झुगारून दिलीत अथवा तिच्या विरुद्ध वर्तन करू लागलात ?

**डॉ. एलिस :** हाच तो वेडपटपणा! म्हणजे काही तरी विलक्षण घडले म्हणून 'मी असा झालो', असे समजणे! माझ्या आयुष्यात काही तरी विलक्षण घडले व म्हणून मी माझ्या जन्मजात अविवेकी प्रवृत्तीच्याविरुद्ध दिशेने प्रवास करू लागलो, असे समजणे म्हणजेच तो फ्रॉइडप्रणीत मनोविश्लेषणात्मक खुळचटपणा! पहिली गोष्ट अशी की, बर्टरॅंड रसेल किंवा डेव्हिड ह्यूम हे जसे सशयवादी, पाखडी प्रवृत्ती घेऊन जन्माला आले असावेत, तसाच बहुधा मीही ती जन्मजात प्रवृत्ती घेऊनच या जगात आलो आहे. त्यामुळे मी माझ्या स्वत च्या व इतराच्या जीवनात घडणाऱ्या घटनाचे निरीक्षण केले आणि माझ्या असे लक्षात आले की, मी जर निर्धारपूर्वक प्रयत्न केला तर माझ्या मनातील काही अविवेकी कल्पना व माझे वर्तन बदलू शकतो.

स्वत.च्या वर्तनाविषयी केवळ अतर्दृष्टी प्राप्त करून घेऊन नाही तर प्रत्यक्ष कृती करून माणूस स्वत त बदल घडवून आणू शकतो, ही कल्पना बहुतेक पौर्वात्य धर्मांत समाविष्ट केलेली दिसते. म्हणून त्या बहुतेक धर्मांनी आत्मनियत्रणावर भर देऊन कोणती ना कोणती शिस्तबद्ध कृती स्वीकारलेली आढळून येते; पण बहुतेक पौर्वात्य धर्मांत काही मूर्ख आत्मनियत्रणाचाही समावेश झालेला आहे. उदाहरणार्थ : कामप्रेरणेचे दमन करणे किंवा झपाटल्याप्रमाणे ध्यान करणे इत्यादी. अशा कृतीमुळे माणसाला चुकीची शिस्त लागते; पण माणसाने मानवी मर्यादापलीकडे भरारी मारण्याची धडपड थाबवून, स्वत.चे अविवेकी विचार व आत्मघातकी वर्तन बदलण्याचा प्रामाणिकपणे प्रयत्न केला तर, त्यात त्याला बऱ्याच अशी यश मिळेल. माणसाला असे करता येणे शक्य आहे, ही वस्तुस्थिती माझ्यासारखे किंवा बर्टरॅंड रसेल याच्यासारखे लोक ओळखतात व ते या विचारसरणीचा पाठपुरावा करून त्यानुसार वर्तन करतात. कित्येक लोकाना आपल्या स्वत मध्ये बदल कसा करावा हे समजते, तरी सुद्धा ते लोक स्वत मध्ये बदल करण्यासाठी कोणताच प्रयत्न करीत नाहीत. 'मी काय केल पाहिजे, ते मला आता समजले' असे ते स्वत ला सागतात; पण आपल्या या विचारानुसार ते कृती मात्र करीत नाहीत.

**श्री. सोबेल –** आपल्या स्वतःच्या विचारानुसार कृती करावीशी न वाटणे, हीसुद्धा जन्मजात प्रवृत्तीच आहे, असे म्हणता येईल काय ?

**डॉ. एलिस –** अवश्य! आपल्या अतिम किंवा दूरवरच्या फायद्यासाठी नजीकच्या काळात कराव्या लागणाऱ्या त्रासदायक गोष्टी करण्याचे टाळणे, यालाच वैफल्य सहन करण्याची अल्प कुवत असे म्हणतात आणि तिच्यामागेही माणसाच्या तीन जन्मजात अविवेकी प्रवृत्तींपैकी एक प्रवृत्ती धुमसत असते त्या तीन अविवेकी प्रवृत्ती म्हणजे .

१) मी सर्व गोष्टी बिनचूक व परिपूर्ण रीतीनेच केल्या पाहिजेत आणि मी तसे केले नाही तर, माझ्यावर भयकर अनर्थ ओढवेल

या प्रवृत्तीचा परिणाम म्हणजे विमनस्कता, चितातुरता व न्यूनत्वाची भावना.

**आपण 'संपूर्णपणे' किंवा 'निखालसपणे' असे म्हणतो तेव्हा आपण मूर्खपणा करीत असतो**

२) इतरानी माझ्याशी योग्य रीतीनेच वागले पाहिजे इतरानी माझ्याशी दुष्टपणे व असमजसपणे वागताच कामा नये.

या प्रवृत्तीचा परिणाम म्हणजे शत्रुत्वाची व क्रोधाची भावना.

३) माझ्या सभोवतालच्या जगातील परिस्थिती मला सोयिस्कर अशीच असली पाहिजे आणि माझी उद्दिष्टे साध्य करण्यासाठी मला परिश्रम करावे लागताच कामा नयेत. दूरवरच्या हितासाठी मला सध्या कष्ट करावे लागत आहेत, ही गोष्ट किती भयकर आहे!

**श्री. सोबेल** – तुमच्या सस्थेत, शुक्रवारी रात्री तुमच्यापुढील श्रोत्यापैकी एखादा माणूस व्यासपीठावर येऊन, त्याची समस्या तुम्हाला सांगू लागला की, तुम्ही त्याच्या समस्येचे निराकरण कसे करता, ते मी काही वेळा पाहिले आहे आणि त्या वेळी मला असे वाटले की, तुम्हाला त्या माणसाबद्दल सहानुभूती व जिव्हाळा वाटत नसावा. तुमच्या विवेकनिष्ठ मानसोपचारपद्धतीचा उपयोग करताना, मानसोपचारतज्ज्ञाने या गुणाना मुद्दामच फाटा देणे आवश्यक आहे असे तुम्हाला वाटते काय ?

**डॉ. एलिस** – विवेकनिष्ठ मानसोपचारपद्धतीचे ते काही अगदी व्यवच्छेदक लक्षण नाही; पण विवेकनिष्ठ मानसोपचारपद्धतीचा अवलब करणाऱ्या तज्ज्ञाने तसे केले तर बरे. माझ्याकडे आलेल्या माणसाशी मी जाणूनबुजूनच फारशा सहानुभूतीने व जिव्हाळ्याने वागत नाही. कारण मी जर तसा वागलो तर, तो माणूस स्वतःला सागेल की, 'डॉ. एलिस याना मी आवडतो, तेव्हा मी स्वतःला नालायक न समजता स्वतःचा स्वीकार करावयास हरकत नाही.' आणि मग तो माणूस माझा निरोप घेऊन गेल्यावर, त्याच्या लक्षात येईल की, त्याच्या दैनंदिन जीवनात बहुतेक इतर लोकाना त्याच्याबद्दल काहीच वाटत नाही किंवा ते लोक त्याला काय वाटेल, याची फारशी पर्वा करीत नाहीत. अर्थात दैनंदिन जीवनात माणसाना एकमेकांबद्दल आपुलकी वाटली तर छानच होईल! मात्र प्रत्यक्षात त्याना बहुधा एकमेकांबद्दल विशेष आपुलकी वगैरे वाटत नसते त्यामुळे माझा निरोप घेऊन गेलेला माणूसही, कोणा तरी प्रेमळ मानसोपचारतज्ज्ञाकडून मानसोपचार करवून घेतलेल्या माणसाप्रमाणेच स्वतःला क्षुद्र लेखण्यास प्रवृत्त होईल.

उलट, मी माझ्याकडे आलेल्या माणसाला असे शिकवितो की, मला अथवा या जगातील दुसऱ्या कोणालाही, तो आवडला वा न आवडला तरी, त्याने आपल्या स्वतःचा स्वीकार करावा. अर्थात माझ्याकडे येणाऱ्या माणसापैकी काही माणसे मला आवडतात व मला ती माणसे आवडतात हे मी माझ्या वागण्यातून व्यक्तही करीत असेन; पण मानसोपचार करताना मी ही गोष्ट शक्यतो टाळतो. कारण मी त्याच्याबद्दल खरोखरच फार प्रेम दाखविले तर, ती माणसे असा निष्कर्ष काढतील की, मला त्याच्याबद्दल प्रेम वाटते, म्हणून त्यानी स्वतःचा स्वीकार करावयास हरकत नाही आणि ही विचारसरणी धोकादायक आहे. कारण वास्तविक पाहता, त्यांना आपल्या स्वतःचा स्वीकार करण्यासाठी माझ्या प्रेमाची काहीच आवश्यकता नसते.

**श्री. सोबेल** : याचा सरळ अर्थ असा की, तुमच्या म्हणण्याप्रमाणे मानसोपचारतज्ज्ञाने त्याच्याकडे सल्लामसलतीसाठी आलेल्या लोकाना तो आवडतो की नाही याची सुद्धा फिकीर करता कामा नये.

**डॉ. एलिस** : बरोबर आहे. अर्थात याचा अर्थ असा नाही की, माझ्याकडे येणाऱ्या लोकाना मी आवडतो अथवा नाही याची मी अगदी काहीच पर्वा करीत नाही; पण मी त्याच्या पसतीला उतरल्यामुळे माझ्यात काही बदल होत नाही किंवा मी कोणी चागला माणूस आहे, असे सिद्ध होत नाही. तसेच, त्याना मी आवडलो नाही तर नाही! एकदा माझ्याकडे आलेला माणूस मला म्हणाला, 'स्पष्टपणे सागावयाचे म्हणजे यापूर्वी मी ज्या एका मानसोपचारतज्ज्ञाकडे जात होतो, तो मला खरोखरच आवडत असे; पण त्याच्याकडे जाऊन मला काही मदत मिळाली नाही. उलटपक्षी, तुमच्याबद्दल मला काही विशेष प्रेम वाटत नाही; पण तुमच्याकडे येण्यामुळे माझा काही फायदा झाला आहे.' त्याचे बोलणे मला आवडले कारण माझ्याकडे येणाऱ्या लोकाना मी आवडण्याऐवजी त्याना माझ्याकडून मदत मिळाली, तर ते मला अधिक पसत पडते. माझे काम त्याना मदत करावयाचे आहे त्याचे प्रेम सपादन करण्याचे नाही.

**श्री. सोबेल** : तुम्हाला असे वाटते काय की, माणसाचे जीवन म्हणजे त्याला मिळालेली फक्त एकमेव सधी आहे? म्हणजे पुनर्जन्मावर तुमचा विश्वास नाही काय?

**डॉ. एलिस** : माझा पुनर्जन्मावर विश्वास नाही जो माणूस ईश्वर, कर्मसिद्धात, अमरत्व इत्यादी गोष्टीवर विश्वास ठेवतो तो एक प्रकारे वस्तुस्थितीपासून पळून जात असतो कारण त्या माणसाजवळ आपल्याला हा फक्त एकच जन्म मिळालेला आहे, ही वस्तुस्थिती मान्य करण्याची हिंमत नसते.

आपल्याला मिळालेला हा एकमेव जन्म आहे म्हणून आपण या आयुष्यात जितका आनद उपभोगता येईल तितका तो उपभोगावा, हे उत्तम! पौर्वात्य धर्माची साक्ष देऊन, जी माणसे पुनर्जन्मावर विश्वास ठेवतात त्याची ही वस्तुस्थिती मान्य करण्याची हिंमत नसते की, आपण या पृथ्वीवर एकदाच जन्म घेत असतो आणि आपण जेव्हा मरतो, तेव्हा आपली माती होते! पुनर्जन्मावर अत्यत दृढ विश्वास ठेवणे म्हणजे मूर्खपणा आहे, असे म्हटले तर ते फारसे वावगे होणार नाही. माणसाचे या जन्मापूर्वीचे किंवा त्याच्या मृत्यूनतरचे अस्तित्व सिद्ध करणारा कोणताही भक्कम पुरावा उपलब्ध नाही आणि कोणत्याही सयुक्तिक अर्थाने माणसाचे अमरत्व अस्तित्वात असेल तर, आपल्याला आपल्या पूर्वीच्या जन्माची स्मृती असावयास हवी; पण आपण आपले जीवन या जगात संपूर्णत नव्याने सुरू करतो, म्हणून अमरत्वाच्या कल्पनेवर विसबून राहणे वेडपट व इच्छानुवर्ती विचारसरणीचे लक्षण आहे, असे म्हटले पाहिजे आणि असा विचार करणे म्हणजे वस्तुस्थितीकडे खुशाल पाठ फिरविण्याचा प्रकार आहे!

**श्री. सोबेल** : तुम्ही तुमच्या स्वतःच्या मृत्यूविषयी विचार केला आहे काय? म्हणजे तुम्ही ही एक दिवस मरणार आहात, या सत्याला तुम्ही तोड दिले आहेत काय?

**डॉ. एलिस** : आज माझे वय त्रेसष्ट आहे व मला मधुमेहाचा विकार आहे. त्यामुळे मी बहुधा माझ्या माहितीतील बहुतेक लोकाच्या अगोदर मरणार आहे. ठीक आहे. मी अगोदर मरणार आहे.

**श्री. सोबेल** : तुम्हाला त्याचे काहीच वाटत नाही?

**डॉ. एलिस :** तसे नाही. मला काही लवकर मरण्याची हौस नाही. उलट मला अगदी चिरंजीव होणेही आवडेल ! निदान जेवढे अधिक आयुष्य जगता येईल, तेवढे आनंदाने जगणे मला हवेच आहे. जी माणसे आपण मरणार या कल्पनेने कण्हत–कुंथत असतात, त्यांच्यापैकी बहुतेकजण प्रत्यक्षात मरतील तर सुटतील असे म्हणता येईल. तेव्हा मी जर चिरंजीव झालो व आज ज्या रीतीने जीवनाचा सर्वांगाने मनमुराद आनंद उपभोगत आहे तसाच तो उपभोगत राहिलो, तर फारच छान होईल ! पण तसे होणार नाही. ठीक. नाही तसे होणार ! पण मी चिरकालपर्यंत जिवंत राहू शकणार नाही, म्हणून कण्हत–कुंथत बसण्यापेक्षा, मी जिवंत आहे तोपर्यंत आनंदाने जगावे; हेच शहाणपणाचे ! वस्तुस्थिती ही अशी आहे. तेव्हा आता माझे आजचे जीवन अधिक आनंदी व कमी क्लेशकारक करण्याच्या रोमहर्षक कार्यात मग्न झालेले बरे ! □

डॉ. अल्बर्ट एलिस यांची वरील मुलाखत एकोणीसशेसत्त्याहत्तर साली प्रसिद्ध झाली होती. आज त्यांना एकाहत्तरावे वर्ष चालू आहे. तरी अजूनही ते जगभर प्रवास करून, व्याख्याने, चर्चासत्रे व शिबिरे यांच्याद्वारे आपल्या विवेकनिष्ठ जीवन-तत्त्वज्ञानाचा व मानसोपचारपद्धतीचा प्रसार करीत असतात. शिवाय त्यांच्या लेखनसंपदेतही भर पडतच आहे. आजपर्यंत त्यांच्या नावावर जवळजवळ पन्नास पुस्तके व पाचशे निबंध जमा आहेत. साहजिकच या लेखांद्वारे त्यांच्या जीवनतत्त्वज्ञानाचे व मानसोपचारपद्धतीचे संपूर्ण दर्शन वाचकांना होईल, असे म्हणणे अवास्तव आहे. तथापि वाचकांना एका विचारसरणीची तोंडओळख होईल व त्यांच्या मनात डॉ. एलिस यांच्या कार्याविषयी जिज्ञासा उत्पन्न होईल, अशी आशा वाटते. □

---

## गारांचा पाऊस

शोभा भागवत

# जबाबदारीशिवायचं स्वातंत्र्य

सध्या एका मुलीच्या काळजीत आम्ही काही मित्रमंडळी आहोत. २०–२२ वर्षांची मुलगी. नाव नंदा. आईची एकुलती एक. वडील लहानपणीच वारलेले. शिक्षण पाचवीपर्यंत झालेलं. आईनं तिला अतिशय लाडात वाढवलं. स्वतः खूप कष्ट केले, तिला काम करू दिलं नाही. कष्ट म्हणजे धुणी, भांडी, घरकाम सगळंच. तिच्यासाठी थोडा पैसा शिल्लक ठेवला. खोली ठेवली.

नंदाला आईनं कधी एका शब्दानं दुखवलं नाही. तिला सगळं स्वातंत्र्य दिलं. तिनं मागितलं ते पुरवलं. लग्नाच्या बाबतीतही तिला सांगितलं होतं, तुला पसंत असलेला मुलगा सांग, मी जाऊन विचारीन. तुला पसंत नसला तर लग्न करू नको. तुझं सुख मला बघायचंय. ते महत्त्वाचं आहे.

नंदाची आई वर्षापूर्वी वारली. तिला काही दुर्धर रोग होता हे अनेक वर्षं लक्षातच आलं नव्हतं. एकदम खचली.

नंदा आता एकटी पडली आहे. एका मुलाशी तिनं लग्न केलं; पण त्याच्याशी रोज भांडणं व्हायची. भांडणाची कारणं तशी क्षुल्लक. नंदाला घरातलं काही करायची सवय नाही. तेही नवरा फारसं मनावर घेत नव्हता. नवऱ्यानं खूप पैसे मिळवावेत, आपल्याला सुखात ठेवावं, रोज हॉटेलात, सिनेमाला घेऊन जावं, त्यानं त्याच्या घरच्यांचं काही ऐकू नये. आपल्याच भोवती असावं, ह्या नंदाच्या अपेक्षा. 'तुझं सुख महत्त्वाचं' ही आईनं दिलेली शिकवण वेगळ्या अर्थानं नंदानं अंगी मुरवून घेतली आहे.

नवऱ्याशी पटत नाही, भांडणं होतात म्हटल्यावर नंदानं नवऱ्याला निकालात काढलं. हा मला सुख देणार नाही. हा मला आवडत नाही. हा मला नको. असं साधं तर्कशास्त्र !

इतरांसाठी काही कधी केलेलं नाही. असं इतरांना समजून घेणं माहीत नाही त्यामुळं नंदाला मैत्रिणी नाहीत. योगायोगानं जवळपासच्या ज्या मुलींशी काही संबंध आला त्यांना तिनं आपल्या स्वार्थासाठी वापरून घ्यायचा कायम प्रयत्न केला. आपल्या गरजेप्रमाणे हिच्या चहाड्या तिला सांग, तिचं वाईट हिला सांग असं करून त्यांच्यात भांडणं लावून द्यायचा प्रयत्न केला. एकीचा विश्वास मिळवण्यासाठी दुसरीची तिच्याकडे निंदा केली; पण त्यातून नंदाचं काहीच साधलं नाही. नंदाला माणसं आपलीशी करून घ्यावीत असं वाटतं; पण ते कसं ते माहितच नाही. आजवरचा सगळा विचार स्वयंकेन्द्रित असल्यानं दुसऱ्या कुणाला त्यात स्थानच नाही.

ह्या स्वयंकेन्द्रित विचाराचा आणखी एक गंभीर परिणाम म्हणजे आपल्याला जो चांगलं म्हणेल तो नंदाला आपला माणूस वाटतो आणि अशा एकट्या पडलेल्या मुलीचा फायदा घेणारी माणसं काय कमी असतात का ? ही आता कुणाच्या आहारी जाईल अशी भीती कायम आहे.

मुळात नंदा डोक्यानं हुशार आहे; पण त्या हुशारीचा उपयोग काही शिकणं, काही कौशल्यं मिळवणं याकडे झालेला नाही, आई अनेक गोष्टी शीक शीक म्हणत होती; पण तेव्हा नंदानं काही मनावर घेतलं नाही. आता स्वतःच्या पायावर उभं रहावं तर धुणं-भांडी-घरकाम हा पर्याय समोर आहे. तो अपमानकारक वाटतो आहे. आता ही हुषारी तात्पुरतं काही करून, काहीही थापा मारून याच्याकडून पैसे काढ, त्याच्याकडून पैसे काढ अशी वापरली जाते आहे.

पुन्हा थोडे पैसे हाती आले तर त्यांचा योग्य तो उपयोग कसा करावा, आपले प्रश्न जास्तीत जास्त चांगल्या प्रकारे कसे सोडवावे याचा विचार नंदाच्या मनात येत नाही. ते पैसे लवकरात लवकर उधळून टाकून नंदाबाई पुन्हा डोक्याला हात लावून बसणार !

इतक्या सविस्तरपणे नंदाबद्दल सांगायचं कारण ज्या वयात भावी आयुष्याबद्दल तयारी व्हायची त्या वयात नंदाचे पालक जबाबदारीनं वागले नाहीत.

आईनं तिचे लाड केले; पण तिला तिचं कर्तव्य शिकवलं नाही. तिला स्वातंत्र्य दिलं;

पण जबाबदारीची जाणीव दिली नाही. तुझं सुख महत्त्वाच हा संदेश दिला. पण दुसऱ्यासाठीही काही करावं लागत, झिजाव लागत हे शिकवल नाही.

मला कल्पना आहे की, हे सोपं नाही. नवरा गेलेला, एकुलती एक मुलगी, कपाळी कष्ट लिहिलेले ह्या सर्व ताणात अशिक्षित आई एवढा विचार करू शकेल हे कठीणच आहे, पण कधीकधी चागले पालक व्हायच्या कल्पनेन आपण अत्यंत वाईट पालक बनून जातो आपण दहा वर्षे केलेले लाड मुलाला पुढे साठ वर्षे भोगावे लागतात पालकाच्या प्रेमळ वागण्यातून जे सहज शिकायच ते जगात टक्केटोणपे खाऊन, अपमान करून घेऊन, कधीकधी जबरदस्त किंमत देऊन शिकावं लागत

पालक बनताना हा विचार करण, याची तयारी ठेवण केवढ अगत्याच आहे. काही ना काही कारणानी एकट्या पालकावर मुल साभाळायची जबाबदारी येते. बऱ्याच वेळा ती आईवर येते. कारण कधी नवरा बेजबाबदार असतो, कधी अचानक मृत्यू घडतो, कधी घटस्फोट होतो. अशा वेळी एकट्यान जबाबदारीनं मुल वाढवण ही सत्त्वपरीक्षाच असते.

अशा एकट्या पालकाच्या कुटुंबाना Single parent family म्हणतात; पण खर तर ती Double parent ची जबाबदारी एकावर पडलेली असते अशा वेळी मुलाची 'नदा' होऊ नये म्हणून वेळेवर जागृत रहाव लागत कर्तव्याशिवायचे लाड, जबाबदारी वगळून स्वातंत्र्य कुणाचच भलं करत नाही. □

# रंगभूमी

## नव्या कलावंतांनी घडवलेलं महाराष्ट्र 'स्व' भाव दर्शन

वि. भा. देशपांडे

गणपतीचे दिवस. भव्य मूर्ती,त्याच्या कितीतरी पटीनी लक्ष वेधणारी विद्युत रोषणाई आणि तीकडे अधिक लक्ष जावे म्हणून ओरडून आपल्याला अस्वस्थ करणाऱ्या चित्रपट-ध्वनिमुद्रिका अशा प्रचड कल्लोळात सध्याचा गणेशोत्सव स्वत चे सत्त्व गमावून बसलाय. पुण्यामध्ये आता फारच अल्प प्रमाणात उत्सव करणारे लोक उरले आहेत, की जे रोषणाई-ध्वनिमुद्रिका याच्यात हरवून न जाता काही वेगळे कार्यक्रम घडवून आणतात. निदान बाकी कोणी नाही तरी लोकमान्याच्या गायकवाडवाड्यात ते अव्याहत घडते आहे, याचा मनस्वी आनंद होतो. या वर्षी जे काही कार्यक्रम झाले त्यामध्ये एक लक्षवेधी कार्यक्रम होता, तो म्हणजे सावळे आणि पार्टीचा 'महाराष्ट्र 'स्व' भाव दर्शन!'

शाहीर सावळे आणि त्याच्या पार्टीतील कलावत यानी केलेले अनेक कार्यक्रम आपण विविध माध्यमातून ऐकलेले आहेत; पण हा कार्यक्रम काहीसा वेगळा होता प्रथमदर्शनी जाणवणारी गोष्ट म्हणजे यात खुद्द शाहीर सावळे कोठेच नव्हते. प्रेक्षकाच्या प्रेमापोटी ते दहा मिनिटे बोलले इतकेच, पण प्रत्यक्ष कार्यक्रमात त्याचा सहभाग नव्हता. हा सारा कार्यक्रम सावळे याच्या कन्या, पुत्र, स्नुषा आणि त्याचे अन्य साथीचे कलाकार यानी केला महाराष्ट्र यूथ क्वायर याच्या वतीने हा कार्यक्रम पेश झाला. कार्यक्रम मराठी आणि सस्थेचे नाव इग्रजी का? असा प्रश्न निर्माण झाला, तर त्यावरचे उत्तर शाहीरानी आपल्या भाषणात सांगितले त्याचा साराश असा की, महाराष्ट्रातल्या लोककलाचा परिचय महाराष्ट्राबाहेर अन्य भाषिकाना व्हावा, असा या सस्थेचा हेतू आहे, म्हणून या प्रकारचे इग्रजी नाव दिले. (खरे तर शाहिरानी खुलासा करण्याचे प्रयोजन नव्हते, कारण महाराष्ट्रात अशा इग्रजी नाववाल्या मराठी सास्कृतिक सस्था भरपूर आहेत. त्याची आपल्याला सवय आहे त्याहीपेक्षा जे शहरी लोक दोन मराठी शब्दाआड एक इग्रजी शब्द किंवा त्या उलटही पद्धतीने बोलतात अशा 'खास मराठी' मडळीना इग्रजी नावाच्या सस्थेचे अप्रुप नाही!)

या कार्यक्रमाचे शीर्षक सहेतुक आहे. महाराष्ट्राच्या सास्कृतिक गोष्टीचा विशेषत. लोककलाचा परिचय करून देणे हा आहे यामध्ये भूपाळी, ओवी, अभंग, नमन, तमाशा, भारूड, गण-गौळण, वग आदी अनेक लोककला प्रकार आहेत या लोकप्रकाराच्या जोडीनेच उत्तरार्धात कोळी जीवनातील अनेक विशेष व्यक्त करणारा नृत्य-सगीताचा एक कार्यक्रम होता

या सपूर्ण कार्यक्रमाला चढती रगत होती नृत्य-सगीत आणि काही प्रमाणात अभिनय असा तिन्हीचा मेळ असल्याने हा कार्यक्रम अडीच-तीन तास प्रेक्षकाना खिळवून ठेवणारा, बसवून ठेवणारा आहे मुख्यत. प्रत्येक प्रकाराची केलेली निवड उत्तम होती यात एक धोरण साभाळलेले होते ते म्हणजे लोकाना परिचित अशा काही लोककलाच्या रचना होत्या, तर उरलेल्या नव्या होत्या! त्यामुळे सर्वच प्रकार अपरिचित नव्हते. जे माहीत आहे ते अतिशय तन्मयतेने लोक पाहात-ऐकत होते आणि जे नवे-वेगळे होते ते कुतूहलाने स्वीकारत होते!

या कार्यक्रमाचे सारे श्रेय सावळयाच्या दुसऱ्या पिढीकडे जाते. चारुशीला साबळेने सयोजन आणि निवेदन अतिशय सहज पण प्रभावीपणाने केले. देवदत्त सावळेने अनेक रचनाना चाली देऊन योग्य ते मार्गदर्शन केले. सपूर्ण कार्यक्रमात विनोदाची बाजू विजय कदमने नेहमीच्याच गुणवत्तेने साभाळून रगत आणली. त्याच्या चपळाईचे (शारीर आणि शाब्दिक) नेहमीच कौतुक वाटते. कार्यक्रमाचा गानवृंद आणि वाद्यवृंद अतिशय प्रभावी होता कार्यक्रमाच्या एकूणच आख-

णीत कोठेच हौसेचा भाग नव्हता. प्रत्येक गोष्टीतली बारकाई नजरेत भरणारी होती. विशेषत रगभूषा, वेशभूषा इत्यादी शाहीर साबळयाची दुसरी पिढी इतक्या नव्या दमाने, आत्मविश्वासाने आपली कला पेश करताना पाहून मनोमन आनद वाटत होता.

हा कार्यक्रम पाहात असताना सतत वाटत होते की, शाहीर साबळे म्हणाल्याप्रमाणे अ-मराठी लोकाना हा कार्यक्रम तर दाखवावाच; पण असख्य मराठी लोकानाही दाखवणे आवश्यक आहे. कारण अशा कार्यक्रमातून रजन तर होतेच; पण आपल्या लोककला-विषयी, सस्कृतिविषयाविषयीही भरपूर माहिती मिळू शकते महाराष्ट्रातल्या अनेक गावी हा कार्यक्रम मोठ्या प्रमाणात न्यावा इतक्या गुणवत्तेचा आहे त्याची श्रवणीयता आणि प्रेक्षणीयता खिळवून ठेवणारी आहे !

□

## जेनिफरचं निधन

जेनिफर केंडल ही आग्ल कलावती नुकतीच निधन पावली. प्रसिद्ध चित्रपटअभिनेता शशी कपूर याची ती पत्नी म्हणून आपल्याला परिचित झाली. जेनिफर-निधनाची वार्ता समजताच आपल्या डोळयासमोर तिचे दोन महत्त्वाचे चित्रपट येतात. 'जुनून' आणि '३६ चौरंगी लेन' ह्या दोन्ही चित्रपटातील तिच्या भूमिका दीर्घकाळ स्मरणात राहतील. तिला आईवडलाकडून अभिनयाचा सस्कार होता. तिने ब्रिटिश रगभूमीवर अनेक नाटकातून भूमिका केल्या होत्या. योगायोगाने शशी कपूरलाही पृथ्वीराज कपूराकडून अभिनय वारसा आलेला आहे मुबईला जुहू या ठिकाणी जे पृथ्वी थिएटर नावाचे नाटकाचे प्रेक्षागृह आहे ते उभारण्यात शशी कपूरच्या जोडीनेच जेनिफरने फार मोलाचे साह्य केलेले होते हे दोघेही अनेक प्रयोगाच्या वेळी तिथे जातीने उपस्थित असत. नाटकाच्या-रंगभूमीच्या सदर्भात सतत काही चागले घडावे अशी तिची इच्छा असे केवळ इच्छाच नव्हे तर सक्रिय पाठिंबा असे ! अशी भारतीय नसूनही भारतीय रगभूमीविषयी प्रेम असणारी गुणी कलावती ऐन पन्नाशीत जावी याचे मनापासून दु:ख होते !

□

चित्रपट

# गुणी पण फारशी दाद न मिळालेली जेनिफर

जेनिफरचा आमचा परिचय दोन चित्रपटापुरता. 'जुनून' आणि '३६ चौरंगी लेन' जेनिफरला अभिनेत्री जेनिफर केंडल म्हणून ओळखणारे अगदी मोजके असतील. ज्याना जेनिफर नावाने बोध होणार नाही त्याना, 'जेनिफर म्हणजे शशीकपूरची बायको आणि कुणाल कपूरची आई' अशी ओळख करून द्यावी लागेल. ही ओळख सत्य असली तरी योग्य नाही. प्रचड अभिनय-सामर्थ्याच्या या बाईला शशीकपूरच्या पखाखाली आणून दुबळ करून टाकण अन्याय-कारक होईल

कारण ती कधीच सौ. शशी कपूर म्हणून जगली नाही. आपण त्याची पत्नी आहोत याचा तिला अभिमान असेलही; पण अभिनयाच्या बाबतीत ती फक्त 'जेनिफर केंडलच' होती. ती हिंदी चित्रपटसृष्टीत का रमू शकली नाही ? हिंदी चित्रपटसृष्टीन तिला आपलसं का म्हटल नाही ? हे सगळे प्रश्न आता निरर्थक आहेत- कारण कॅन्सरशी बराच काळ झुजून ती आता या जगातून निघून गेली आहे.

इग्लडमधल्या एका नाट्यवेड्या कुटुबात जन्मलेली जेनिफर. तिचे वडील, भाऊ सगळेच अभिनयातले दर्दी '३६ चौरंगी लेन' मधल्या वृद्धाश्रमात भेटणारा चिडचिडा म्हातारा तिच्याच कुटुबातला. '३६ चौरंगी लेन' मध्ये जेनिफरसकट एकूण तीन केंडल कुटुबियाच दर्शन घडल; पण चित्रपट नायिकाप्रधान असल्यानं, मनावर ठसली ती जेनिफरच

जेनिफरनं रगभूमीही गाजवली; पण पुण्यात राहून, तिची नाटक पहायची सधी मिळालीच नाही. तरीही केवळ दोन चित्रपटातून, त्यातही '३६ चौरंगी लेन' मधून तिन माझ्यासारख्या अनेक चित्र-रसिकाच्या हृदयात कायमच घर केलं असेल.

### अविस्मरणीय चित्रपट

भारतात राष्ट्रकुलपरिषद भरलेली. विविध देशप्रमुखाना उत्तम भारतीय चित्रपट दाखवायला हवा आणि केवळ योगमच्या निमित्तानच सर्वांना '३६ चौरंगी लेन' पहायला मिळाला. बहुश. इग्रजी आणि अशत बगाली भाषेतला हा चित्रपट. दिग्दर्शिका अपर्णा सेन आणि नायिका जेनिफर केंडल यानी शशी कपूरच प्रत्यक्षात उतरवलेल स्वप्न जगाच्या कानाकोपऱ्यातून दिल्लीत जमलेल्या नेत्याना आम्ही अभिमानान आणि आत्मविश्वासान हा चित्रपट दाखवला. कुठलाही दुसरा पुरस्कार या आत्मविश्वासापुढे कमी पडावा.

त्या नेत्याना तो आवडला की नाही, ते आपल्याला कळणार नाही; पण अनेक सामान्य प्रेक्षक तो पाहून अस्वस्थ होऊन गेले चित्रपटाला सर्वमान्यता मिळाली नाही ही गोष्ट खरी अनेकाना तो कटाळवाणा वाटला- 'अॅक्शन पॅक्ड' चित्रपटाची सवय झाल्यावर तो तसा वाटणं साहजिक आहे; पण ज्याना आवडला, त्याना बेहद्द आवडला.

एका प्रौढ अँग्लो-इंडियन शिक्षिकेच्या '३६ चौरंगी लेन' या इमारतीतल्या एकाकी जीवनाचं हे दर्शन होत. चित्रपटाच वैशिष्ट्य हे की, हा अनुभव त्या शिक्षिकेपुरता मर्यादित नाही. एकटेपणाचा, लोकाच्या 'गरज सरो वैद्य मरो' स्वभावाचा अनुभव प्रत्येकाला येत असतो. त्यामुळेच देश-खडाच्या सीमा पार करून फक्त 'माणूस' म्हणून अनुभवता येणारा हा चित्रपट जगातल्या विविध देशप्रमुखाना दाखवला असावा

चित्रपटातला शेवटचा प्रसग शब्दातून व्यक्त न करता येण्याजोगा आहे जेनिफरच्या हातातल्या केकचा वास घेत एक भटक कुत्रं त्या केकवर नजर ठेवूनच तिची एका काळोख्या रात्री सोबत करतेय् बस्, हाच अनुभव त्या शिक्षेकेला कायम येतोय्, पण नवल अस की, तरीही तिच्या स्वभावात तिळमात्रही कडवटपणा आलेला नाही शेक्सपिअर आणि वर्डस्वर्थच्या साहित्यकृतीवर

शिकविण्याचा जिला सार्थ हक्क आहे, तिला पाचवीला इंग्रजी व्याकरण शिकवावं लागतं; पण ही तेही सहन करते.

अँग्लो–इंडियन शिक्षिकेचीच भूमिका असल्यानं, जेनिफरला आपण लगेच स्वीकारतो. 'ही वाटतीये का तरी अँग्लो-इंडियन?' ही रसास्वादात आड येणारी कपाळावरची आठी उमटतच नाही आणि नंतर, तिच्या संयत अभिनयाचं दर्शन झाल्यावर तिची निवड किती सार्थ होती हे जाणवतं.

तेच 'जुनून' मध्येही होतं. ती पुरेपूर ब्रिटिश वाटते. या दोन चित्रपटांत तिला ज्याचा फायदा मिळाला तोच तिचा इतर चित्रपटांच्या बाबतीत तोटा तर ठरला नसेल ना ?

कपूर घराण्यातल्या 'बहू' चित्रपटात काम करत नाहीत हा नियम तिनं मोडला; पण त्याचं सार्थक केलं. झाकीर हुसेनला चमकावणारा, जेनिफरचा 'हीट अँड डस्ट' लवकरच पहायला मिळेल अशी आपण आशा करायची.

'जेनिफरला दाद मिळाली नाही' असं म्हटलं खरं. यापूर्वीच तिची दखल घ्यायला हवी होती; पण आपण निमित्ताची वाट पहात असतो.

पण तिचा मृत्यू, हे तिचं गुणगौरव करायला निमित्त ठरावं याचंच वाईट वाटतं

—उज्ज्वला लेले

# नाट्यपंढरी



### □ गडकऱ्यांची अखेरची इच्छा !

यावज्जीवही 'काय मी' न कळले आप्ताप्रती नीटसे

मिलातेहि कळे न गूढ– न कळे माझें मलाही तसे

अज्ञाता ! मरणोत्तर प्रकट ते होईल तूंते कसे

कोठे आणि कधी तरी जगति मी होऊन गेलो असे ।।

गडकऱ्यांनी 'माझा मृत्युलेख' ही कविता १ एप्रिल १९१८ रोजी An April Fool's Work म्हणून लिहिली– नि त्यांचा जीवनग्रंथ २३ जानेवारी १९१९ ला आटोपला. खरोखरच गडकरी हे एक गूढ होते. महाराष्ट्रसारस्वताचे एक स्वप्न होते. त्यांनाच आपण कोण आहो ते कळले नाही मग दुसऱ्यांना कसे कळणार ?

पण गडकरी अतिशय भावनावश होते. जसे चिंतामणराव कोल्हटकरांना 'राजसंन्यास'चे प्रवेशच्या प्रवेश देहाभान विसरून सांगत, तसेच कधी दुःखी–कष्टी झाले, की अगदी मनातली गोष्ट मित्रांना सांगत. त्यांना तो उमाळा अनावर होत असे. १९१८ च्या डिसेंबरात त्यांची प्रकृती एकाएकी फारच खालावली होती. पायावर सूज आली होती. चिंतामणराव म्हणाले, 'या डॉक्टरांचे औषधाने तुम्ही खात्रीने बरे व्हाल, मास्तर. पण त्या सरस्वतीच्या लाडक्या पुत्राला, वुद्धीच्या वृहस्पतीला जणू आपली अखेर समोर दिसत होती. मृत्यूचे 'स्वगत' ऐकू येत होते. ते गहिंवरून चिंतामणरावांना म्हणाले, 'कोल्हटकर, ट्रंकेच्या तळाशी एका कागदाच्या पुडीत, माझा जिथे जन्म झाला त्या नवसारीच्या घरातली थोडी माती आहे, ती माती माझ्या मृत्यूनंतर दहनसमयी...' त्यांना हुंदका आवरेना. तोंडून शब्द फुटेनात. चिंतामणरावांना अश्रू आवरेनात.

त्यांच्या मृत्यूसमयी चिंतामणराव सावनेरला पोचू शकले नव्हते. त्यांनी सावनेरला पोचल्यावर त्यांच्या ट्रंकेतली ती माती दहनभूमीवर घातली होती का, म्हणून चौकशी केली, पण 'नाही' असे कळले. त्यांनी ती माती घेतली नि दहनभूमीवर गेले. अश्रूसिंचनात–अश्रूंच्या अर्घ्यात ती माती आधी 'श्रीशं वन्दे' नि अखेर

'ब्रह्मा-र्पणं ब्रह्महविर्ब्रह्माग्नौ ब्रह्मणा हुतम।

ब्रह्मैव तेन गन्तव्यं ब्रह्मकर्म समाधिना ।।


असे म्हणून दहनभूमीवर तिचे विसर्जन केले. चिंतामणराव म्हणतात, 'ऋणानुबंधाचे धागे जोडले ते दुर्दैवाने तुटून पडले.'

गोविंदाग्रज–बाळकराम–राम गणेश या काव्य–विनोद–नाट्य, या त्रिमूर्तीरूप लाडक्या दैवताला मराठी माणूस कायमचा अंतरला.

### □ स्मारक !

गडकऱ्यांची आपल्या स्मारकासंबंधीची कल्पनाही अगदी आगळी वेगळी; पण त्यांच्या बालसदृश वृत्तीशी मिळतीजुळतीच होती. त्यात कर्तबगारीचा अभिनिवेश नव्हता. मोठेपणाची महती नव्हती. होती ती केवळ गंगाजळासारखी निखळ कृतज्ञता ! आपल्या गुरुजनांविषयी नितांत आदर. ते म्हणाले होते, 'फर्ग्युसन कॉलेजसमोरच्या एका बाजूला माझ्या नावाचे वृंदावन असावे आणि सकाळ–संध्याकाळ कॉलेजमध्ये येणाऱ्या जाणाऱ्या विद्यार्थ्यांची नि गुरुजनांची धूळ माझ्या मस्तकी–माझ्या वृंदावनावर पडावी एवढीच माझी इच्छा आहे.'

त्यांची गुरुभक्ति नि मित्रप्रेम सर्वश्रुत आहे. त्यांच्या पहिल्या नाटकाला–प्रेमसंन्यासला, गुरुवर्य गो. चि. भाटे यांनी प्रस्तावना लिहिली आहे. तर ते अर्पण केले आहे, आपल्या पितृतुल्य गुरूंना–आपल्या तात्यांना श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांना ! आपल्या लाडक्या शिष्याच्या अखेरच्या इच्छेनुसार 'भावबंधन'ची पदे रचली आहेत तात्यांनीच !



# राजधानी दिल्ली

पृष्ठ ४ वरून

दाचा कार्यक्रम होता. खरे म्हणजे महाप्रसाद शेवटच्या दिवशी, अनंतचतुर्दशीला करणे औचित्यपूर्ण ठरले असते; पण सुटीसाठी तो मधेच 'अॅडजस्ट' केला होता. सकाळी गणपतीला अथर्वशीर्षाच्या सहस्रावर्तनानी अभिषेक झाला. बारा-तेरा वर्षांच्या मुलापासून वयोवृद्ध मंडळीपर्यंत पचवीस-तीसजण अथर्वशीर्षाचा पाठ करण्यात हौसेने सहभागी झाले होते. आमच्या दिल्ली विद्यापीठाच्या वनस्पतिशास्त्रविभागातले प्रा शर्मा दरवर्षीप्रमाणे अथर्वशीर्ष म्हणण्यासाठी आपल्या मुलासह आवर्जून आले होते. गणेशभक्त शर्मांना मराठा मित्रमंडळाचा गणेशोत्सव म्हणजे मोठी पर्वणी वाटते. कोणत्याही कार्याच्या प्रारंभी गणेशपूजा करण्याची प्रथा असून देखील गणेशोत्सव मात्र सार्वजनिकरीत्या मोठ्या प्रमाणावर उत्तरभारतीयानी का साजरा करू नये, याचे वैषम्य ते नेहमीच बोलून दाखवतात.

गेल्या वर्षी माझ्या एका कर्नाटकीय स्नेह्याना मी महाप्रसादासाठी आग्रहाने घेऊन गेलो होतो. जेवणाची भाऊगर्दी, वाटेल तशा माडलेल्या पत्रावळी, पहिली पगत उठल्यावर उष्टे-खरकटे आवरण्यापूर्वीच लोकानी पगतीत जागा पटकावणे वगैरे खास मराठी बाण्याच्या गोष्टी पाहून त्या स्नेह्याना अगदी उबग आली होती. यदा ( पावसाच्या कृपेमुळे ) बुफे पद्धतीची व्यवस्था केलेली होती. मसालेभात, पातळ भाजी, भजी, डाळीचा चटका, बटाटयाची भाजी, शिरा, पुऱ्या आणि पापड असे पदार्थ प्लेटमध्ये भरून आणून आरामात खुर्चीवर बसून खायचे होते. भोजनोत्तर पाणी पितानाच मठ्ठाही ग्लास भरून मिळत होता. एकदर वातावरण स्वच्छतेचे, नीटनेटकेपणाचे होते. मात्र त्यातही, रागेतून प्लेट भरून घेताना काही मडळी आपला 'मराठी बाणा' दाखवायला विसरत नव्हती.

¤

पंधरा ऑगस्टला स्वातंत्र्यदिनाच्या कार्यक्रमात पंतप्रधान इंदिरा गाधीनी आपल्या भाषणाच्या शेवटी 'यदा भरपूर पाऊस हवा' अशी शुभकामना प्रकट केली आणि ( योगायोगाने ) तत्क्षणी पावसाला प्रारभ झाला, हे दृश्य दूरदर्शनवर सर्वांनी पाहिलेच असेल. गमत म्हणजे, इदिरा गाधींच्या ( निदान ) या ( तरी ) प्रार्थनेला देव भरभरून पावला आणि ऑगस्टच्या दुसऱ्या पधरवड्यात पावसाने राजधानीला अक्षरश झोडपून काढले. एके दिवशी तर पहाटे चारपासून जो मुसळधार पाऊस सुरू झाला तो सूर्यास्तापर्यंत पडतच राहिला मिंटोब्रिजपाशी इतके पाणी तुबले की, त्यात दोन बसेस सपूर्ण बुडाल्या. ठिकठिकाणी तुबलेल्या पाण्याचे मोठे जलाशय रस्त्यावर निर्माण झाले पावसाच्या पाण्याचा निचरा करण्याची दिल्ली प्रशासनाची व्यवस्था किती कुचकामी आहे, हे पुन्हा एकदा प्रगट झाले सगळ्यात कहर झाला टेलिफोन्सच्या बाबतीत. दिल्लीमधले ऐंशी टक्के टेलिफोन्स पावसामुळे जे नादुरुस्त झाले ते अजूनही तसेच आहेत. नादुरुस्त झालेल्यातले पन्नास टक्के दुरुस्त केले गेले ते पुन्हा नंतरच्या पावसात नादुरुस्त झाले. अजूनही पावसाचे वास्तव्य आहेच. कधीही अचानक एकदम आभाळ भरून येते आणि पावसाच्या सरी कोसळू लागतात. दिल्लीला अशी पावसाळी हवा नेहमीच्या परिचयाची नाही.

¤

दिल्लीतल्या महाविद्यालयांमध्ये चैतन्याची लहर जागी होत आहे. 'दिल्ली विद्यापीठ विद्यार्थीसघ' ( Delhi University Student's Union-'DUSU') च्या निवडणुका जवळ आलेल्या आहेत. दिल्ली विद्यापीठ विद्यार्थी-संघ हे एक फार वडे प्रस्थ आहे. सर्व महाविद्यालयातील विद्यार्थी-प्रतिनिधींचा मिळून हा विद्यार्थीसंघ असतो. त्यासाठी लोकसभेच्या धर्तीवर सर्व महाविद्यालयातून मतदान होते राजकीय पक्षाच्या विद्यार्थी-शाखा आपापल्या बॅनरसह उघड-उघड या निवडणुका लढवीत असल्यामुळे ही लोकसभेची 'मिनी' निवडणूकच असते. उमेदवारांच्या पळवापळवीपासून भोसकाभोसकीपर्यंत सर्व ( अ ) लोकशाही प्रकार त्यात झालेले आहेत. उमेदवाराच्या प्रचाराची छोटीमोठी पोस्टर्स दिल्लीभर सर्वत्र चिटकवली जातात. घराच्या भिंती, बसस्टॉपच्या शेडस्, बसेस, पोस्टाच्या पेटया, सिनेमा-पोस्टर्सचे फलक, चौकातले पुतळे– सर्वत्र ही पोस्टर्स वाटेल तशी चिकटवलेली दिसतात. अगदी रस्त्यावरसुद्धा चिकटवतात. सगळी दिल्ली त्यामुळे विद्रूप होऊन जाते आणि प्रत्यक्ष निवडणुकीचा शिमगा सपला तरी हे 'कवित्व' स्वच्छ करायला नतर आणखी एक–दीड महिना जावा लागतो. 'या वर्षी 'पोस्टर्स चिकटवू नयेत. दोरीने रस्त्याच्या बाजूना फक्त टागावीत-तसेच पोस्टर्स टागताना वाहतुकीला अडथळा होऊ नये याची दक्षता घ्यावी.' असे आवाहन पोलिसानी केलेले आहे. विद्यार्थ्यांकडून त्याची काय प्रतिक्रिया होते ते दिसेलच. सध्या तरी बसस्टॉपच्या शेड्स आणि पोस्टाच्या पेटया यावर पोस्टर्स चिकटवलेली दिसत आहेत. काही पोस्टर्स टागली जात आहेत. निवडणुकीची हवा हळूहळू तापत आहे.

–निशिकांत मिरजकर

मांडणी, विचार व देखणेपणा या साऱ्यातच 'उत्तम' असे म्हणता येईल असे हे पुस्तक आहे. –प्र. बा. भोसले

संपादक, बळीराजा मासिक

**योद्धा शेतकरी**

**ले. विजय परुळकर**

**राजहंस प्रकाशन, पुणे ३०**

**मूल्य : ३६ रुपये**

'मला नवल वाटतं की, ज्या आईपणापायी आयुष्यातल्या अनेक गोष्टी आणि व्यक्ती आणि अनुभव यांच्याकडे पाठ फिरवली, त्यापायीच त्या आईपणाचं सार्थक झालेल्या मुलांनीही माझ्याकडे पाठ फिरवली ! मी नसते या मुलीची आई तर माझं त्यांच्याशी छाऽन सूत जमलं असतं– इतक्या खऱ्या आणि मानलेल्या भाच्यांशी जमतं तसं ! कधीकधी वाटतं, मी बापच व्हायला हवी होते आणि तो आई. त्याच्या स्वभावात आला मायाळूपणा; अपराध नुसता पोटात घालणारा नाही तर तो विसरूनच जाणारा मोठेपणा; स्वतःला हसत मुरड घालून त्यांची भर करणारा सहज उदारपणा; आणि माझ्या स्वभावात ? काटेकोर न्याय, तर्कशुद्ध विचारसरणी, नियमपालन, बेतशीर व्यवस्थितपणा यांची आवड; आवडच का हाव ? पण पडेल ते कसं तरी साजरं करावंच लागलं. अखेर आमच्या पिढीत तरी आईपणा आईने आणि बापपणा बापाने केला. मग त्याला आम्ही थोडी वळणे–वाकणे, पुस्त्या–अस्तरे जोडली, तरी पण मूलभूत भूमिकांत फरक खरे तर पडलाच नाही. आता बघायचे काय होते ते.'

☐

आईपणा अनुभवण्याची उत्कट इच्छा असलेली
तरीही आईपणाच्या ओझ्याखाली गुदमरून मुलांना थोडं दूर ठेवणारी.
आणि रूढ आईपणापासून मुक्त होऊ पहाणारी
तरीही लांबच्या, जवळच्या, प्रेमळ उभ्या–आडव्या नात्यांच्या गुत्यातून
हलकेच सुटू पाहणारी... 'ती'

☐

एका प्रामाणिक व संवेदनशील स्त्रीचं अतिशय हळुवार चित्रण करणारी आणि रूढ नात्यांचाही अंतर्मुख होऊन पुन्हा पुन्हा विचार करायला लावणारी **गौरी देशपांडे** यांची वेधक कादंबरी.

# 'माणूस'
# दिवाळी अंकात

## तीन कथा

जुनी दप्तरं चाळताना दाजीसाहेबांच्या हाताला एका जीर्ण वस्त्रात बांधून ठेवलेलं एक पुडकं लागलं. काळाच्या ओघात नष्ट झालेली ही टाचणं आबासाहेबांची– वडिलांची होती. ती पाहताना दाजीसाहेबांना आश्चर्याचा धक्का बसला, मन विषण्ण झालं. एखादं रहस्य अचानकपणे उलगडावं तशी ही आबासाहेबांची टाचणं त्यांच्याशी बोलू लागली. . .

दाजीसाहेबांना वाटलं आपण कोण, कुठचे ?

आपण आजवर संसार केला तो कोणाचा ?

# मृगजळी केले स्नान

**रंगा मराठे**

निखिलची ओळख . . . मैत्री . . . लग्न आणि लगेच परदेशी प्रयाण . . . सगळं स्वप्नातल्यासारखंच झालं. पहिली दोन वर्षं झाल्यावर नेमकं कुठे बिनसलं गेलं कुणास ठाऊक; पण निखिलबरोबर रहायचं नाही हे ठरवलं.

त्याला सोडून भारतात एकटीनं यायचं ठरवलं तेव्हा तरी तो आणि मी सुटलो का ?

# मुक्त

**सुधा नरवणे**

# पेगी कॅम्बेल

" बच, पाहिलंस हे चित्र ? किती घरं, दारं, कुटुंब, निष्पाप बालकं यात होरपळली असतील, गाडली गेली असतील, कायमची भस्मसात झाली असतील !

चार वर्षांपूर्वी लंडन जळत असताना असल्याच भयानक प्रसंगातून मी गेले होते. माझे आई, वडील, बहीण, घर, सारं सारं काही क्षणात नष्ट झालं. त्या वेळी विनी चर्चिलनी मला स्फूर्ती दिली–

–सर्व्ह द नेशन अँड ह्युमॅनिटी. ही इज माय मेंटॉर, माय आयडॉल, माय स्पिरिट आणि याच– फक्त याच उदात्त हेतूने मी इतक्या दूर–हिंदुस्थानात आले आहे. "

त्या जिद्दी, कणखर आणि मृदु मनोवृत्तीच्या चोवीस वर्षांच्या तरुणीचे तळवे हातात धरून मी फक्त बोलू शकलो–

' पेगी, यू आर ग्रेट. सिंपली ग्रेट. '

कर्नल जाधव यांनी लिहिलेली एक प्रेरणादायी सत्यकथा

**' माणूस ' दिवाळी अंकात**

MANOOS WEEKLY ( Licensed to post without prepayment of postage No–11 ) Regd. No. PNCW–28



# राष्ट्रवाद आणि लोकशाहीचे समर्थ भाष्यकार

राष्ट्राभिमान हा एकूण कर्तृत्वालाच पोषक ठरतो. राष्ट्रभावनेचे मर्म ' राष्ट्रीय अहंकार ' हे आहे. इतिहासात ज्या ज्या ठिकाणी राष्ट्रकल्पना उदयास आली त्या त्या ठिकाणी इतरांपेक्षा आम्ही वेगळे आहोत, एवढेच नव्हे तर श्रेष्ठ आहोत, आमचे काही वैशिष्ट्य आहे किंवा जागतिक संस्कृतीला आम्ही काही विशेष योगदान करणार आहोत, त्या वैशिष्ट्याचा आम्हाला अभिमान आहे– अशा भावना निर्माण झाल्या आहेत. ह्या भावना ही सर्वगामी कर्तृत्वाची जननी असते. राष्ट्रभावनेने ओतप्रोत भरलेला देशच जीवनाच्या विविध क्षेत्रांत थोर पुरुष निर्माण करतो आणि राजकारण, युद्धनीती, साहित्य, कला, विज्ञान ह्यात समृद्धी उत्पन्न होते . . . . . .

डॉ. पु. ग. सहस्रबुद्धे यांनी असा राष्ट्रवाद आणि त्यासोबत लोकशाहीचा विचार, आपल्या शतावधी लेखांतून, भाषणांतून, अनेक ग्रंथांतून सतत मांडला.

आपल्या जागृतावस्थेचा प्रत्येक क्षण एखाद्या कंजुष माणसाप्रमाणे बाह्य उपाधींपासून त्यांनी वाचविला आणि या प्रत्येक क्षणाची योजना ज्ञानसंपादन आणि ज्ञानप्रसार ह्यांच्यासाठी केली.

सावरकरांनंतरचे राष्ट्रवादाचे डॉक्टर हे एक प्रभावी आणि डोळस भाष्यकार . . .

या भाष्यकाराच्या राष्ट्रवाद, लोकशाही, समाजवाद, मार्क्सवाद, गांधीवाद, हिंदुसमाज, इत्यादी विषयांवरील विचारांची ओळख करून देणारा, चिकित्सक पारख करणारा विशेष लेख.

## डॉ. पु. ग. सहस्रबुद्धे, विचारदर्शन

**लेखक : प्रा. स. ह. देशपांडे**

## ' माणूस ' दिवाळी अंकात....